मनुष्याणाम् वृत्तिरर्थः।

ISSN 0973-8452

मराठी अर्थशास्त्र परिषद

नियतकालिक

(त्रैमासिक)

# अर्थसंवाद

मनुष्याणाम् वृत्तिरर्थः।

भारतीय सौर फाल्गुन–आषाढ–शके १९४४

एप्रिल–मे–जून २०२२/खंड ४६, अंक १

# ‘अर्थसंवाद’च्या लेखकांसाठी महत्त्वाच्या सूचना

१. लेखकांनी आपले शोधनिबंध Shree Lipi (२३३५) किंवा Kruti Dev किंवा Unicode यापैकी कोणत्याही Font मध्ये Pagemaker किंवा Ms Word मध्ये टाईप करून पाठवावा. या व्यतिरिक्त कोणताही Font वापरू नये.

२ **संशोधनपर लेखाची प्रत अथवा सीडी पोस्टाद्वारे पाठवू नये.** काही अडचण असल्यास संपादकांशी संपर्क साधावा.

३. **संशोधनपर लेखाची एक सॉफ्ट कॉपी (एक मूळ फाईल व त्याचीच PDF केलेली फाईल अशा दोन फाईल्स्) ई-मेल द्वारे प्रमुख संपादकांकडे rahulmhopare@rediffmail.com या ई-मेल अ‍ॅड्रेसवर पाठवावी.** लेखासोबत संपादकांना लेख पाठवल्याची स्वाक्षरी केलेली कव्हर नोट स्कॅन करून पाठवावी. तसेच ई-मेल केल्यानंतर संपादकांशी भ्रमणध्वनीवर (९९२३८७९०२०) संपर्क साधून आपला ई-मेल व्यवस्थित पोचल्याची खात्री करून घ्यावी.

४. संशोधनपर लेख पूर्वमुद्रित नसावा. त्यामध्ये कॉपीराईटचा भंग न करता संदर्भाचा उल्लेख करावा. आजीव सभासद क्रमांक, भ्रमणध्वनी क्रमांक व ई-मेल लिहिणे आवश्यक आहे.

५. लेखाच्या शीर्षकाखाली लेखकांनी स्वत:चे संपूर्ण नाव देवनागरीतूनच लिहावे.

६. संशोधनपर लेख खास अर्थसंवादसाठीच लिहिलेला असावा. माहिती व आकडेवारी अद्ययावत असावी. लेखात गरजेनुरूप सांख्यिकीय तक्ते व आलेखांचा वापर केल्यास उत्तम. लेखांची गुणवत्ता पाहून तज्ज्ञ परिक्षकांनी केलेल्या सर्व सूचनांची पूर्तता केल्यानंतरच त्याची प्रसिद्धीसाठी निवड केली जाईल.

७. भाषा संचालनालयाने प्रकाशित केलेल्या अर्थशास्त्र परिभाषा कोश यातील परिभाषेचा उपयोग करावा. संपादकांना पाठवलेल्या कव्हर नोटसह लेखनाची एक प्रत स्वत जयळ अवश्य ठेवावी.

८. लेखकांनी कृपया संशोधनपर लेख टाईप केल्यानंतर सर्व सांख्यिकी माहिती, शुद्धलेखन आणि व्याकरण अचूक तपासून नंतरच अंतिम प्रत पाठवावी.

९. संदर्भ सूची देताना पूढील पद्धतीने देणे आवश्यक आहे : उदा. पाटील, ज.फा., सुवर्ण महोत्सवी महाराष्ट्राची बदलती अर्थव्यवस्था, सकाळ पेपर्स लिमिटेड, पुणे, २०१०, (पृष्ठ क्रमांक असेल तर द्यावा.)

मनुष्याणाम् वृत्तिरर्थः।
www.marthpari.org
(स्थापना वर्ष - १९७७)

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे त्रैमासिक

लोककल्याणमूलस्य अर्थशास्त्रस्य सिध्दये।
शोधचर्चाविवादार्थ संवादोऽयं प्रवर्तितः।।


# अर्थसंवाद


(तज्ज्ञ परिक्षित नियतकालीक)

Reg.No. 31918/77 / ISSN 0973-8452

एप्रिल-मे-जून २०२२/ खंड ४६ / अंक १



**प्रमुख संपादक**
राहुल शं. म्होपरे
(देवचंद कॉलेज, अर्जुननगर)

**सहाय्यक संपादक**
चंद्रकांत जाधव
(य.च.वारणा महाविद्यालय, वारणानगर)

**सल्लागार मंडळ**
**(२०२२-२५)**
जे. एफ. पाटील
संतोष दास्ताने
मुक्ता जहागिरदार
के. के. पाटील

**संपादकीय पत्रव्यवहार**
राहुल शं. म्होपरे
'सर' निवास, री.स.नं. ३३/क/२,
प्लॉट नं. १८, लेक व्ह्यू कॉलनी,
दीपा गॅस गोडावूनच्या पाठीमागे,
उजळाईवाडी, ता. करवीर,
जि. कोल्हापूर - ४१६ ००४
भ्रमणध्वनी : ९९२३८७९०२०

**लेखातील मते लेखकांचीच**


## अ नु क्र म णि का


१. **अनिल बाबुराव सूर्यवंशी**
कोरोनाच्या पार्श्वभूमीवर भारतातील आरोग्य... ३
२. **राहुल शं. म्होपरे**
कोल्हापूर संस्थानचे विकास प्रारूप ९
३. **पी. एस. कांबळे**
अपेक्षित अंदाजपत्रक आणि वास्तव अंदाजपत्रक... १५
४. **रमेश ल. बिडवाई**
ग्रामीणांना वर्षभर रोजगार देणारी योजना २३
५. **पांडुरंग नामदेव डापके**
भारतीय अर्थव्यवस्था:लोकसंख्या आणि आर्थिक विकास संबंध ३२
६. **विशाल चंद्रशेखर बेलुरे**
प्रचरण विश्लेषणाद्वारे गृहीतकृत्याची चाचणी : एक टिपण ३८
७. **शि. ना. माने** - अर्थ शब्दांची वाट पाहे...
Freedom of Information ४५
८. **जे. एफ. पाटील** - अर्थ शब्दांची वाट पाहे...
New Welfarism, Crypto-currency, Block chain,
Mining and Stable Coin ४७
९. **शिवकुमार खोबरे** : अर्थ शब्दांची वाट पाहे...
Gig Economy and Zombie Company ४९
१०. **संतोष दास्ताने** : अर्थ शब्दांची वाट पाहे...
National Monetization Pipeline ५२
११. **उत्तम वाकोडकर** : पुस्तक परिचय
भारतातील आरोग्यसेवा व धोरण ५४
१२. **एस.एस. कळमकर** : पुस्तक परिचय
Contemporary Relevance of Thoughts and
Policies of Chhatrapati Shahu Maharaj ५९
१३. **मारोती वि. तेगमपुरे** : मराठी अर्थशास्त्र परिषद ४४ वे
राष्ट्रीय वार्षिक अधिवेशन : २०२१-२२ कार्यवाहांचा अहवाल ६४
१४. **अनिलकुमार कृष्णराव वावरे** : शोधनिबंध विषय रूपरेषा
आर्थिक सिद्धांतन व प्रायोगिक पद्धत ७०
१५. **संतोष यादव** : शोधनिबंध विषय रूपरेषा
१५वा वित्त आयोग : केंद्र-राज्य वित्तीय संबंधांची चिकित्सा ७२
१६. **सुरेश जगताप** : शोधनिबंध विषय रूपरेषा
डॉ.पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांचे आर्थिक विचार ७६

## मराठी अर्थशास्त्र परिषद

### कार्यकारी मंडळ २०२१-२२

- **अध्यक्ष**

**राजेंद्र बी. भांडवलकर (यवतमाळ)**

- **कार्याध्यक्ष**

**अविनाश रा. निकम (शहादा)**

- **कार्यवाह खजिनदार**

**मारोती वि. तेगमपुरे (अंबड)**

- **प्रमुख संपादक-अर्थसंवाद**

**राहुल शं. म्होपरे (कोल्हापूर)**

- **विश्वस्त**

**रामकृष्ण टाले (नागपूर)**
**अजय दरेकर (बारामती)**
**विकास सुकाळे (नांदेड)**

- **सदस्य**

**बळवंत कोरे (कराड)**
**गणेश मांगडे (दापोली)**
**माधव शिंदे (अहमदनगर)**
**सुरेश ढाके (भुसावळ)**
**अरुण पिसे (धुळे)**
**राजाराम पाटील (सोलापूर)**
**दयाळू राठोड (अकोला)**
**मनीषकुमार कायरकर (बल्लारपूर)**
**संजय धनवटे (कारंजा)**
**विजय भोपाळे (नांदेड)**
**दिलीप अर्जुने (जालना)**

- **स्वीकृत सदस्य**

**वनिता चौरे (चांदूरबाजार)**
**विलास खंदारे (औरंगाबाद)**

- **स्थानिक कार्यवाह**

**दिलीप अर्जुने (जालना)**



**कार्यालयीन पत्रव्यवहार:**
(आजीव सदस्य नोंदणी, जाहिरात पाठविणे)
मुद्रक-प्रकाशक : **मारोती वि. तेगमपुरे**
कार्यवाह खजिनदार, मराठी अर्थशास्त्र परिषद,
'संगाई', घर नं. २२, शहीद भगतसिंग नगर, भालचंद्र पेट्रोल पंपामागे, पारनेर रोड, अंबड, जि. जालना.
पिन - ४३१ २०४ भ्रमणध्वनी : ९४२३९९३१३७

**अर्थसंवाद वर्गणी :**

- **परिषदेचे सदस्य :**

| | |
|---|---|
| आजीव सदस्य | : रु. ३०००/- (एकरकमी) |
| इमारत निधी | : रु. २०००/- |
| सदस्य सूची | : रु. १००/- |
| एकूण | : रु. ५१००/- |

- **संस्था सदस्य व अर्थसंवाद वर्गणीदार:**

शैक्षणिक संस्था
व्यावसायिक संस्था
ग्रंथालये
} रु.२०००/-(त्रैवार्षिक)
रु.३०००/-(पंचवार्षिक)

- **वर्षगणना :** १ एप्रिल ते ३१ मार्च
- संस्थांना आजीव सभासद होता येत नाही.
- कृपया आजीव सदस्य वर्गणी **मराठी अर्थशास्त्र परिषद** या नावाने डिमांड ड्राफ्टद्वारेच कार्यवाहांकडे पाठवावी.
- अर्थसंवादची वर्गणी **मराठी अर्थशास्त्र परिषद** या नावाने डिमांड ड्राफ्ट किंवा NEFT (BOI खाते क्र. 094720110000368, IFSC - BKID0000947, राजारामपुरी, कोल्हापूर) द्वारे प्रमुख संपादकाकडे पाठवावी.
- मनीऑर्डर व वार्षिक वर्गणी स्वीकारली जात नाही.

**'अर्थसंवाद'साठी अनुदानाबद्दल आभार:**
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई.


टीप : म. रा. सा. सं. मंडळाने अनुदान दिले असले, तरी या नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी मंडळ आणि राज्य शासन सहमत असेलच असे नाही.


हे त्रैमासिक, प्रकाशक मारोती वि. तेगमपुरे (प्रमुख संपादक राहुल शं. म्होपरे) यांनी मराठी अर्थशास्त्र परिषद या संस्थेकरिता भारती मुद्रणालय, शाहुपुरी, कोल्हापूर येथे छापून मराठी अर्थशास्त्र परिषद, शहीद भगतसिंग नगर, भालचंद्र पेट्रोल पंपामागे, पारनेर रोड, अंबड - ४३१ २०४ येथे प्रसिद्ध केले.

# कोरोनाच्या पार्श्वभूमीवर भारतातील आरोग्य खर्च आणि आरोग्य सुविधांचा आढावा

## म. अ. परिषदेचे ४४ वे राष्ट्रीय अधिवेशन : अध्यक्षीय भाषणाचा गोषवारा

**अनिल बाबुराव सूर्यवंशी** †

**पार्श्वभूमी**

मानवामध्ये यापूर्वी कधी न आढळलेल्या नवीन (Novel) अशा कोरोना विषाणूंमुळे पसरणारा कोविड-१९ हा नवीनच आजार आहे. कोरोना विषाणूचा उगम चीनमधील हुबै (Hubei) प्रांतातील वुहान (Wuhan) शहरात डिसेंबर २०१९ मध्ये झाला. नंतर वेगाने हा विषाणू युरोप, उत्तर अमेरिका, आशिया, दक्षिण अमेरिका, आफ्रिका इत्यादी सर्व खंडात आणि सर्व देशात वेगाने पसरत जाऊन अल्पावधीत संपूर्ण विश्व व्यापून टाकले म्हणूनच जागतिक आरोग्य संघटनेने या नवीन रोगाला जागतिक महामारी कोविड-१९ असे नाव दिलेले आहे.

**भाग एक : एकविसाव्या शतकातील महामारी - कोविड-१९**

११ फेब्रुवारी, २०२० रोजी जागतिक आरोग्य संघटनेने या नवीन रोगाचे अधिकृत नाव कोविड-१९ असे जाहीर केलेले आहे. या नवीन रोगाचे पूर्ण नाव Corona Virus Disease - 2019 असे आहे.

**भारतातील कोविड -१९ महामारी**

भारतातील कोविड-१९ महामारी ही जागतिक कोरोना महामारीचा एक भाग असून श्वसनासंबंधीच्या तीव्र विकृती निर्माण करणारा हा रोग कोरोना विषाणू-२ किंवा SARS -२ मुळे उद्‌भवतो. अधिकृत आकडेवारीनुसार १ मार्च, २०२२ अखेर भारतात ४२.९ दशलक्ष रुग्णांची नोंद झालेली असून भारत हा अमेरिकेनंतर दुसऱ्या क्रमांकाचा देश ठरलेला आहे आणि ५.१४ लक्ष लोकांचा मृत्यू होऊन भारत देश, अमेरिका आणि ब्राझीलनंतर जगातील मृत्यूबाबत तिसरा देश ठरलेला आहे.

**भारतातील कोरोनाची पहिली लाट :**

३० जानेवारी, २०२० रोजी भारतात केरळमधील त्रिसूरमध्ये कोविड-१९ पहिला रुग्ण नोंदविला गेला. केरळ राज्यात २३ मार्चपासून Lockdown किंवा टाळेबंदी करण्यात आली, तर उर्वरित भारतात २५ मार्च २०२० पासून टाळेबंदी करण्यात आली. याचा परिणाम जून २०२० पर्यंत कोरोना आटोक्यात आला.

**भारतातील कोरोनाची दुसरी लाट :** मार्च २०२१ मध्ये कोरोनाची दुसरी लाट सुरू झाली. अर्थातच, ही लाट पहिल्या लाटेपेक्षा अधिक तीव्र स्वरूपाची होती. ३० एप्रिल रोजी एका दिवसात चार लाखांपेक्षा जास्त रुग्णांची नोंद करणारा भारत हा जगातील पहिला देश ठरला. मेच्या अखेरीस नवीन प्रकरणांची संख्या सातत्याने

---

† अर्थशास्त्राचे वरिष्ठ प्राध्यापक (निवृत्त) तथा माजी अर्थशास्त्र विभाग प्रमुख, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.
आजीव सभासद क्र. : ५६८, भ्रमणध्वनी : ९४२२०४०६८४ ई-मेल : 1.anilsurya@gmail.com

कमी होऊ लागली होती.

**भारतातील कोरोनाची तिसरी लाट :** डिसेंबर २०२१ ते फेब्रुवारी २०२२ दरम्यान भारताला कोरोनाच्या तिसऱ्या लाटेचा सामना करावा लागला. कोरोनाचे कोणतेही लक्षण नसलेली किंवा अतिशय सौम्य लक्षणे असलेली मोठी रुग्णसंख्या हे तिसऱ्या लाटेचे वैशिष्ट्य होते. तिसऱ्या लाटेचा सर्वाधिक परिणाम मुंबई, दिल्ली, कलकत्ता, चेन्नई, बेंगलोर, पुणे, अहमदाबाद आणि हैद्राबाद या शहरांमध्ये दिसला.

**कोरोनाची चौथी लाट :** IIT कानपूरच्या गणित व सांख्यिकी विभागातील काही संशोधकांनी नुकत्याच एका अभ्यासात ९३६ दिवसांचे मॉडेल तयार केले असून, त्यांच्या मते भारतामध्ये कोरोनाची चौथी लाट २२ जून, २०२२ रोजी येईल जी २३ ऑगस्ट, २०२२ ला शिखरावर असेल व २४ ऑक्टोबर, २०२२ ला संपेल.

**लॉकडाऊन किंवा टाळेबंदी**

१९ मार्च, २०२० रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सर्व भारतीयांना २२ मार्च रोजी १४ तासांचा जनता कर्फ्यू पाळण्यास सांगितले. २४ मार्च रोजी पंतप्रधानांनी संपूर्ण लाकडाऊन किमान तीन आठवड्यांसाठी ठेवला जाईल असे जाहीर केले. १६ एप्रिलपासून रंग, कोडप्रणालीचा (colour-coded) वापर करून भारतातील सर्व जिल्ह्यांचे तीन गटांत विभाजन करण्यात आले. ज्याचे वर्गीकरण रेड (हॉटस्पॉट), ऑरेंज किंवा ग्रीन (थोडे ते कमी ट्रान्समिशन) झोन म्हणून केले गेले. ४ एप्रिल रोजी महाराष्ट्राने इतर निर्बंधांसह शनिवार व रविवार लॉकडाउन आणि रात्रीचा कर्फ्यू लावला. लॉकडाऊनचा टप्पा ३ आणि ४ शिथिलतेमधील काही बदलांसह ३१ मेपर्यंत वाढवला.

तिसऱ्या लाटेमध्येदेखील दुसऱ्या लाटेप्रमाणे कोणत्याही प्रकारांचा पूर्ण लॉकडाऊन करण्यात आला नाही. दुसऱ्या लाटेदरम्यान जी नियमावली जाहीर केली होती तीच नियमावली तिसऱ्या लाटे दरम्यानदेखील लागू होती. तिसऱ्या लाटेमध्ये स्थानिक प्रशासनाने आपल्या विभागातील परिस्थितीचा अंदाज घेत कमी-जास्त प्रमाणात निर्बंध लादले.

**भारतातील लसीकरण धोरण किंवा कार्यक्रम**

पहिला टप्पा १६ जानेवारी, २०२१ रोजी सुरू झाला आणि दहा दशलक्ष आरोग्य कर्मचाऱ्यांना लक्ष्य केले, दुसरा टप्पा ०१ मार्च, २०२१ रोजी ४५+ वयोगटातील आणि ६०+ वृद्धांसाठी सुरू करण्यात आला. एप्रिल मध्ये ४५ वर्षावरील प्रत्येकासाठी लसीकरण खुले करण्यात आले. एप्रिल २०२१ या महिन्यात रुग्णांच्या संख्येत वाढ झाल्यामुळे १ मे, २०२१ पासून १८ वर्षावरील सर्व लोकांसाठी लसीकरण मोहिमेचा तिसरा टप्पा उघडला गेला.

**भाग दोन : भारतातील एकूण आरोग्य खर्च**

- १९८६-८७ पूर्वी भारताचा आरोग्यवरील खर्च १००० कोटी रुपये देखील नव्हता.
- १९८६-८७ यावर्षी प्रथमच आरोग्यखर्च रुपये ५००० कोटीच्या आसपास गेला.
- १९९०-९१ यावर्षी आरोग्यावरील खर्च ७३०९ कोटी रुपये होता. हा आरोग्य खर्च प्रतिवर्षी सातत्याने वाढत जाऊन २०२०-२१ यावर्षी आरोग्य खर्च ३५१००० कोटी रुपयांपर्यंत वाढलेला आहे. म्हणजेच या काळातील निव्वळ वाढ ३४३,६९१ कोटी रुपये एवढी झालेली आहे.
- १९८६-८७ पासून २०१५-१६ पर्यंत सरकारच्या एकूण खर्चातील आरोग्य खर्चाचा वाटा फारच अल्प म्हणजे ४.७ ते ४.८ प्रतिशत यादरम्यान होता.
- २०१६-१७ ते २०२०-२१ या अलीकडच्या पाच वर्षांच्या काळात आरोग्य खर्चाचा एकूण खर्चातील वाटा ५ प्रतिशत ते ५.४ प्रतिशतपर्यंत वाढ झालेली आहे. परंतु ही वाढ कोरोनाच्या गंभीर प्रादुर्भावाच्या काळात नगण्य आहे.

**दिनांक ०१ मार्च २०२२ रोजी लसीकरण स्थिती**

| पहिला डोस | दुसरा डोस | प्रिकॉशन डोस | एकूण लसीकरण |
|---|---|---|---|
| ९६.४२ कोटी (६९.८%) | ७९.२६ कोटी (५७.४%) | २ कोटी | १७७.७ कोटी |

**कोरोना सद्यस्थिती ०७ मार्च २०२२**

| | रुग्णसंख्या | मृतसंख्या |
|---|---|---|
| जग | ४४.६ कोटी | ६० लाख |
| भारत | ४.३० कोटी | ५.१५ लाख |
| महाराष्ट्र | ७८.७ लाख | १.४४ लाख |


- १९५०-५१ ते २००४-०५ या चोपन्न वर्षांच्या कालावधीत केंद्रीय अर्थसंकल्पात आरोग्य खर्चाचा स्थूल देशांतर्गत उत्पादनातील वाटा एक प्रतिशतदेखील नव्हता. ही अत्यंत धक्कादायक सत्य स्थिती आहे.
- २००५-०६ ते २०२०-२१ या अलीकडच्या सोळा वर्षात स्थूल देशांतर्गत उत्पादनातील आरोग्य खर्चाचा वाटा १ प्रतिशतपेक्षा थोडाच जास्त आहे.
- २०२०-२१ या विश्वव्यापी कोरोना महामारीच्या गंभीर व अत्यंत महत्त्वाच्या टप्प्यातील केंद्रीय अंदाजपत्रकातदेखील स्थूल देशांतर्गत उत्पादनातील आरोग्य खर्चाचा वाटा फारच अल्प म्हणजे १.८ प्रतिशत एवढा होता.
- १९८६-८७ ते २०२०-२१ या ३४ वर्षांच्या दीर्घ कालावधीत भारतातील आरोग्य खर्चाचा एकूण सामाजिक सेवा खर्चातील प्रतिशत वाटा अभ्यासता १९८६-८७ या फक्त एका वर्षी २४.१ प्रतिशत एवढा होता. परंतु दुर्दैवाने ही पातळी नंतरच्या ३३ वर्षात एकदाही गाठता आलेली नाही.
- याउलट नंतरच्या वर्षात आरोग्य खर्चाचा वाटा कमी कमी होत जाऊन २०२०-२१ यावर्षी हा वाटा २०.५ प्रतिशत एवढा कमी झालेला होता.
- विशेष आश्चर्याची बाब म्हणजे २०१८-१९ या कोरोनापूर्व वर्षात हा वाटा २०.८% होता आणि २०२०-२१ या कोरोना प्रादुर्भावाच्या अत्यंत महत्त्वाच्या टप्प्यातील आरोग्य खर्चाचा वाटा वाढण्याऐवजी हा वाटा २०.८% वरून २०.५% पर्यंत घटलेला आहे. सारांशाने भारतातील आरोग्य खर्च खूपच अल्प असून त्याचा एकूण सामाजिक सेवा खर्चातील वाटा वाढलेला नाही.
- भारतात कोविड-१९ या रोगाचा प्रादुर्भाव वाढण्याचे प्रमुख कारण म्हणजे भारतातील तुटपुंजा आरोग्य खर्च होय. आरोग्य सुविधांच्या कमतरतेमुळे लाखो लोकांचे प्राण या महामारीमुळे गेल्याचे स्पष्टपणे दिसून आले.

**भारताची इतर देशांशी तुलना**

जागतिक आरोग्य संघटनेच्या WHO आकडेवारीनुसार, आलेख क्रमांक ०१ वरून स्पष्ट होते की, भारतातील एकूण सरकारी खर्चाच्या तुलनेत आरोग्य सेवेवर होणारा सार्वजनिक खर्च विकसित आणि विकसनशील देशांच्या तुलनेत खूपच कमी आहे.

- जपान, अमेरिका, जर्मनी इत्यादी प्रगत देशांचा वाटा २०% पेक्षा जास्त आहे.
- चीन, व्हिएतनाम, ब्राझील, दक्षिण आफ्रिका इत्यादी विकसनशील देशांचा वाटा १०% आहे.

**आलेख क्रमांक १: सरकारचा आरोग्य खर्च**




स्रोत: WHO

- भारतात आरोग्यसेवेवरील सार्वजनिक खर्चाचे एकूण खर्चातील प्रमाण अल्प म्हणजे ३.४% आहे.

**आर्थिक वर्ष २०२२ मध्ये राज्य सरकारे व केंद्र सरकारने आरोग्य सेवेवर केलेला खर्च:**

कोविड-१९ च्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने आर्थिक वर्ष २०२२ मध्ये आरोग्य सेवेवरील खर्चात लक्षणीय वाढ केली आहे. आर्थिक वर्ष २०२१ च्या सुधारित अंदाजापेक्षा खर्च ६३.५% ने वाढून तो खर्च रुपये १.०६ लाख कोटी केला आहे. यामध्ये कोविड-१९ लसीकरण कार्यक्रमासाठी राज्यांना दिलेल्या ३५००० कोटी रुपयांचा खर्च समाविष्ट आहे. याउलट २०२२ च्या केंद्र सरकारच्या तुलनेत राज्य सरकारांनी आरोग्य सेवेवर वाढीव खर्च कमी केला आहे. राज्यांनी २०२१ च्या तुलनेत आर्थिक वर्ष २०२२ मध्ये फक्त १२% किंवा १.८७ लाख कोटी खर्च केलेला आहे.

**भाग तीन : भारतातील आरोग्य सुविधा**

**भारतातील सरकारी रुग्णालये आणि बेड क्षमता : सद्यस्थिती**

- संपूर्ण भारतात ४०,८८३ सरकारी दवाखाने असून त्यात ८,१८,३९६ बेडसची उपलब्धता आहे.
- भारतातील एकूण रुग्णालयांपैकी ३१,०१७ ग्रामीण रुग्णालये असून त्यातील बेड्सची उपलब्धता २,९५,९२३ आहे.
- भारतातील एकूण रुग्णालयांपैकी ९,८६६ शहरी सरकारी रुग्णालये असून त्यात ५,२२,४७३ बेड्स उपलब्ध आहेत.
- शहरी भागात रुग्णालयांची संख्या कमी असूनही बेड्सची संख्या ६४ प्रतिशत (५२२४७३) आहे. या उलट ग्रामीण रुग्णालयांची संख्या तुलनेने जास्त असूनही बेड्सची संख्या फक्त ३६ प्रतिशत (२९५९२३) आहे. यावरून हे स्पष्ट होते की, ग्रामीण भागात आरोग्य सुविधा खूपच कमी आहेत.

**डॉक्टर्स आणि वैद्यकीय कर्मचारी : सद्यस्थिती**

- भारतातील जिल्हा रुग्णालये आणि उपजिल्हा रुग्णालये यातील डॉक्टरांची एकूण संख्या ३८, ४२६ आहे आणि यातील वैद्यकीय कर्मचाऱ्यांची एकूण संख्या १,२२,१०३ एवढी आहे.
- भारतात एकूण १,६०,७१३ आरोग्य उपकेंद्र Sub-Centers (१५७४११ ग्रामीण +३३०२ शहरी) कार्यरत आहेत.
- तसेच भारतात ३००४५ प्राथमिक आरोग्य केंद्रे PHCs (२४८५५ ग्रामीण + ५१९० शहरी)

कार्यरत आहेत.

**डॉक्टर्स आणि आरोग्य कर्मचारी संख्या : जागतिक तुलना**

- युरोप, अमेरिका आणि पश्चिम पॅसिफिक विभागात अनुक्रमे २३२, ३५३ आणि ५३१ लोकांमागे एक डॉक्टर असे प्रमाण आहे. म्हणजेच या तीन विभागात डॉक्टरांची संख्या / प्रमाण जास्त आहे. याउलट राहिलेल्या तीन विभागांत म्हणजे आफ्रिका दक्षिण-पूर्व अशिया आणि पूर्व भूमध्य सामुद्रिक येथे अनुक्रमे ३६२३, ११४७ आणि ९१४ लोकांमागे एक डॉक्टर असे प्रमाण आहे. या तीन विभागांत डॉक्टरांची संख्या फारच कमी आहे.
- नर्सिंग स्टाफबाबतीतही अशीच असमानता दिसून येते. आफ्रिका, पूर्व भूमध्य सामुद्रिक आणि दक्षिण पूर्व आशिया या तीन विभागांत अनुक्रमे ९७३, ६०९ आणि ४०९ लोकांमागे एक नर्स असे प्रमाण आहे. म्हणजेच या तीन विभागांत परिचारिका प्रमाण फारच कमी आहे. याउलट अमेरिका, युरोप आणि पश्चिम पॅसिफिक येथे अनुक्रमे १२१, १२९ आणि २७१ लोकांमध्ये एक नर्स असे प्रमाण आहे. या तीन विभागांत परिचारिका प्रमाण जास्त आहे.
- भारतात १००० लोकांमागे १.४ बेडस, १४४५ लोकांमागे एक डॉक्टर आणि १००० लोकांमागे १.७९ नर्स आहेत.
- जागतिक आरोग्य संघटनेच्या आकडेवारीनुसार आरोग्य खर्चाबाबत भारताचा १९१ देशांमध्ये १८४ वा क्रमांक आहे.

**भाग चार : समारोप**

भारतातील पायाभूत आरोग्य सुविधांसाठी धोक्याची सूचना.

आरोग्यावरील सरकारी खर्च, मागणी-पुरवठा असमतोल आणि आरोग्य सुविधांची तीव्र टंचाई या काही समस्या ठळक आहेत.

**भारत आरोग्यसेवेवर किती खर्च करतो ?**

वर्ल्ड हेल्थ ऑर्गनायझेशन (डब्ल्यूएचओ) नुसार, आरोग्य खर्चामध्ये भारताचा १९१ देशांमध्ये १८४ वा क्रमांक आहे. २०२०-२१ मध्ये भारताने आपल्या सकल देशांतर्गत उत्पादनाच्या (जीडीपी) १.८% आरोग्यसेवेवर खर्च केला. परंतु दुर्दैवाने भारतात अद्यापही आरोग्य सेवांवरील खर्च एकूण GDP च्या केवळ २ % आहे. यावरून आपणास स्पष्ट दिसते की, भारत आरोग्यसेवेवर तुटपुंजा खर्च करतो.

**आरोग्यविषयक सुविधांची कमतरता**

कोविड-१९च्या दुसऱ्या लाटेच्या आक्रमणाचा सामना करण्यासाठी भारत संघर्ष करत असताना आरोग्यसेवा यंत्रणेची क्षमता, रुग्णालयातील बेड, ऑक्सिजन, जीवनरक्षक औषधे, वैद्यकीय सेवापुरवठा इत्यादींच्या गंभीर कमतरता अनुभवास आली. यातही शहरी भागांपेक्षा ग्रामीण भागात आरोग्यविषयक सुविधांची कमतरता अधिक तीव्रतेने जाणवली.

**आरोग्य सुविधा सुधारण्यासाठी काय आवश्यक आहे ?**

- भारताला सर्वसमावेशक सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेची नितांत गरज आहे.
- काळाची गरज अशी आहे की एक नियामक असावा, जो राज्यांसोबत काम करू शकेल आणि हे सुनिश्चित करेल की, रोगप्रतिबंधऐवजी परवडणारी आरोग्य-सेवा, अधिक आरोग्य कर्मचाऱ्यांची उपलब्धता, सुसज्ज सुविधा आणि रोग व्यवस्थापन याकडे लक्ष केंद्रित केले जावे.
- आरोग्य सुविधांच्या बाबतीत राज्यांमधील असमानता कमी करणे आवश्यक आहे.
- केंद्राचे १००% आरोग्य विमा संरक्षण देण्याचे उद्दिष्ट असणे आवश्यक आहे.

सारांशाने कोरोना प्रतिबंधासाठी, इतरांपासून सुरक्षित अंतर ठेवा, गर्दी टाळा, मास्क वापरा, हात वारंवार स्वच्छ करा, लक्षणे आढळल्यास विलगीकरण या

डब्लूएचओने सांगितलेल्या मार्गदर्शक नियमांचे काटेकोर पालन करा. भारतात लसीकरणाची गती वाढवणे आणि विशेषतः लहान मुलांचे लसीकरण करण्याची गरज आहे. सुदैवाने भारतात नववर्ष २०२२ चा शुभारंभ १५ ते १८ वयोगटातील लहान मुलांच्या लसीकरणाने होत आहे.

**संदर्भ सूची**


- https://data.worldbank.org/indicator/SH.XPD.CHEX.GD.ZS?locations =IN
- https://www.statista.com/statistics/684924/india-public-health-expenditure/
- https://www.covid19india.org/
- https://covid19.who.int/
- Ministry of Health and Family Welfare (Govt. of India)(link is external) - for official data and advice on Covid-19 from GoI.
- Indian Council of Medical Research (ICMR)
- TIFR - Response on COVID-19


◆

---

स्पर्धा केवळ उपभोगासाठी संरक्षणाचा आधार नाही, तर प्रगतीसाठी प्रोत्साहन आहे

**- हार्बर्ट हुवर**

---

## निवेदन

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या सर्व आजीव सदस्यांना कळविण्यात येते की, अर्थसंवादची वाढती तूट लक्षात घेता गो. सी. टोम्पे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, चांदूरबाजार येथे दि. १३/०३/२०२२ रोजी पार पडलेल्या सर्वसाधारण सभेत एकमताने असा ठराव करण्यात आला आहे की, एप्रिल-जून २०२२ पासून अर्थसंवादचे पुढील सर्व अंक आजीव सदस्यांना **पोस्टाद्वारे न पाठवता आभासी पद्धतीने (Online)** उपलब्ध करून देण्यात यावेत. परिषदेचे संकेतस्थळ विकसित करण्याचे काम प्रगतीपथापवर आहे. संकेतस्थळ सरू झाल्यानंतर एप्रिल-जून २०२२ व त्यानंतरचे सर्व अंक संकेतस्थळावर प्रसिद्ध होतील, याची नोंद घ्यावी.

(टीप : उपरोक्त ठराव झालेल्या सभेचे इतिवृत्त कायम व्हायचे आहे तरीदेखील परिषदेच्या आर्थिक बाजूचा विचार करता या ठरावाची अंमलबजावणी करण्यास सभासदांची हरकत नसावी.)

**- कार्यवाह - खजिनदार**
**मराठी अर्थशास्त्र परिषद**

# कोल्हापूर संस्थानचे विकास प्रारूप

**राहुल शं. म्होपरे** †

**प्रास्ताविक :**

आजपासून १०० ते १२५ वर्षांपूर्वी जगाला जागतिकीकरण म्हणजे काय? याचा मागमूसदेखील नव्हता. त्या काळात जागतिकीकरणाची भाषा जगाला तिळमात्रसुद्धा माहीत नव्हती अशा परिस्थितीत राजर्षी शाहू महाराज यांनी ब्रिटिश राजवट असताना देखील चाणक्य नीतीचा वापर करून कोल्हापूर संस्थानला जगाशी जोडण्याचा यशस्वी प्रयत्न केला. जगातल्या विविध देशांतील ज्ञान-विज्ञानाचा अभ्यास करून तसेच त्याची प्रत्यक्ष पाहणी करून कोल्हापूर संस्थानात विदेशातील संस्थानला उपयुक्त असणाऱ्या गोष्टी कशा राबविता येतील याचा सातत्याने विचार करून राजर्षींनी कृतिकार्यक्रमाद्वारे कोल्हापूर संस्थानला जागतिक दर्जाचे बनविले. आपल्या अवघ्या २८ वर्षांच्या (१८९४ ते १९२२) कारकिर्दीत राजर्षींनी कोल्हापूर संस्थानची अशी प्रगती केली की, ज्यामुळे कोल्हापूर संस्थानचे त्या काळात आणि आजसुद्धा जगभर नाव झाले आहे. शेती, उद्योग, कामगार, शिक्षण, व्यापार, आरोग्य आणि सामाजिक सुधारणा इ. अर्थव्यवस्थेच्या सर्वच क्षेत्रांमध्ये राजर्षींनी आपल्या कारकिर्दीत क्रांतिकारक बदल केले. सदर बदल आजही कोल्हापूर जिल्ह्यालाच नव्हे तर संपूर्ण देशाला तथा जगाला मार्गदर्शक ठरणारे आहेत. थोडक्यात, लेखकाला संशोधनाअंती असे निदर्शनास आले आहे की, राजर्षी शाहू महाराजांनी राज्यकारभार करताना सातत्याने कल्याणकारी धोरण राबविले असून त्याद्वारे कोल्हापूर संस्थानच्या विकासाचे एक वैशिष्ट्यपूर्ण प्रारूप तयार झालेले आहे. राजर्षींच्या स्मृतिशताब्दीचे (६ मे, १९२२ ते ६ मे, २०२२) आणि जयंतीचे (२६ जून) औचित्य साधून प्रस्तुत लेखात आपण राजर्षींच्या कोल्हापूर संस्थानच्या विकास प्रारूपाचा अभ्यास करण्याचा प्रयत्न करणार आहोत.

**कोल्हापूर संस्थान आणि शेती :**

राजर्षींचे शेतीविषयक कार्य लक्षात घेतले असता असे दिसते की, राजर्षींनी निसर्गवाद्यांप्रमाणे (फ्रँसीस क्वेस्ने, जॅक टुर्गोट, मिरान् इ.) प्राधान्य क्रमाने शेतीला उत्पादक व्यवसाय मानले होते. निसर्गवाद्यांनी शेतीला दिलेले सर्वाधिक महत्त्व आणि त्यातून निर्माण होणारा वाढावा (Surplus) या गोष्टी राजर्षींनी कुर्मी क्षत्रिय परिषद, कानपूर येथून केलेल्या आपल्या अध्यक्षीय भाषणातून व्यक्त केल्या होत्या. निसर्गवाद्यांच्या आणि राजर्षींच्या विचारात एक महत्त्वाचा फरक होता. तो म्हणजे निसर्गवाद्यांनी शेती हा एकमेव उत्पादक व्यवसाय

† सहयोगी प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग (पदवी व पदव्युत्तर), देवचंद कॉलेज, अर्जुननगर, ता. कागल, कोल्हापूर.
आजीव सभासद क्र. : ११९४, भ्रमणध्वनी : ९९२३८७९०२०, ई-मेल : rahulmhopare@rediffmail.com

मानून कारखानदारी, व्यापार यांसारख्या व्यवसायांना अनुत्पादक मानले होते. वाढावा फक्त शेतीतूनच निर्माण होतो असा अतिरेकी विचार निसर्गवाद्यांनी मांडला होता. परंतु राजर्षींनी निसर्गवाद्यांप्रमाणे शेतीला जरी प्राधान्यक्रम दिला असला तरी कारखानदारी व व्यापार या व्यवसायांना अनुत्पादक न मानता उत्पादक मानले होते. त्याचप्रमाणे त्यांनी संस्थानात हस्तक्षेपी धोरण राबविले होते.

शेतीच्या अनुषंगाने कृषी प्रदर्शने भरविणे, शेती लागवडीचे विविध प्रयोग करणे, शेतीला जलसिंचनाची जोड देणे (उदा. राधानगरी धरण), शेतीला अत्यल्प व्याजाने कर्जपुरवठा करणे, शेतीच्या तुकडीकरणाला कायदा करून विरोध करणे यांसारख्या विविध क्रांतिकारक सुधारणांद्वारे राजर्षींनी संस्थानात शेती विकास घडवून आणला होता.

**कोल्हापूर संस्थान आणि कामगार धोरण :**

राजर्षी शाहू महाराजांनी आपल्या कारकिर्दीत श्रमाला संपत्ती मानून अतिशय महत्त्वाचे स्थान दिले होते. समाजातील कोणत्याही प्रकारचे काम उच्च अथवा हलक्या दर्जाचे नसते असे राजर्षींचे मत होते. राजर्षींनी संस्थानात श्रमविभागणीचा तथा शेतीतील छुप्या बेकारीला नष्ट करण्यासाठी प्रत्यक्ष-अप्रत्यक्षरीत्या जोरदार प्रयत्न केले. शेतीतील अतिरिक्त मजुरांनी उद्योग, व्यापार करावा असा मौलिक सल्ला राजर्षींनी कामगारांना दिला. फक्त सल्ला देऊनच थांबले नाहीत तर त्याअनुरूप कृती त्यांनी संस्थानात राबविली. सुप्रसिद्ध अर्थतज्ज्ञ नर्क्स आणि लेविस यांच्या विचारांशी साधर्म्य दर्शविणारे राजर्षींचे कामगारविषयक धोरण होते. संस्थानातील कामगारांना कामाच्या ठिकाणी विविध सोयी-सवलती पुरविणे, कामगार संघटनांना प्रोत्साहन देणे, कामगारांना योग्य वेतन मिळवून देणे या अनुषंगाने राजर्षींनी कामगारहिताचे धोरण कोल्हापूर संस्थानात राबविले होते.

**कोल्हापूर संस्थानातील शिक्षण :**

कोल्हापूर 'वसतिगृहांची माता' म्हणून ओळखले जाते. राजर्षींनी आपल्या कारकिर्दीत सर्वात जास्त महत्त्व शिक्षणाला दिले आहे असे वाटण्याइतपत शिक्षणासंदर्भातील मोठे काम राजर्षींनी संस्थानात केलेले दिसून येते. प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत मुला-मुलींना शिष्यवृत्त्या विविध जाती- धर्मांच्या मुलांसाठी विविध वसतिगृहे, महिला शिक्षणाकडे विशेष लक्ष, ग्रंथालयांना मदत, प्राथमिक शिक्षणाबरोबरच माध्यमिक आणि उच्च शिक्षणाकडे लक्ष, तंत्रशिक्षणावर भर, विविध प्रकारच्या शाळा (उदा. पाटील शाळा, सत्यशोधक शाळा, पुरोहित शाळा इ.) संस्थानातील हुशार विद्यार्थ्यांना विदेशी शिक्षणासाठी मदत यांसारखी अनेक सकारात्मक पावले उचलून राजर्षींनी संस्थानात शिक्षणाची गंगा निर्माण केली. संस्थानाबाहेरदेखील राजर्षींनी ही शिक्षणगंगा पोहचविण्याचे काम केले होते. राजर्षींच्या शैक्षणिक कार्याचा आढावा घेतल्यावर असे लक्षात येते की, राजर्षींनी मानवी भांडवल गुंतवणुकीची संकल्पना जी अमेरिकन अर्थतज्ञ प्रा. शूल्झ यांनी १९६२ साली जगापुढे सर्वप्रथम मांडली, ती कोल्हापूर संस्थानात त्यापूर्वीच राबविली होती.

**कोल्हापूर संस्थानातील व्यापार :**

राजर्षींनी त्यांच्या कारकिर्दीतील व्यापार वाढीसाठीचे केलेले प्रयत्न आणि त्यांचे व्यापारविषयक विचार लक्षात घेतले असता असे लक्षात येते की, राजर्षींचे उद्योग व व्यापारविषयक विचार आणि कृती ही व्यापारवादी विचारसरणीच्या धोरणाशी सुसंगत आहे. अर्थात, व्यापारवाद्यांनी (थॉमस मन, जीन बेडीन इ.) देशाच्या आर्थिक विकासासाठी उत्तम व्यापार, मध्यम कारखानदारी आणि कनिष्ठ शेती असा क्रम लावला होता. व्यापारवाद्यांनी शेतीला कनिष्ठ स्थान दिले होते. परंतु राजर्षींनी मात्र शेतीला वरिष्ठ स्थान दिले होते. परंतु तरीदेखील फक्त व्यापारासंदर्भातील राजर्षींच्या धोरणांचा

विचार केला असता व्यापारवाद्यांच्या विचारांशी व धोरणाशी तो साम्य दर्शवितो. कारण व्यापारवाद्यांच्या विचारांप्रमाणेच राजर्षींनीसुद्धा संस्थानातील विविध वस्तूंच्या निर्यातीला चालना देण्यासाठी प्रत्यक्ष, अप्रत्यक्षरित्या मदत केली होती. संस्थानातील सर्व प्रकारच्या उत्पादक उपक्रमांना सतत प्रोत्साहन देण्यासाठी राजर्षींनी विशेष प्रयत्न केल्याचे दिसून येते. यासाठी त्यांनी संस्थानातील काही उत्पादनांच्या बाबतीत पेटंट हक्क (बौद्धिक स्वामित्व) मान्य केले होते. तसेच नवीन उद्योगधंद्यांच्या उभारणीसाठी तज्ज्ञांचे मार्गदर्शनसुद्धा घेतले होते.

राजर्षींनी संस्थानात राबविलेल्या व्यापारविषयक धोरणाचा काही भाग ख्रिस्तपूर्व चौथ्या शतकातील आर्य चाणक्याच्या व्यापारविषयक विचारांशी साधर्म्य दर्शवितो. कारण चाणक्याने व्यापारवाढीसाठी दळणवळणाच्या सोई, बाजारपेठांची निर्मिती, बाजारपेठांचा विस्तार इ. बाबी आपल्या ग्रंथात मांडल्या आहेत. या सर्व गोष्टी राजर्षींनी संस्थानात राबविल्या होत्या. याबरोबरच वजने, मापे, तागडे यांची तपासणी करून खोटी वजने किंवा मापांच्या साहाय्याने व्यापार करणाऱ्यास कडक शिक्षा करावी असे आर्य चाणक्याने नमूद केले आहे. राजर्षींनीसुद्धा संस्थानात हे धोरण राबविले होते. यापुढे जाऊन चाणक्याची नगराच्या महाद्वारानजीक जकात नाके असावेत ही कल्पना राजर्षींनी कोल्हापूर संस्थानात राबवून व्यापारात सुसूत्रता आणली होती.

**कोल्हापूर संस्थान आणि उद्योग :**

राजर्षींनी कोल्हापूर संस्थानात खाजगी, संयुक्त आणि मिश्र अशा सर्वच क्षेत्रांतील उद्योगधंद्यांना प्रोत्साहन दिले होते. राजर्षींनी संस्थानातील अनेक उद्योगांच्या बाबतीत संरक्षणाचे धोरण राबविले होते. जे जर्मन विचारवंत फेड्रीक लीस्ट यांच्या संरक्षणवादी धोरणाशी साम्य दर्शविते. लीस्टने सांगितल्याप्रमाणे बाल्यावस्थेतील (प्राथमिक अवस्थेतील) उद्योगांना राजर्षींनी संरक्षण दिल्याचे दिसून येते. उदा. राजर्षींनी संस्थानात शाहू मिलची उभारणी केली होती. ही मिल स्थापन झाल्यापासून पुढे ३० वर्षांपर्यंत कोल्हापूर संस्थानात कोणालाही अशा प्रकारची मिल उभारण्यास बंदी घातली होती. फेड्रीक लीस्टने संरक्षणनीतीची जी प्रमुख वैशिष्ट्ये सांगितली आहेत ती वैशिष्ट्ये राजर्षींच्या संस्थानातील औद्योगिक धोरणाला लागू करून पाहिली असता ती फार मोठ्या प्रमाणात मिळती-जुळती असल्याचे संशोधनाअंती दिसून आले आहे.

**कोल्हापूर संस्थानचे राजस्व :**

राजर्षींच्या कारकिर्दीतील संस्थानच्या वित्तीय वर्षातील एकूण उत्पन्नाचा आणि एकूण खर्चाचा विचार केला असता असे दिसून येते की, राजर्षींच्या कारकिर्दीतील १९ वर्षे ही तुटीची होती तर १० वर्षांमध्ये आधिक्य निर्माण झाले होते. महत्त्वाची गोष्ट म्हणजे राजर्षींच्या कारकिर्दीदरम्यान अर्थव्यवस्थेवर सनातनवादी विचारसरणीचा प्रभाव अधिक होता. सनातनवाद्यांचा तुटीच्या अंदाजपत्रकाला आणि हस्तक्षेपनीतीला विरोध होता. असे असूनदेखील राजर्षींनी सनातनवाद्यांच्या विचारसरणीला शह देवून संस्थानात हस्तक्षेपनीती अवलंबिली. एवढेच नव्हे, तर संस्थानच्या विकासाच्या दृष्टीने योग्य असे गरजेनुरूप तुटीचे अंदाजपत्रक स्वीकारून आधुनिक अर्थशास्त्रज्ञांच्या विचाराची मुहुर्तमेढ केली होती. विशेष म्हणजे राजर्षींच्या पश्चात १९२९ च्या जागतिक महामंदीनंतर केन्स, हॅन्सेस व लर्नर या आधुनिक अर्थशास्त्रज्ञांनी तुटीच्या अंदाजपत्रकाचा पुरस्कार करून अर्थव्यवस्थेतील त्याचे महत्त्व लोकांना समजावून सांगितले. संपूर्ण जगाने त्याचा स्वीकार केला. थोडक्यात, राजर्षीच तुटीच्या अर्थसंकल्पाचे कार्यरूपी पुरस्कर्ते होते, हे सिद्ध होते.

**कोल्हापूर संस्थानातील दुष्काळ आणि आरोग्य:**

राजर्षींच्या कारकिर्दीत कोल्हापूर संस्थानात एकूण तीन (१८९६-९७, १८९९-१९०० आणि १९१८-

१९) दुष्काळ पडले. दुष्काळी परिस्थितीत राजर्षींनी संस्थानात अत्यंत चांगल्या पद्धतीने उपाययोजना राबविल्या. या सर्व उपाययोजनांचा संदर्भ जर नोबेल पारितोषिक विजेते भारतीय अर्थतज्ज्ञ डॉ. अमर्त्य सेन आणि त्यांचे सहकारी लेखक जॉन ड्रेझ यांच्या 'भूक आणि सार्वजनिक कृती' (Hunger and Public Action) या पुस्तकातील जगाच्या मुख्य दुष्काळी भागांचा अभ्यास करून मांडलेल्या दुष्काळाविरोधी उपाययोजनांशी जोडून पाहिला असता असे दिसून येते की, सेन व ड्रेझ या दोन अर्थतज्ज्ञांनी जगाच्या दुष्काळाचा अभ्यास करून सांगितलेल्या उपाययोजना, त्यांच्या अभ्यासाच्या अगोदर कितीतरी वर्षे राजर्षींनी कोल्हापूर संस्थानात प्रत्यक्षरीत्या राबविल्या होत्या आणि त्याद्वारे दुष्काळांवर यशस्वी मात केली होती.

कोल्हापूर संस्थानच्या आरोग्याच्या दृष्टीने विचार केला असता संस्थानात प्लेग, इन्फ्लूएन्झा अशा साथी आलेल्या होत्या. या काळात लसीकरण मोहीम, विलगीकरण कक्ष, मोफत औषधोपचार, स्वतंत्र दवाखाने इ. उपायांद्वारे राजर्षींनी या साथीच्या रोगावर मात केली होती. संस्थानातील प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी सरकारी दवाखाने राजर्षींनी उभारले होते. आज कोविड-१९ च्या काळात लसीकरणाचे आणि विलगीकरण कक्षाचे महत्त्व आपल्या लक्षात आले आहे. परंतु राजर्षींनी १०० वर्षांपूर्वीच हे सर्व संस्थानात केले होते. लसीकरणाची लोकांच्या मनातील भीती राजर्षींनी स्वत:ला व घरातल्या मंडळींना प्लेगची सर्वप्रथम लस देवून घालवली होती हे विशेष होय. राजर्षींचे आरोग्यविषयक कार्य प्रा. शूल्झ यांच्या मानवी भांडवल गुंतवणुकीच्या संकल्पनेत तंतोतंत बसते.

**कोल्हापूर संस्थानचे विकास प्रारूप :**

अशाप्रकारे उपरोक्त सर्व प्रमुख पैलूंचा आणि इतर बाबींचा अभ्यास करुन संशोधकाने राजर्षींचे कोल्हापूर संस्थानचे विकास प्रारूप खालीलप्रमाणे मांडले आहे.

**अ) पायाभूत सुविधांचा विकास : मुख्यत: रेल्वे, रस्ते, इमारती, बाजारपेठा आणि जलसिंचन:**

राजर्षींनी कोल्हापूर संस्थानचा सर्वांगीण विकास करण्याच्या उद्देशाने राज्यकारभाराची सूत्रे स्वीकारल्यापासूनच किंबहुना रेल्वेची १८९१ पासून संस्थानात सुरुवात करून सूत्रे स्वीकारण्यापासूनच संस्थानात पायाभूत सुविधा वाढविण्याकडे लक्ष दिलेले दिसून येते. कारण त्यांनी जाणले होते की, जर एखाद्या भागाचा सर्वांगीण विकास करावयाचा असेल तर त्याठिकाणी सर्वप्रथम रस्ते, रेल्वे, सार्वजनिक, इमारती, बाजारपेठा, जलसिंचन सुविधा इ.ची सोय असणे आवश्यक आहे. कारण या सर्व मूलभूत सुविधा उपलब्ध असतील तरच त्या भागातील उद्योग, व्यापार तसेच शेतीक्षेत्राचा विकास सर्वत्र शक्य आहे, अन्यथा नाही. म्हणूनच त्यांनी संस्थानात रेल्वेची सुरुवात करून आपल्या कामाला सुरुवात केली. रेल्वेबरोबर संस्थानातील सर्व खेड्यांना मुख्य महामार्गाशी, रेल्वे स्टेशनशी तसेच बाजारपेठांशी जोडण्यासाठी कच्च्या व पक्क्या रस्त्यांचे जाळे निर्माण केले. संस्थानचा कारभार विविध ऑफिसेसमधून व्यवस्थिरीत्या चालवता यावा; तसेच सरकारी नोकरांचा तसेच अनाथांच्या निवासाचा प्रश्न सुटावा म्हणून प्रशासकीयदृष्ट्या आवश्यक अशा सार्वजनिक इमारतींची संस्थानात नव्याने उभारणी तसेच दुरुस्ती केली. संस्थानातील शेती उद्योग व व्यापाराचा विकास घडवून आणण्यासाठी राजर्षींनी बाजारपेठांच्या विकेंद्रीकरणाचे धोरण अवलंबिले. यासाठी राजर्षींनी संस्थानातील महत्त्वाच्या ठिकाणी (उदा. शाहूपुरी, जयसिंगपूर इ.) व्यापारपेठा स्थापन केल्या. याद्वारे संस्थानातील शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती सुधारण्याचे प्रयत्न केले. याबरोबरच राजर्षींनी संस्थानातील शेतीचा विकास करण्यासाठी संस्थानात अनेक लहान-मोठ्या जलसिंचन प्रकल्पांवर खर्च केलेला दिसून येतो. परंतु सर्वात महत्त्वाचे म्हणजे राजर्षींनी

संस्थानात राधानगरी धरणाची निर्मिती करून संस्थानातील पाण्याचा प्रश्न कायमचा सोडविला. ज्यामुळे पुढे कोल्हापूर जिल्ह्यात हरितक्रांती घडून आली.

**ब) सर्वच स्तरांवर व्यावसायिक प्रशिक्षणाची जोड देवून शिक्षण व्यवस्थेला समान महत्त्व :**

राजर्षींनी शिक्षणाशिवाय कोणत्याही समाजाची प्रगती होणे शक्य नाही हे ओळखून कोल्हापूर संस्थानात शैक्षणिक चळवळ उभारली व त्यानुसार समाजाच्या प्रत्येक थरातील व्यक्तीला शिक्षण कसे मिळेल याकडे जाणीवपूर्वक लक्ष दिले. संस्थानातील उच्चवर्णीय लोकांच्या शिक्षणाच्या प्रमाणात मागासलेल्या समाजातील शिक्षित लोकांचे प्रमाण अगदीच नगण्य आहे हे लक्षात आल्यानंतर राजर्षींनी संस्थानात अस्पृश्य व मागास जातीतील लोकांच्या शिक्षणाची मोहीम हाती घेतली व संस्थानात विविध जातींची वसतिगृहे उभारली. अस्पृश्य व मागासलेल्या समाजातील विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी वेगवेगळ्या शिष्यवृत्त्या आणि गरीब व मागास विद्यार्थ्यांना फ्री शीप्स शिष्यवृत्त्या सुरू केल्या. सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे १९१७ साली संस्थानात प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत केले. स्पृश्य-अस्पृश्य भेद नष्ट करण्यासाठी अस्पृश्यांसाठी असणाऱ्या स्वतंत्र शाळा बंद केल्या. अशाप्रकारे मागासलेल्या जातीतील विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी अनेक प्रयत्न केले.

मुलांना फक्त पुस्तकी शिक्षण देवून ते समाजात आपले पोट भरू शकणार नाहीत म्हणून राजर्षींनी संस्थानात 'जयसिंगराव घाटगे तांत्रिक शाळा' चालविली होती. त्याबरोबरच औद्योगिक शिक्षणासाठी १९२० साली 'राजाराम इंडस्ट्रीयल स्कूल' सुरू केले होते, तर शेती शिक्षणासाठी 'द किंग एडवर्ड ॲग्रीकल्चरल इन्स्टिट्यूटची' स्थापना केली होती. याबरोबरच संस्थानात पाटील शाळा, सत्यशोधक शाळा, संरक्षण शाळा अशा विविध शाळा सुरू केल्या होत्या. महत्त्वाची गोष्ट म्हणजे राजर्षींनी फक्त विद्यार्थ्यांना शिक्षण देण्याच्या योजना सुरू केल्या नाहीत तर त्या विद्यार्थ्यांना शिक्षण देणाऱ्या शिक्षकांनासुद्धा प्रशिक्षण देण्याची सोय राजर्षींनी संस्थानात केली होती. उच्च शिक्षण क्षेत्रात आज यालाच ओरिएंटेशन तथा रिफ्रेशर कोर्स असे म्हटले जाते.

**क) सामाजिक-आर्थिक सुसंवाद प्रस्थापित करण्यासाठी सामाजिक विकास घडवून आणणे :**

राजर्षींच्या काळात संस्थानातील सामाजिक परिस्थिती लक्षात घेतली असता ती अत्यंत प्रतिगामी स्वरूपाची असलेली दिसून येते. त्याकाळात समाजात उच्चनीचतेचे प्रमाण मोठे होते. तसेच स्पृश्या-अस्पृश्यता मोठ्या प्रमाणात पाळली जात होती. अस्पृश्य व मागासलेल्या समाजातील गरीब लोकांना अत्यंत हलाखीचे जीवन जगावे लागत होते. उच्चवर्णीय लोक मागासलेल्या समाजातील लोकांचे मोठ्या प्रमाणात शोषण करीत होते. अशा परिस्थितीत राजर्षींनी संस्थानातील सामाजिक परिस्थिती सुधारून मोठ्या प्रमाणात सामाजिक-आर्थिक सुसंवाद घडवून आणला. सामाजिक सुधारणेसाठी राजर्षींनी जे प्रमुख धोरण अवलंबिले त्यातील मुख्य आयाम पुढीलप्रमाणे -

१. पुरेशा प्रमाणात शिक्षण मिळत नसल्यामुळे मागासलेल्या समाजातील घटकांचा विकास होवू शकत नाही, हे लक्षात आल्यानंतर यावर उपाय म्हणून २६ जुलै, १९०२ रोजी राजर्षींनी जाहीरनाम्यांद्वारे मागासलेल्या जातीजमातींसाठी सरकारी नोकरीत ५०% राखीव जागा ठेवण्यात याव्यात असे जाहीर केले.
२. सप्टेंबर, १९११ मध्ये महारांच्या वतनी जमिनी रयतावा केल्या; तसेच मागासलेल्या जातींच्या विद्यार्थ्यांना फी माफ केली.
३. १९१७ साली संस्थानात प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत केले.
४. २२ फेब्रुवारी, १९१८ मध्ये संस्थानातील बलुतेदारी पद्धती कायद्याने बंद केली.

५. २६ जून, १९१८ रोजी महारांवर कामाची सक्ती न करण्याचा व त्यांच्या जमिनी त्यांच्या नावावर करण्याचा राजर्षींनी जाहीरनामा काढला.

६. २७ जुलै, १९१८ रोजी अस्पृश्यांची गुलामगिरी नष्ट करणारा व त्यांना मानवी स्वातंत्र्याचे हक्क देणारा जाहीरनामा राजर्षींनी प्रसिद्ध केला.

७. ८ ऑगस्ट, १९१८ रोजी राज्यातील सरकारी व सर्वसाधारण खात्यांत अस्पृश्यांना अग्रक्रम द्यावा म्हणून राजर्षींनी आदेश काढला.

८. १ जानेवारी, १९१९ मध्ये अस्पृश्यांना समानतेची वागणूक द्यावी म्हणून वैद्यकी सेवा खात्याला राजर्षींनी आदेश दिला.

९. २ ऑगस्ट, १९१९ मध्ये स्त्रियांचा छळ व घटस्फोट याविषयी स्त्रियांना संरक्षण देणारा कायदा जारी केला.

१०. ३० सप्टेंबर, १९१९ मध्ये अस्पृश्यांच्या वेगळ्या शाळा बंद केल्या व सरकारी शाळांमध्ये सर्व जातीधर्माच्या मुलांना प्रवेश दिला.

११. ८ ऑक्टोबर, १९१९ रोजी संस्थानातील सर्व सरकारी व सार्वजनिक ठिकाणे अस्पृश्यांना खुली केली.

१२. १३ व १५ मे, १९२० रोजी करवीर गॅझेटमध्ये वेठबिगारी बंद केल्याचा हुकूम राजर्षींनी प्रसिद्ध केला व कायदा मोडणाऱ्यास जबर शासन करण्याचा आदेश दिला.

एकंदरीत वरील सर्व विवेचनावरून असे लक्षात येते की, राजर्षींनी संस्थानात सामाजिक-आर्थिक सुसंवाद घडवून आणण्यासाठी सामाजिक परिस्थितीच्या विकासाला प्राधान्य दिले.

**संदर्भ ग्रंथ यादी :**

१. इंगळे जे. एस. आणि शिंदे एम. एन. - राजर्षी शाहू महाराजांच्या विचारांचे आर्थिक, सामाजिक व राजकीय विचारवंतांच्या विचारांशी साधर्म्य (संशोधन लेख) स्मरणिका - २७ वी मराठी अर्थशास्त्र परिषद - २३ ते २५ नोव्हेंबर २००३.

२. पवार जयसिंगराव (संपादक) - राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर २००१.

३. Ghuge V. B. - Chhatrapati Shahu's Socialist Economic Policies (1894 to 1922), The Kolhapur Writers Co-operative Society Ltd. 1975.

४. Mhopare R. S. and Patil J. F. - Economic Policies and Programmes of Rajarshi Chhatrapati Shahu Maharaj - Deptt. of. Com. & Mgt., Shivaji University, Kolhapur, 2008.

५. Latthe A. B. - "Memories of His Highness Shri Shahu Chhatrapati Maharaj of Kolhapur, Vol. I & II, Time Press, Bombay, 1924.

◆

समस्या अशी आहे की उत्सर्जन उत्पादीत करणारे लोक त्या विशेषाधिकारांसाठी पैसे देत नाहीत आणि ज्यांचे नुकसान झाले आहे त्यांना मोबदला मिळत नाही.

**- विल्यम डी. बॉर्डहॉस**

# अपेक्षित अंदाजपत्रक आणि वास्तव अंदाजपत्रक : केंद्रीय अंदाजपत्रक २०२२-२३ च्या संदर्भात विश्लेषण

**पी. एस. कांबळे** †

**प्रास्ताविक :**

सरकारचे अंदाजपत्रक देशाचा आर्थिक सामाजिक विकास गतिमान करून, त्यांच्या लाभांचे अधिकाधिक समान पद्धतीने वाटप लोकांमध्ये करून सामाजिक न्याय प्रस्थापित करण्यास आणि सामाजिक कल्याण पातळी सुधारण्यास मदत करते. देशाच्या आर्थिक सामाजिक समस्या आणि आव्हाने विचारात घेऊन ती सोडविणे आणि विकासाची परिस्थिती सुधारण्यास मदत करणे अशी जबाबदारी आणि त्याअनुषंगाने अपेक्षा सार्वजनिक अंदाजपत्रकाकडून असते. भारताची वर्तमान परिस्थिती विचारात घेता आर्थिक वृद्धी सुधारण्याबरोबरच आर्थिक विषमता, बेकारी आणि दारिद्र्य वाढत असल्याचे दिसते. या पार्श्वभूमीवर केंद्रीय अंदाजपत्रक २०२२-२३ हे आर्थिक वृद्धी सुधारण्याबरोबरच विषमता, बेकारी आणि द्रारिद्र्य यांचे चक्रव्यूह भेदणारे असणे अपेक्षित आहे.

सार्वजनिक अंदाजपत्रक देशाच्या विकास धोरणाचा महत्त्वाचा घटक असतो. येत्या आर्थिक वर्षात देशात सामाजिक, आर्थिक विकासाचे स्वरूप आणि व्याप्ती काय असेल यांचे प्रतिबिंब अंदाजपत्रकात असते. या पार्श्वभूमीवर सरकारी अंदाजपत्रकाचे मूल्यमापन आपापल्यापरीने करण्याचा प्रयत्न सामाजातील अनेक घटक करत असतात. १ फेब्रुवारी, २०२२ रोजी अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी वर्ष २०२२-२३ साठीचे अंदाजपत्रक जाहीर केले आहे. त्याचे मूल्यमापन करताना, हे अंदाजपत्रक देशाची विस्कटलेली आर्थिक घडी सुधारण्याचा प्रयत्न करणारे, मात्र त्याच वेळेला आर्थिक विषमता, गरिबी, बेकारीकडे दुर्लक्ष करणारे अंदाजपत्रक आहे असे दिसते. भारताची वर्तमान परिस्थिती विचारात घेता आर्थिक वृद्धी सुधारण्याबरोबरच आर्थिक विषमता, बेकारी आणि दारिद्र्य वाढत असतानाच पर्यावरण प्रदूषण आणि हवामान बदल आणि त्याचे प्रतिकूल परिणाम अधिक तीव्र आणि व्यापक आहेत. अतिवृष्टी, महापूर, चक्रीवादळे, भूकंप, तीव्र उन्हाळा आणि इतर नैसर्गिक संकटांनी आणि त्यांच्या परिणामांनी डोके वर काढले असून, त्याचे परिणाम व्यापक, तीव्र आणि दूरगामी होत आहेत. याबरोबरच भारत हा तरुणांचा देश या पार्श्वभूमीवर ही केंद्रीय अंदाजपत्रक २०२२-२३ चे परीक्षण करणे महत्त्वपूर्ण ठरते.

सर्वसाधारणपणे देशात अस्तित्वात असलेली सामाजिक, आर्थिक परिस्थिती, समस्या आणि आव्हाने विचारात घेता त्या सोडवून आर्थिक, सामाजिक

† प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.
आजीव सभासद क्र. : ४८७, भ्रमणध्वनी : ९४२३०३३१७९, ई-मेल : pskamble2006@gmail.com

परिस्थिती सामाजिक कल्याण आणि जीवनमान सुधारावे अशी अपेक्षा देशातील नागरिकांची असते. अशाच अनुषांगिक अपेक्षा लोकांच्या सरकारी अंदाजपत्रकाकडून असतात. ते योग्य आणि बरोबरही असते. मात्र प्रत्यक्ष अंदाजपत्रकात या समाजाच्या अपेक्षा पूर्ण होतातच असे नाही. या पार्श्वभूमीवर, समाजाकडून अपेक्षित अंदाजपत्रक आणि प्रत्यक्ष अंदाजपत्रक यांचा तौलनिक अभ्यास करणे आवश्यक आणि उपयुक्त ठरते. ते समाजास आणि सरकारलाही उपयुक्त ठरू शकते. म्हणून प्रस्तुत निबंध समाजाच्या सरकारच्या अंदाजपत्रकाकडून असलेल्या अपेक्षा आणि प्रत्यक्षातील अंदाजपत्रक यांचे विश्लेषण केंद्रीय अंदाजपत्रक २०२२-२३ च्या संदर्भात करण्याचा प्रयत्न केला आहे.

**देशाची वर्तमान आर्थिक, सामाजिक स्थिती**

कोरोनाच्या दोन वर्षांच्या काळात देशाची आर्थिक परिस्थिती फारच बिघडली असून, विकासाची गाडी रुळावर आणणे आवश्यक आहे. मात्र फक्त तेवढेच पुरेसे नाही. कारण होणाऱ्या आर्थिक वृद्धीचे लाभ तळागाळातल्या माणसापर्यंत पोहचण्याबरोबरच आर्थिक विषमता नियंत्रित करुन रोजगार निर्मिती होणे, बेकारी नियंत्रित होणे आणि दारिद्र्य निर्मूलन होणे ही आवश्यक आहे. कारण चिरंतन विकासाची उद्दिष्ट्ये साध्य करण्याची ही निकड आणि गरज आहे. आर्थिक वर्ष २०२०-२१ मध्ये देशाच्या वास्तव स्थूल देशांतर्गत उत्पादनात (GDP) वाढ (उणे)-७.३% राहिली, जी २०१९-२० मध्ये धन ४% होती. याच काळात देशाचे दरडोई उत्पन्न -८.२% वाढले, ते गेल्या वर्षी २.५% होते. याच काळात दरडोई खाजगी उपभोग खर्च - १०.१ % वृद्धी दाखवितो, जी ४.४% होती. यावरून हे स्पष्ट होते की, स्थूल देशांतर्गत उत्पादनाबरोबरच दरडोई उत्पादन आणि खाजगी उपभोग खर्च ही मोठ्या प्रमाणात घटला आहे. आर्थिक उपक्रमनिहाय वृद्धी विचारात घेता, शेती (पूरक क्षेत्र वगळता) ३.६%, खानउद्योग -८.५%, वस्तू निर्माण -७.२% आणि बांधकाम -८.६% (उणे) वृद्धी दर्शवितात. याला देशातील घटत जाणारा रोजगार, वाढती बेकारी आणि त्यातून वाढत जाणारे दारिद्र्य जबाबदार आहेत. सी. एम. आय. ई.च्या मते, जानेवारी २०२२ मध्ये बेकारीचा दर राष्ट्रासाठी ६.७% होता, जो नैसर्गिक बेकारीपेक्षा किती तरी अधिक आहे. जो एप्रिल २०20 मध्ये २५% पर्यंत पोहचला होता. याचा परिणाम म्हणून देशातील गरिबी वाढत असल्याचे दिसून येते. कोरोनाच्या काळात कोट्यावधी लोक गरीब झाले आहेत. २०२१च्या आकडेवारीप्रमाणे, १३९.२५ कोटी एकूण लोकसंख्येपैकी ९.७६ लाख अत्यंत गरीब (१४.२६%) असून त्यातील ४.४८ कोटी पुरुष, तर ५.२८ कोटी स्त्रिया आहेत. आपली गरिबी रेषा संकुचित असल्याने नीती आयोगाने बहुआयामी गरिबी निर्देशांक (MPI) मोजला असून, त्याप्रमाणे गरिबीचे प्रमाण २५.०१% तर तीव्रता ४७.१३% आहे. राज्यनिहाय विचार करता बिहार, मध्यप्रदेश, झारखंड, उत्तर प्रदेश, मेघालयमध्ये सर्वात अधिक तर केरळा, गोवा, सिक्कीम, तमिळनाडू आणि पंजाबमध्ये सर्वात कमी गरिबी आहे, ते प्रमाण महाराष्ट्रात १४.८५% आहे. एका बाजूला देशाचा आर्थिक विकास होत असताना देशातील खाजगीकरण, शिथिलीकरण आणि नियंत्रण प्रयत्नांचा अभाव याचा परिणाम म्हणून आर्थिक विषमता अत्यंत टोकाला पोहचली असून वेगाने वाढत आहे, ते थोमस पिकेटी, Oxfam आणि इतर अनेक अहवालांनी दाखवून दिले आहे. जागतिक विषमता अहवाल २०२२ प्रमाणे, देशातील आर्थिक म्हणजेच उत्पन्न आणि संपत्तीतील विषमता अत्यंत उच्च पातळीवर पोहचली आहे. या अहवालाप्रमाणे, अतिश्रीमंत १०% लोकांकडे एकूण उत्पन्नाच्या ५७.१% आणि संपत्तीचा ६४.६% हिस्सा केंद्रित झाला आहे. अतिश्रीमंत १% कुटुंबाकडे हेच प्रमाण २१.७% आणि ३३% पातळीवर पोहचले आहे. गरीब ४०% कुटुंबाकडे

मात्र हेच प्रमाण फक्त १३.१% उत्पन्न आणि ५.९% संपत्ती एवढे अत्यल्प दिसून येते. दुर्दैवाने आर्थिक विषमता नियंत्रणाचे कोणतेही धोरण आणि उपाय आपल्या देशात दिसून येत नाहीत. या व्यतिरिक्त शिक्षण, आरोग्यप्रगती यासारख्या ही समस्या आहेतच.

आंतरराष्ट्रीय व्यापार विकासाचे इंजिन असल्याने ते फायद्याचे ठरविण्यासाठी आयात कमी करून निर्यात वाढ अपेक्षित असते. आपला आंतरराष्ट्रीय व्यापार तोट्याचा असून चालू खात्यावरील तूट GDP च्या ०.२% आहे. आपली आयात ही निर्यातीपेक्षा नेहमीच अधिक राहिली आहे. २०२१-२२ वर्षात पहिल्या तिमाहीशी तुलना करता तिसऱ्या तिमाहीत निर्यात (३९%) आणि आयात (५०%) हे दोन्हीही कमी झाले असले, तरी आपली सेवांची निर्यात ही आयातीपेक्षा अधिक असून, वाढीचा वेगही तुलनेने अधिक आहे. २०२१-२२ च्या तिसऱ्या तिमाहीत सेवांची निर्यात ६०% तर आयात ३७% राहिली आहे.

### २०२२-२३ अंदाजपत्रकाची दिशा / अपेक्षा

या पार्श्वभूमीवर, वर्ष २०२२-२३ मधील केंद्रीय अंदाजपत्रक भारतीय अर्थव्यवस्थेसमोरील वरील अत्यंत महत्त्वाची आर्थिक सामाजिक आव्हाने विचारात घेऊन तयार होणे अपेक्षित आहे. देशाचा आर्थिक वृद्धिदर म्हणजेच GDP चा दर आणि शेती वगळता उद्योग आणि सेवा क्षेत्र जी उणे वृद्धी दर्शवितात तिचे रूपांतर धन दरामध्ये करणाऱ्या धोरणांचा आणि उपायांचा समावेश अंदाजपत्रकात करणे आवश्यक आहे. यासाठी उद्योगातील भांडवल गुंतवणूक वाढीसाठी बँका आणि वित्तीय संस्थांनी कर्जपुरवठा सुलभ, स्वस्थ आणि वाढविणे आवश्यक आहे. त्यासाठी परकीय गुंतवूणक आकर्षित करण्याबरोबरच कर आणि इतर सूट व सवलती देणे अपेक्षित आहे. औद्योगिक क्षेत्रात लघु, मध्यम उद्योगांचे महत्त्व आणि योगदान अनेक कारणांनी महत्त्वाचे आहे. त्यामुळे त्यांना कर्जपुरवठा, सवलती आणि मदतीची गरज आहे. अर्थात, एकूण आणि क्षेत्रनिहाय आर्थिक वृद्धिदर सुधारताना त्यातून होणारी रोजगार निर्मितीकडे अधिक आणि गांभीर्याने लक्ष या अंदाजपत्रकात अपेक्षित आहे. फक्त कर्जपुरवठ्याची व्यवस्था न करता त्यांना आर्थिक मदत ही देण्याची व्यवस्था करण्याबरोबरच कर आणि इतर सूट व सवलती देणे अपेक्षित आहे. तसेच महात्मा गांधी रोजगार हमी योजना अधिक व्यापक आणि प्रभावी करण्याबरोबरच ती शहरी भागातही आणणे आवश्यक आहे. या आर्थिक वृद्धी सुधारण्याच्या आणि रोजगार हमी योजण्याच्या प्रयत्नातून रोजगार निर्मिती वाढून बेकारी कमी करण्यास मदत होण्याबरोबरच गरिबी कमी करण्यासही हातभार लागणार आहे. अर्थात, त्याला रोजगार धोरणाचा आधार द्यावा लागेल. याशिवाय , गरिबी निर्मूलनासाठी खास धोरण आणि तरतुदींची गरज आहेच, कारण चिरंतन विकास उद्दिष्टांमधील ते एक महत्त्वाचे उद्दिष्ट साध्य करायचे आहे. गरिबांना मोफत धान्य वाटप कार्यक्रम तसाच चालू ठेवण्याबरोबर त्यांना आर्थिक आधार देणारी वैश्विक आवश्यक उत्पन्न योजनेसारखी योजना प्रस्तावित करावी लागेल. गेल्या भूतकाळात आर्थिक विषमतेच्या प्रश्नावर कोणतीही चर्चा झालेली नाही आणि नियंत्रण धोरण व उपाय तर नाहीतच. ही विषमता आर्थिक, सामाजिक अस्थैर्य निर्माण करण्याबरोबरच उपभोगावर प्रतिकूल परिणाम करून आर्थिक विकासावरही प्रतिकूल परिणाम करू शकते. त्यासाठी विषमतेचा अत्यंत गांभीर्याने विचार करून स्वतंत्र आणि खास असे धोरण निश्चित करून त्यात प्रभावी अशा उपाय योजना आणि तरतुदी समाविष्ट कराव्यात. वर प्रस्तावित केलेले उपाय अंदाजपत्रकात प्रस्तावित करताना आणि त्यांच्या अंमलबजावणीसाठी खर्चाची तरतूद करावी लागेल आणि त्यासाठी महसूल संकलनही आवश्यक असेल. सुदैवाने आत्ता कोरोनाची तिसरी लाट नियंत्रणात येत आहे आणि आर्थिक व्यवहार हळूहळू पूर्वपदावर येईल, त्यातून महसूल वाढू शकेल.

मात्र तुटीचा फारसा विचार न करता ते करावे. कारण ही आर्थिक संकटाची स्थिती आहे.

**आर्थिक वृद्धी सुधारण्यास प्राधान्य**

कोरोनाच्या दोन वर्षांच्या काळात आपल्या आर्थिक वृद्धीचे प्रचंड नुकसान झाले आहे. वृद्धीची प्रचंड पडझड झाली आहे. आर्थिक वृद्धी आपल्या देशात घसरण्यास नोटाबंदीपासून सुरुवात झाली असून वस्तू आणि सेवा कराने त्यात वाढ करण्याचा प्रयत्न केला आहे. मात्र खरी आर्थिक वृद्धीची हानी कोरोनाच्या काळात आपण स्वीकारलेल्या टाळेबंदी, नियंत्रणे, बंधने यातून अधिक होऊन ती गतिमान झाली आहे. देशाचा वास्तव आर्थिक वृद्धिदर (GDP) वर्ष २०१९ मध्ये ६.५% होता तो २०२० मध्ये ३.७% पर्यंत घसरला. तो तसाच अधिकाधिक घसरत जाऊन कोरोना संकटकाळात अगदी रसातळाला जाऊन उणे झाला. वर्ष २०२१ मध्ये तो -६.६% पर्यंत पोहचला. मात्र येत्या आर्थिक वर्षात २०२२-२३ मध्ये ९.२% पर्यंत वाढेल आणि २०२३-२४ मध्ये तो ८.५% राहील, असा अंदाज केला आहे.

ही विस्कटलेली आर्थिक घडी सुधारून गतिमान करण्यासाठी आवश्यक उपाय आणि धोरणाची तरतूद करणे या अंदाजपत्रकात आवश्यक आणि अपेक्षित होते. त्याचाच भाग म्हणून या अंदाजपत्रकाने आपली तीन उद्दिष्ट्ये निश्चित केली आहेत. यात वृद्धी आणि समावेशक कल्याण यावर लक्ष केंद्रित करणे. तंत्रज्ञान प्रभावित विकास साध्य करून ऊर्जा परिवर्तन आणि हवामान बदल नियंत्रण कृती करणे, खाजगी गुंतवणूक, सार्वजनिक गुंतवणूक वाढविणे आणि नियमित करणे, यांचा प्रामुख्याने समावेश आहे. हे अंदाजपत्रक पंतप्रधान गतिशक्ती योजना, समावेशक विकास, उत्पादकता आणि गुंतवणूक वाढविणे, उपलब्ध संधी साध्य करणे, ऊर्जा परिवर्तन आणि हवामान बदल नियंत्रण कृती करणे यांना अग्रक्रम दिला जाणार आहे. कोरोना संकटातून अर्थव्यवस्था हळूहळू सुधारत आहे. जरी ती पूर्वपदावर आली नसली तरी हे वास्तव सत्य आहे. अर्थात, हे साध्य होण्यात लसीकरणाची मदत झाली असे म्हटले तर चुकीचे ठरणार नाही. भांडवलीखर्च वाढत आहे . मात्र भाववाढ ही अधिक असून ती वाढत आहे.

हे अंदाजपत्रक आर्थिक वृद्धी सुधारून आर्थिक घडी बसविण्यासाठी प्रमुख सात घटकांवर अवलंबून राहाणार आहे. यात रस्ते बांधणी, रेल्वे बांधणी, विमानतळ, बंदर विकास, रस्ते वाहतूक, जल वाहतूक आणि अत्याधुनिक इतर पायाभूत सुविधा विकसित करण्यावर भर देणार आहे. वर्ष २०२२-२३ मध्ये २५००० कि.मी.चे राष्ट्रीय महामार्ग बांधण्याचे काम पूर्ण केले जाणार आहे. सरकारी खाजगी तत्त्वावर लोजीस्टीक पार्क तयार केला जाणार आहे. पोस्ट आणि रेल्वे यांच्यात माल वाहतुकीसाठी समन्वय साधला जाणार आहे. ४०० आधुनिक रेल्वे सुरू करण्याचा प्रस्ताव आहे. वस्तू निर्माण क्षेत्र, लघु, मध्यम आणि सीमांत उद्योग विकासाबरोबरच स्टार्ट अपचाही विकास केला जाणार आहे. शेती विकासात नैसर्गिक शेती विकासास प्राधान्य आणि प्रयत्न केले जाणार आहेत. तसेच शेतीत डिजिटल तंत्रज्ञाचा वापर केला जाणार आहे. शेती माल प्रक्रिया उद्योग विकासासाठीही प्रयत्न केला जाणार आहे. विशेष आर्थिक क्षेत्र (SEZ) कायद्यात बदल करून एक नवीन कायदा प्रस्तावित करते आणि त्यातून औद्योगिक क्षेत्र निर्माण करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. या क्षेत्रात ICT चा वापरही केला जाणार आहे. आयात नियंत्रणाचे प्रयत्न करून आत्मनिर्भर भारतासाठीच्या काही तरतुदी या अंदाजपत्रकात आहेत. आयातीवरील आयातशुल्क सूट बंद करून किमान ७.५% आयातशुल्क आकारले जाणार आहे. संरक्षण क्षेत्रातील ६०% उत्पादन देशांतर्गत उद्योगांना राखून ठेवण्यात येईल. संरक्षण क्षेत्रात संशोधन आणि विकासास प्राधान्य दिले जाईल. इलेक्ट्रॉनिक्स उत्पादन, शेती अवजारे आणि यंत्रे, मासे उत्पादन,

इंधन तेले यांच्यावरील उत्पादन शुल्क कमी केले जाणार आहे. यातून देशातील आर्थिक घडी बसण्यास मदत होईल. आर्थिक वृद्धी सुधारून वृद्धिदर वाढू शकेल.

**विषमता, गरिबी, बेकारीकडे मात्र अक्षम्य दुर्लक्ष**

या अंदाजपत्रकाने देशातील रोजगार निर्मिती, बेकारी निर्मूलन, गरिबी निर्मूलन आणि विषमता नियंत्रण याकडे खूप दुर्लक्ष केल्याचे दिसते. त्यांच्या नियंत्रण आणि निर्मूलनाच्या उपाय आणि धोरणाचा समावेश नाही. आर्थिक वर्ष २०२०-२१ मध्ये देशाच्या वास्तव स्थूल देशांतर्गत उत्पादनात (GDP) वाढ (उणे) -७.३% राहिली, जी २०१९-२० मध्ये धन ४% होती. याच काळात देशाचे दरडोई उत्पन्न -८.२% वाढले, ते गेल्या वर्षी २.५%. याच काळात दरडोई खाजगी उपभोग खर्च -१०.१ % वृद्धी दाखवितो, जी ४.४% होती. यावरून हे स्पष्ट होते की स्थूल देशांतर्गत उत्पादनाबरोबरच दरडोई उत्पादन आणि खाजगी उपभोग खर्चही मोठ्या प्रमाणात घटला आहे. आर्थिक उपक्रमनिहाय वृद्धी विचारात घेता शेती आणि पूरक क्षेत्र वगळता ३.६%, खान उद्योग -८.५%, वस्तू निर्माण -७.२% आणि बांधकाम -८.६% अनुक्रमे अशी वृद्धी दर्शवितात. यास अर्थात देशातील घटत जाणारा रोजगार, वाढती बेकारी आणि त्यातून वाढत जाणारे दारिद्र्य जबाबदार आहेत. सी. एम. आय. ई.च्या मते, जानेवारी २०२२ मध्ये बेकारीचा दर राष्ट्रासाठी ६.७% होता, जो नैसर्गिक बेकारीपेक्षा किती तरी अधिक आहे. जो एप्रिल २०२० मध्ये २५% पर्यंत पोहचला होता. रोजगार निर्मितीत महत्त्वपूर्ण योगदान देणाऱ्या महात्मा रोजगार हमी योजनेसाठी या अंदाजपत्रकात खर्चाची तरतूद कमी केली आहे. तिचा शहरी भागाच्या अनुषंगानेही विचार करणे आवश्यक आहे. याचा परिणाम म्हणून देशातील गरिबी वाढत असल्याचे दिसून येते. कोरोनाच्या काळात कोट्यावधी लोक गरीब झाले आहेत. २०२१च्या आकडेवारीप्रमाणे, १३९.२५ कोटी एकूण लोकसंख्येपैकी ९.७६ लाख अत्यंत गरीब (१४.२६%) असून त्यातील ४.४८ कोटी पुरुष, तर ५.२८ कोटी स्त्रिया आहेत. आपली गरिबी रेषा संकुचित असल्याने नीती आयोगाने बहुआयामी गरिबी निर्देशांक (MPI) मोजला असून त्याप्रमाणे गरिबीचे प्रमाण २५.०१% तर तीव्रता ४७.१३% आहे. राज्यनिहाय विचार करता तो बिहार, मध्यप्रदेश, झारखंड, उत्तर प्रदेश, मेघालयमध्ये सर्वात अधिक तर केरळा , गोवा, सिक्कीम, तमिळनाडू आणि पंजाबमध्ये गरिबी सर्वात कमी आहे. ते प्रमाण महाराष्ट्रात १४.८५% आहे. एका बाजूला आर्थिक वृद्धी होत असताना देशातील खाजगीकरण, शिथिलीकरण आणि नियंत्रण प्रयत्नांचा अभाव याचा परिणाम म्हणून आर्थिक विषमता अत्यंत टोकाला पोहचली असून, वेगाने वाढत आहे, ते थोमस पिकेटी, Oxfam आणि इतर अनेक अहवालांनी दाखवून दिले आहे. जागतिक विषमता अहवाल २०२२ प्रमाणे, देशातील आर्थिक म्हणजेच उत्पन्न आणि संपत्तीतील विषमता अत्यंत उच्च पातळीवर पोहचली आहे. या अहवालाप्रमाणे, अति श्रीमंत १०% लोकांकडे एकूण उत्पन्नाच्या ५७.१%, तर संपत्तीचा ६४.६% हिस्सा केंद्रित झाला आहे. अतिश्रीमंत १% कुटुंबाकडे हेच प्रमाण २१.७% आणि ३३% पातळीवर पोहचले आहे. गरीब ४०% कुटुंबाकडे मात्र हेच प्रमाण फक्त १३.१% उत्पन्न आणि ५.९% संपत्ती एवढे अत्यल्प दिसून येते. शिक्षण आणि आरोग्य विकासाकडेही म्हणावे तसे लक्ष या अंदाजपत्रकाने दिलेले नाही.

**पर्यावरण स्नेही** (Eco friendly):

जगाबरोबर चिरंतन विकासाची उद्दिष्ट्ये आपणास २०३० पर्यंत साध्य करायची आहेत. त्यासाठी प्रदूषण नियंत्रण आणि नैसर्गिक साधनेसंरक्षण आणि संवर्धन करण्यासाठी पर्यावरणपूरक तरतुदी या अंदाजपत्रकात आपणास दिसून येतात. शेती खात्यासाठी १३२५१३.३८ कोटी रुपयांची तरतूद केली असून, प्रामुख्याने त्यातून रसायनमुक्त नैसर्गिक शेती विकासासाठी प्रयत्न गंगा

यासारख्या बाधित क्षेत्रात केला जाणार आहे. नद्या जोड प्रकल्पाच्या माध्यमातून शेतीला पाणी, पिण्यास पाणी आणि जल ऊर्जा निर्मितीसही प्रयत्न केला जाणार आहे, त्यासाठी ४४६०५ कोटी रुपये या अंदाजपत्रकात प्रस्तावित केले आहेत. तापमान वाढ आणि हवामान बदल नियंत्रित करण्यासाठी २८० गिगा वॅट सौर ऊर्जा वर्ष २०३० पर्यंत निर्माण करायची असून त्यासाठी १९५०० कोटी रुपये तरतूद केले आहेत. याबरोबरच अधिकाधिक Digital तंत्राचा वापर करून सर्व प्रकारचे पर्यावरण प्रदूषण थोपविण्याचा प्रयत्न येत्या वर्षात केला जाणार आहे.

**वृद्धीचा कणा असलेला तरुण दुर्लक्षितच**

भारत हा तरुणांचा देश आहे. ६२% पेक्षा अधिक लोकसंख्या तरुण १५ ते २९ वर्षे वयोगटातील आहे. त्यामुळेच माजी राष्ट्रपती APJ अब्दुल कलाम, 'भारत हा तरुणाचा देश असून २०२० पर्यंत त्यांच्या जीवावर देश आर्थिकदृष्ट्या महासत्ता होणार', असे त्यांचे भाकीत होते. देशातील तरुण हे Engine of Growth आहे, असे त्यांचे मत होते. अर्थात, त्यासाठी त्यांचा उत्पादक उपयोग करून घ्यावा लागेल.२०२०-२१ मध्ये देशाच्या वास्तव स्थूल देशांतर्गत उत्पादनात (GDP) वाढ (उणे) -७.३% राहिली, जी २०१९-२० मध्ये धन ४% होती. याच काळात देशाचे दरडोई उत्पन्न -८.२% वाढले, ते गेल्या वर्षी २.५%. याच काळात दरडोई खाजगी उपभोग खर्च १०.१% वृद्धी दाखवितो. देशातील घटत जाणारा रोजगार, वाढती बेकारी आणि त्यातून वाढत जाणारे दारिद्र्य जबाबदार आहेत. सी. एम. आय. ई.च्या मते, जानेवारी २०२२ मध्ये बेकारीचा दर राष्ट्रासाठी ६.७% होता, जो नैसर्गिक बेकारीपेक्षा किती तरी अधिक आहे. मात्र पायाभूत सुविधा आणि इतर औद्योगिक विकासातून निर्माण होणारी रोजगार निर्मिती वगळता रोजगाराचा विचार या अंदाजपत्रकात नाही. यातून येत्या पाच वर्षांत ६० लाख रोजगार म्हणजे प्रतिवर्षी फक्त १२ लाख रोजगार निर्माण होईल. तर जर वर्षी किती तरी लाख काम मागणारे हात निर्माण होतील. औपचारिक रोजगार निर्मितीचे उपाय आणि तरतुदी या अंदाजपत्रकात अपेक्षित होत्या. मात्र तसे दिसत नाही. तसेच केंद्र सरकार पातळीवरील नोकर भरती संदर्भात कोणतेही सुतोवाच या अंदाजपत्रकात अजिबात केलेले नाहीत. तरुण मानव संसाधनाचा विकास करण्यासाठी शिक्षणाची आवश्यकता असते. शिक्षण खर्चाच्या तरतुदीचा प्रामुख्याने Online शिक्षण देण्यासाठी TV चॅनेलची संख्या २०० पर्यंत करणे. Virtual प्रयोगशाळा आणि Digital कौशल्ये विकसित करणे, शिक्षकांनी E-content विकसित करणे, एक Digital विद्यापीठ स्थापन करण्याचा प्रस्ताव या अंदाजपत्रकात आहे. नवीन शिक्षण धोरणाचा तरुणांवर प्रतिकूल परिणाम होण्याची शक्यता आहे. तरुणातील वाढत असलेल्या बेकारीचा विचार हे अंदाजपत्रक करत नसल्याने त्यांच्यासाठी आणि इतर काही किमान वैश्विक योजना याचा विचार झालेला नाही. हे अंदाजपत्रक आरोग्य क्षेत्राकडेही दुर्लक्ष करते. गेल्या वर्षाशी तुलना करता या वर्षात आरोग्यावरील तरतुदीत उल्लेखनीय कपात केली आहे. मात्र जागतिक आरोग्य संघटनेने कोविडसारखे अनेक विषाणू भविष्यात उद्भवू शकतात, या इशाऱ्याकडे पूर्ण दुर्लक्ष झाले आहे, ते महागात पडू शकते. या व्यक्तिरिक्त कोणत्याही तरतुदी या अंदाजपत्रकात नाहीत.

**आंतरराष्ट्रीय व्यापार फायद्याचा करण्याची संधी गमावली**

हे अंदाजपत्रक विशेष आर्थिक क्षेत्र (SEZ) कायद्यात बदल करून एक नवीन कायदा प्रस्तावित करते आणि त्यातून औद्योगिक क्षेत्र निर्माण करण्याचा प्रयत्न करणार आहे. या क्षेत्रात ICT चा वापर करणार आहे. सेवांच्या निर्यात वाढीसाठी प्रेरणा प्रोत्साहन देणाऱ्या तरतुदी आणि उपायांची आवश्यकता होती. मात्र तसा प्रयत्न अंदाजपत्रकात झालेला नाही. मात्र आयात नियंत्रणाचे प्रयत्न करून आत्मनिर्भर भारतासाठीच्या

काही तरतुदी या अंदाजपत्रकात आहेत. आयातीवरील आयातशुल्क सूट बंद करून किमान ७.५% आयात शुल्क आकारले जाणार आहे. संरक्षण क्षेत्रातील ६०% उत्पादन देशांतर्गत उद्योगांना राखून ठेवण्यात येईल. संरक्षण क्षेत्रात संशोधन आणि विकासास प्राधान्य दिले जाईल. इलेक्ट्रॉनिक्स उत्पादन, शेती अवजारे आणि यंत्रे, मासे उत्पादन, इंधन तेले यांच्यावरील उत्पादन शुल्क कमी केले जाणार आहे.

**२०२२-२३ अंदाजपत्रकात आवश्यक सुधारणा / दुरुस्त्या**

रोजगार धोरण निश्चित करून नेमका किती रोजगार निर्माण होणार आहे ते स्पष्ट करणे आवश्यक आहे. आर्थिक वृद्धी आणि रोजगार यांची सांगड घालणे अत्यंत गरजेचे आहे. रोजगार धोरण निश्चित राबवावे. आर्थिक वृद्धी आणि रोजगारनिर्मित यांच्यातील संबंध विचारात घ्यावा. महात्मा गांधी रोजगार हमी कार्यक्रम अधिक व्यापक करून तो शहरी भागातही लागू करणे आवश्यक आहे. रोजगार हमी योजना अधिक व्यापक आणि प्रभावी करून ती फक्त ग्रामीण नव्हे, तर शहरी भागातही राबवावी. केंद्र सरकारची खाती आणि उपक्रमातील नोकर भरती सुरू करणे. केंद्र सरकार पातळीवरील सर्व प्रकारची नोकर भरती सुरू करावी. तासिका तत्त्वावरील आणि करार पद्धती बंद करण्याबरोबरच पूर्णवेळ आणि नियमित भरती करून सार्जनिक क्षेत्राचे खाजगीकरण आणि कामाचे Outsourcing बंद करावे.

विषमता नियंत्रणाचे ठोस उपाय असलेले धोरण निश्चित करून त्याची अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. शिक्षण आणि आरोग्यावरील खर्च वाढवून पायाभूत सेवा आणि शिक्षक आणि कर्मचारी भरती करणे यास अग्रक्रम द्यावा. या तरतुदी आणि धोरणाचा समावेश करून हे अंदाजपत्रक अधिक समावेशक आणि प्रभावी करण्यास मदत होईल. स्थलांतरित कामगारांचे पुनर्वसन करून अनौपचारिक क्षेत्रात सामाजिक सुरक्षितता सुविधा उपलब्ध कराव्यात. तरुणांना बेकारी भत्ता द्यावा आणि किमान आवश्यक उत्पन्न योजना राबवावी. या बदलातून खऱ्या अर्थाने हे अंदाजपत्रक तरुणांना न्याय देणारे आणि वास्तव होऊ शकेल.

वस्तू व्यापार तोट्याचा असल्याने आणि सेवा व्यापार मात्र फायद्याचा असल्याने तो वाढविण्यासाठी आर्थिक मदत, कर्जपुरवठा, कर सूट आणि सवलती देण्याची आवश्यकता होती. आपली सेवांची निर्यात वेगाने वाढत आहे आणि प्रामुख्याने ICT आणि संगणक सेवांना मागणी असल्याने त्यांची निर्यात वाढविण्यासाठी प्रयत्न न झाल्याने झाल्याने या अंदाजपत्रकाने ती संधी गमावली आहे. ही उपलब्ध संधी साध्य करून घेण्याचा प्रयत्न करणे अत्यंत आवश्यक आणि गरजेचे आहे.

**निष्कर्ष आणि सूचना**

केंद्रीय अंदाजपत्रक २०२२-२३ चे अपेक्षित अंदाजपत्रक आणि प्रत्यक्ष अंदाजपत्रक यांचा तौलनिक अभ्यास केल्यानंतर अनेक बाबी निदर्शनास आल्या. आर्थिक पाहाणीतून प्रतिबिंबित झालेले प्रश्न, आव्हाने आणि समस्या या अंदाजपत्रकात प्रतिबिंबित झाल्या नाहीत. त्यांचा अग्रक्रम आणि त्या सोडविण्यासाठी उपाय आणि तरतुदी या अंदाजपत्रकात दिसून येत नाहीत. त्यामुळे या समस्या निरुत्तरित आणि सोडविण्यावाचून तशाच पडून राहतील याचा प्रतिकूल परिणाम सामाजिक, आर्थिक विकासावर होईल. तसेच लोकांच्या आणि समाजातील विविध घटकांच्या अपेक्षाही या अंदाजपत्रकाने फारशा विचारात घेतल्या नाहीत. त्याचा प्रतिकूल परिणाम लोकांच्या सामाजिक कल्याण पातळीवर होणार. अंदाजपत्रक एक वर्षाचा दस्तऐवज असताना त्यात येती पाच वर्षे आणि याच्याही पुढे जाऊन पंचवीस वर्षे विचारात घेतल्याने अंदाजपत्रकाचे स्वरूपच बदलले असून, मुख्य बाबींकडे दुर्लक्ष होण्यास मदत झाली आहे. याचा परिणाम म्हणून हे अंदाजपत्रक वास्तवतेकडून अंदाजाकडे अधिक झुकण्यास मदत झाली.

अशा प्रकारचे अंदाजपत्रक प्रथमच पाहण्यास मिळाले.

सार्वजनिक अंदाजपत्रक हे आर्थिक पाहणीतील सामाजिक आणि आर्थिक प्रश्न आणि आव्हाने सोडविण्यास अग्रक्रम देणारेच असावे. कारण आर्थिक पाहणी हाच सार्वजनिक अंदाजपत्रकाचा खरा मार्गदर्शक असतो. अर्थमंत्रालयाने समाजातील लोकांच्या अपेक्षा आणि प्रतिक्रिया अंदाजपत्रक तयार करण्यापूर्वी आणि ते सादर केल्यानंतरही संकलित करून त्यातील महत्त्वाच्या अंदाजपत्रकात समाविष्ट कराव्यात. शिक्षक, संशोधक, विद्यार्थी आणि इतर जाणकारांची अंदाजपत्रक विषयक मते आणि सूचना समजावून घ्याव्यात आणि त्यातील योग्य अशा अंदाजपत्रकात सुधारणा करताना समाविष्ट कराव्यात. भारतीय संविधान हा अंदाजपत्रकाचा आधार असावा आणि सामाजिक समता, न्याय आणि कल्याण साध्य करणाऱ्या तरतुदी नेहमीच अंदाजपत्रकात अंतर्भूत कराव्यात.

**समारोप**

सार्वजनिक अंदाजपत्रक हे सरकारच्या विकास धोरणाचे महत्त्वाचे अंग आणि प्रमुख घटक असतो. देशातील आर्थिक व्यवहार आणि आर्थिक वृद्धी व सामाजिक कल्याणावर थेट परिणाम करणारा घटक या नात्याने सार्वजनिक अंदाजपत्रकाकडे गांभीर्याने पाहणे आवश्यक आहे. याचदृष्टीने सरकार, नोकरशाही आणि समाज म्हणजेच लाभधारक या नात्यांनी अंदाजपत्रकाची तयारी, तरतुदी आणि अंमलबजावणीकडे लक्ष देणे आवश्यक आहे. त्यामुळे सामाजिक आणि आर्थिक विकास साध्य करण्याबरोबरच सामाजिक कल्याणात वाढ घडवून आणणे शक्य होणार आहे. त्यामुळे अंदाजपत्रकाच्या कर्त्यांनी, अंमलबजावणी करणाऱ्यांनी आणि लाभधारकांनी आपआपली भूमिका प्रामाणिकपणे आणि निष्ठेने पाडणे आवश्यक आहे. अन्यथा, अपेक्षित आणि वास्तव अंदाजपत्रक यांच्यात मोठी तफावत राहून त्याचे हेतू आणि फलश्रुती यांच्यात फारकत राहील.

**संदर्भ ग्रंथ यादी**


1. Economic and Political Weekly, Various Issues in February and March 2022.
2. Government of India (2021-22), Economic Survey 2022-23, Ministry of Finance, New Delhi.
3. Government of India (2022-23), Budgetary Documents 2022-23, Ministry of Finance, New Delhi.
4. Herber, B. P. (1967), Modern Public Finance, Richard D. Irwin, Homewood.
5. Jha, R. (1998), Modern Public Economics, Routledge, London.
6. Lekhi, R.K (2020), Public Finance, Kalyani Publishers, Ludhiana.
7. Mundell, S. (1999), Public Finance Policy: Issues for India, Oxford University Press, New Delhi.
8. Musgrave, R. A. (1959), The Theory of Public Finance, McGraw Hill, Kogakhusa, Tokyo.
9. Musgrave, R. A. and P. B. Musgrave (1976), Public Finance in Theory and Practice, McGraw Hill, Kogakusha, Tokyo.
10. Shoup, C. S. (1970), Public Finance, Aldine, Chicago.
11. Sreekantaradhya, B. S. (1972), Public Debt and Economic Development in India, New Delhi.
12. Tyagi, B. P. (2020), Public Finance, Jai Prakash Nath Company, Meerut, UP.
13. Daily Economic Times, Various Issues in February and March 2022.
14. Daily Loksatta, Various Issues in February and March 2022.
15. Daily Times of India, Various Issues in February and March 2022.


◆

# ग्रामीणांना वर्षभर रोजगार देणारी योजना

**रमेश ल. बिडवाई** †

**पार्श्वभूमी :**

भारत देश अनेक गंभीर व जटील समस्यांनी जखडला आहेत. 'बेरोजगारी' या प्रश्नाने अधिकच रूद्ररूप धारण केले आहे. याचे मूळ ब्रिटिशांच्या वसाहतवादी कूट धोरणातून जन्माला आले आहे. हिंदुस्तानला विकासाच्या शिखरावर पोहचविणाऱ्या कुटीर आणि ग्रामोद्योगांना जाणीवपूर्वक नष्ट करून बेकारी आणि दारिद्र्याच्या; कधीच न संपणाऱ्या संकटात त्याने लोटले.

भारताला स्वातंत्र्य प्राप्त होऊनही थोडीथोडकी नव्हे तर ७५ वर्षे लोटली आहेत. तरीसुद्धा विकास योजनेने बेरोजगारी आणि अल्प उत्पन्न या समस्या सोडविल्या नाहीत. या जुळ्या भावंडांनी देशभर दारिद्र्याचे साम्राज्य पसरविले आहे. देशवासियांच्या जीवनात अंधकार पसरविला. शहरी बेकारांना या व्यथेची जाणीव आहे. परंतु असंघटित ग्रामीण तरुण वर्गाला त्या संदर्भात अद्यापही जागृती नाही. शहरी बेकारीच्या तुलनेत ग्रामीण भागातील बेरोजगारी ४८ प्रतिशत अधिक आढळते.

भारताच्या ग्रामीण भागात ८३ कोटी ३८ लक्ष जनता राहते. (२०११) यापैकी ८० प्रतिशत ग्रामीण गरीब आहे. १९४७-१९४८ मध्ये सुद्धा हे प्रमाण ८०% इतकेच होते. ग्रामीण कार्यक्षम जनतेपैकी ५०% पेक्षाही अधिक तरुण-तरुणी बेरोजगारीच्या खाईत सापडलेले आहेत. ग्रामीण मजुरांना वर्षातील केवळ १०० ते १२५ दिवससुद्धा शेतीमध्ये रोजगार उपलब्ध होत नाही, स्त्रियांना तर वर्षातील जास्तीत जास्त ६० ते ७० दिवस काम मिळते.

खेड्यापाड्यांत शेती व्यवसायाशिवाय दुसरा मार्ग नाही. पर्यायी क्षेत्राच्या अभावामुळे खेड्यातील मजुरांना वर्षातील सुमारे २०० ते २५० दिवसांपेक्षाही जास्त काळ बेरोजगार राहण्याशिवाय गत्यंतर नसते. मनरेगामध्ये वर्षातून १०० दिवस काम देण्याची कायदेशीर तरतूद आहे. ग्रामीण नवजवानांना पूर्ण वर्षे रोजगार उपलब्ध करून देणारी अद्यापही कोणतीच व्यवस्था देशात आढळत नाही. ग्रामीण भागात पूर्ण बेकारी, अपूर्ण बेकारी, सुप्त बेकारी व सुशिक्षितांची बेकारी यांचे अस्तित्व आहे. 'ग्रामीण बेकारी किती आहे याबद्दलचे अज्ञान ही खरी शोकांतिका आहे.' (डॉ. मालकम अदिशेषया)

ग्रामीणांची बेरोजगार अवस्था आणि दारिद्र्य संपुष्टात आणण्यासाठी शासनाने अनेक प्रकारे प्रयत्न केले. परंतु बेकारीची तीव्रता कमी होण्याऐवजी वाढलेली

† निवृत्त प्राध्यापक (अर्थशास्त्र), जी. एस. गावंडे कॉलेज, उमरखेड, जि. यवतमाळ
आजीव सभासद क्र. : ५६७, भ्रमणध्वनी :८४२१८५०२६४, ई-मेल : rameshbidwai44@gmail.com

दिसते. राष्ट्रीय नमुना पाहणीमध्ये असे आढळून आले आहे की, विकेंद्रित औद्योगिकरणाच्या अभावामुळे आणि आजारी उद्योगांच्या समस्यांमुळे ग्रामीणांना शेतीशिवाय उपजीविकेचे पर्यायी मार्गच नाहीत. प्रत्येक दशकात कृषिमजुरांचे प्रमाण वाढत आहे. या संदर्भात भारतीय रिझर्व्ह अधिकोषाचा अहवाल अधिक बोलका आहे. १९६०-६१, १९७०-७१ व १९८०-८१ या तीन दशवार्षिक पाहाणीमध्ये एकूण कार्यक्षम लोकसंख्येतील कृषिश्रमिकांचे प्रमाण १७.२ टक्क्यावरून २९ टक्क्यापर्यंत वाढले. २०११च्या जनगणनेनुसार एकूण कार्यक्षम लोकांपैकी ४० प्रतिशत भूमिहिन व १० प्रतिशत अल्पभूधारक मजूर असे ५० प्रतिशत शेतमजूर आढळतात. देशाच्या ग्रामीण भागातील २४ कोटीपेक्षा अधिक तरुणांना रोजच्या रोज कामकाजाची आवश्यकता असते (२०११).

**शेतकामासाठी मजुरांच्या मागणीत घट :**

अनेक वर्षांपासून शेतीसाठी मजूरवर्गाची मागणी अनेक कारणांमुळे घटत आहे. देशात ५२% शेतजमीन जिरायत आहे, यांत्रिकीकरणाने वेग पकडला आहे. तणनाशकांचा वापरही वाढला आहे. अलीकडे पर्जन्यमान अधिक अनिश्चित झाले आहे. हवामानात परिवर्तन होत आहे. शेतीचा उत्पादन खर्च अतोनात वाढला आहे, तर कृषिमालाच्या किंमती अल्प आहेत. कृषक गरीब आणि कर्ज बाजारी झाला आहे. शेतकरी अस्मानी संकटात सापडलेला असून त्याला योग्य मार्गदर्शनाची कमतरता आहे. शेतकऱ्यांमध्ये साहस राहिलेले नाही. परिणामतः शेती व्यवसायात रोजगार संधीची कमतरता निर्माण झाली आहे.

**शेतमजूर संख्येत वाढ पण रोजगार संधीत घट :**

अशा परिस्थितीमुळे ग्रामीण बेरोजगारीचा दर सतत वाढत आहे. शेतीमध्ये प्रामुख्याने वर्षातून तीन वेळा पिके घेतली जातात. खरीप हंगाम, रब्बी हंगाम व उन्हाळी हंगाम अशा प्रत्येक ऋतू कालखंडात ग्रामीण बेकारीचे स्वरूप विभिन्न आढळते. ते तक्ता क्र. ०१ मध्ये स्पष्ट केले आहे. बेरोजगारीबाबतचा अहवाल राष्ट्रीय आर्थिक निरीक्षण केंद्राने घोषित केला आहे. त्यात देशात ६. ५७% बेरोजगारी असल्याचे दर्शविले. तर 'सेंटर फॉर मॉनेटरींग इकॉनॉमी' (CMIE) या संस्थेने फेब्रुवारी २०२२ मध्ये देशात बेरोजगारीचा दर वाढून तो ८.१% झाला आहे, तर ग्रामीण भागातला तो दर ८.३५% इतका दर्शविला आहे. ग्रामीण बेकारीचा दर काढण्यासाठी श्रमशक्ती पाहणी अहवालात पुढील सूत्राचा वापर केला. ते सूत्र वापरून निरनिराळ्या कालखंडात वेगवेगळ्या हंगामाच्या काळात ग्रामीण बेकारीचा दर पुढीलप्रमाणे आढळला. सूत्र :

RUL = (UN) -TL+UN) x 100

RUL = श्रमिक बेरोजगार दर

UN = बेरोजगार संख्या

TL = एकूण श्रमिक संख्या

पुढील तक्त्यात १९५० - ५१ ते १९८० - ८१ या चार दशकात खरीप हंगामात शेतीच्या कामासाठी मजूरांची कमतरता होती. परंतु त्यापुढील दशकात खरीप हंगामात सुद्धा बेरोजगारी निर्माण होण्यास प्रारंभ झाला आणि पुढील दशकात त्यात पुष्कळ वाढ होत गेली.

प्रत्येक दशकात रब्बी आणि उन्हाळी पीक हंगामात बेकारीचा दर लक्षणीय आहे. प्रत्येक चार मजुरात दोन मजूर साधारणतः बेकार राहातात.

**देशाचे भयानक चित्र**

८० टक्क्यांपेक्षा अधिक लोकसंख्या असंघटित अशा प्राथमिक क्षेत्रात आहे. अख्खा ग्रामीण परिसर बेकारी आणि गरिबीने जर्जर झाला आहे. देशातील मौल्यवान श्रम शक्ती अक्षरशः व्यर्थ जात आहे. आर्थिक विकासासाठी मानवी भांडवल हा घटक सर्वाधिक महत्त्वाचा आहे. 'मनुष्याचे कार्य जितके कुशल तितके देशातील जीवनमान उच्च पातळीचे बनते' (प्रा. देविका चावला). 'असंघटित क्षेत्र', 'रोजगार निर्मितीच्या दृष्टीने

**तक्ता क्र. ०१ भारतात - ग्रामीण बेरोजगार दर**

| कालखंड | खरीप हंगाप | रब्बी हंगाम | उन्हाळी हंगाम |
|---|---|---|---|
| १९५०-५१ | -३७.६० | ४२.९४ | ४७.७५ |
| १९६०-६१ | -७१.२० | ४२.५४ | ४८.१८ |
| १९७०-७१ | -४४.२९ | ४२.२८ | ४७.१६ |
| १९८०-८१ | -३७.२१ | ४०.२० | ४५.७४ |
| १९९०-९१ | ०७.६३ | ४२.०२ | ४५.५८ |
| २०००-०१ | १९.४५ | ४४.३८ | ४६.९४ |
| २०१०-११ | ३४.३४ | ४२.४३ | ४३.५४ |
| २०२०-२१ | ३०.४१ | ४०.८९ | ४३.९६ |
| २०३०-३१ | ३२.८१ | ४०.५७ | ४३.७८ |
| २०४०-४१ | ३८.९१ | ४२.७९ | ४४.८० |
| २०५०-५१ | ४१.८२ | ४३.८४ | ४५.३९ |
| २०६०-६१ | ४३.३० | ४४.६३ | ४५.८० |

संदर्भ : निरनिराळ्या वर्षातील जनगणना माहिती आणि वरील सूत्राद्वारे तयार केलेला तक्ता.

महत्त्वाचे आहे' (प्रा. हरमरकर). भारतातील सुमारे १.५ कोटीपेक्षा अधिक जनसंख्या भुकेली असते' (ग्लोबल हंगर निर्देशांक). 'जगामधील ५ वर्षाच्या आतील कमी वजन असणाऱ्या मुलांपैकी ४२% मुलं भारतातील आहेत' (ग्लोबल हंगर निर्देशांक). डॉ. अभय बंग म्हणतात, 'वैद्यकीय उपचाराअभावी भारतात मुलांच्या मृत्युचे प्रमाण लक्षणीय आहे.' 'देशात ३८% ग्रामीण बालक व २५% जनता कुपोषित आणि कमी वजन असणारी आहे. बालमृत्यूदर ६४ असून माता मृत्यु प्रतिलाख ४०८ आहे आणि निम्मे ग्रामीण महिला अशक्त व रक्ताशयाने ग्रस्त आहेत.' तरुणांची कार्यक्षमता ऱ्हास पावत आहे. आर्थिक अनिष्ठांना त्रासून देशात अजूनही दरवर्षी ३८ हजार शेतजमजूर आणि १४ हजार शेतकरी बांधव आत्महत्या करीत आहेत. शेतकऱ्यांच्या तुलनेत शेतमजुरांची आत्महत्या २७२% आहे. देशातील ४२% शेतकरी शेतीक्षेत्रातून बाहेर पडण्याच्या मनःस्थितीत आहे.

वरील स्थिती आणि ग्रामीणांचा मनःस्ताप या मागील कारणे अनेक असली तरी प्रमुख कारण आहे. 'ग्रामीण बेकारी.' दुसऱ्या शब्दात ग्रामीण भागातील रोजगार संधीचा जबरदस्त अभाव. वर्षभर नियमित व शाश्वत रोजगार व इष्ट मजुरी मिळू लागल्यास पुष्कळ अनिष्ठे संपुष्टात येतील. गरिबीचे दुष्टचक्र आणि आत्महत्या या विषयाला पूर्णविराम मिळू शकतो. महामहिम पूर्वराष्ट्रपती मा. डॉ. अब्दुल कलाम म्हणाले होते, 'जोपर्यंत खेड्याचा विकास होत नाही. तोपर्यंत देशाचा विकास होणार नाही.' 'भारतात ६६ ते ७०% लोक खेडेगावात राहातात. तेव्हा खेड्यातील विकासाचे अडसर दूर करून खेड्यांना स्वयंपूर्ण व स्वावलंबी बनविणे जरुरीचे आहे' (अमर्त्य सेन).

**शाश्वत ग्रामीण पूर्ण रोजगार योजना : प्रस्तावना :**

जवाहर रोजगार योजना, पंतप्रधान स्वयंरोजगार योजना, कौशल्य विकास योजना, मनरेगा, उद्योगासाठी ऋण वितरण, अनुदाने, आय.आर.डी.पी., मुद्रा योजना अशा डझनो योजना शासनाने पुष्कळ वर्षापासून ग्रामीण भागातील रोजगाराच्या निर्मितीसाठी तयार केल्या आहेत. या योजना यशस्वी होऊ शकल्या नाहीत, योजना व्यापकता गाठण्यास समर्थ नाहीत (नंदकुमार बोधगिरे, योजना अंक). योजना चुकीच्या असाव्यात असे मत या संशोधकाने व्यक्त केले आहे. दारिद्र्याची व बेरोजगारीची समस्या सुटण्याऐवजी अधिकच गंभीर होत आहे. पूर्वापार चालत आलेली बेकारी व दारिद्र्य सहजासहजी साथ सोडण्यास तयार दिसत नाही. तितक्या प्रभावी शक्तिमान उपाययोजनेची आवश्यकता आहे.

या सर्व परिस्थितीचा आणि सर्व दिशांनी सूक्ष्म दृष्टीने विचार व अध्ययन करून हमखास यशस्वी होणारी अशी ग्रामीण पूर्ण रोजगार योजना तयार करण्याचा संशोधकाने याठीकाणी प्रयत्न केला आहे. अशा प्रभावी योजनेचे स्वरूप पुढीलप्रमाणे.

भारताच्या प्रत्येक खेडेगावात एक श्रम विकास केंद्र असेल आणि या केंद्रातील जाणते अधिकारी खेडेगावातील कृषी, उद्योग व सेवा क्षेत्राचा विशिष्ट पद्धतीने सर्वांगीण विकास करतील, त्यातून पर्याप्त रोजगार संधी निर्माण करून पूर्ण व शाश्वत रोजगार अवस्था अस्तित्वात आणतील. त्याद्वारे खेड्यांच्या पर्यायाने संपूर्ण देशाचा कायापालट होईल, देश पूर्ववत 'सुवर्णाची चिडियाँ' बनेल.

मनुष्याला अगदी प्राचीन काळापासून जंगली प्राणी, श्वापदासोबत, निसर्गासोबत प्रचंड संघर्ष करावा लागला, जिवंत राहण्यासाठी लढावे लागले. प्रतिकार करणे हेच त्याचे जीवन बनले. विश्वाच्या प्रगतीमुळे संघर्ष टळेल, असे वाटणेही चुकीचे ठरले आहे. कारण आजही जगातील ८० - ९०% लोकांना आर्थिक अन्यायाला, दारिद्र्य व बेकारी, विविध सामाजिक अन्यायाला व अनिवार्य कृत्याचा प्रतिकार करूनच जीवन जगावे लागत आहे. मनुष्याच्या जीवनातील संघर्ष संपलेला नाही. प्रस्तुत रोजगार योजना अमलात आली आणि जनसहभाग प्राप्त झाला म्हणजे समाज संघर्ष मुक्त होणार हे नक्की.

**रोजगार योजना : योजनेचे स्वरूप :**

**१) ग्रामीण श्रम विकास केंद्र :** (Villege Lobour Devlopement center = VLDC)

अ) प्रमुख केंद्र : (Main Center / office)

साधारणतः १५०० ते २००० लोकवस्तीच्या खेडेगावात एक एक प्रमुख रोजगार केंद्र राहील.

ब) उपकेंद्र : (Sub Center / office)

देशातील ६ लक्ष खेड्यांपैकी ४०% लहान लहान खेडी व वाड्या - वस्तीचे गावे आहेत. ४ - ६ वाड्या अथवा लहान लहान खेडी मिळून मध्यवर्ती ठिकाणी एक प्रमुख श्रम विकास केंद्र आणि त्या प्रत्येक लहान वस्तीच्या खेड्यामध्ये (अथवा दोन-तीन वाड्या मिळून एक एक उपश्रम विकास केंद्र राहील.)

**२) ग्रामीण श्रम विकास केंद्राधिकारी**

या विकास केंद्राचे सर्व अधिकारी हे चौफेर अभ्यासू भरपूर जिज्ञासू, प्रमाणिक आणि कठोर परिश्रम करणारे असे अत्यंत निष्णात असतील. त्यांना पुरेसे व विविध स्वरूपाचे प्रशिक्षण दिले जाईल. देशसंरक्षणासाठी ज्या प्रमाणे जवान घडविले जातात त्याप्रमाणे सर्व अधिकारी वर्गाला तावून-सुलाखून ग्रामविकास कार्यासाठी प्रशिक्षित करण्यात येईल. ज्याप्रमाणे प्रत्येक कुटुंब प्रमुख हा स्वतःच्या सुखदुःखाची तमा न बाळगता कुटुंबातील लहान-थोरांचा लौकिक वृद्धिंगत करण्यासाठी अहोरात्र सातत्याने प्रयत्नशील असतो त्याप्रमाणे गावातील सर्व लोकांच्या सुखसमाधानासाठी, गावाच्या उन्नतीसाठी झटणारा अधिकारी असावा.

**ग्रामीण श्रम विकास केंद्राची कार्य आणि जबाबदारी -** पाचवीला पूजलेली ग्रामीण बेकारी आणि

पिच्छा न सोडणारी बेकारी समूळ नष्ट करण्यासाठी आवश्यक ती सर्व प्रकारची कार्यविकास केंद्राधिकाऱ्यांना करावयाची आहेत.

**प्रमुख कार्य पुढीलप्रमाणे - कार्य :**

**१) मजुरांसाठी असणाऱ्या मागणीची नोंद घेणे-**

ज्या शेतकरी बांधवांना शेतीच्या कामासाठी मजुरांची आवश्यकता असेल, अशांनी विकासकेंद्रावर जाऊन अथवा दुरभाषा भ्रमणध्वनीवरून किमान एक दिवस आधी किती मजुरांची गरज आहे ते नोंदवावे.

**२) मजुरांच्या पुरवठ्याची नोंद करणे -**

गावातील श्रमीक वर्गाला रोज काम मिळणे आवश्यक असते. प्रत्येक श्रमिकाने केंद्रात जाऊन किमान एक दिवस आधी तशी नोंद करावी.

**३) श्रम मागणी पुरवठ्याचा मेळ बसविणे आणि सर्वांना रोजगार उपलब्ध करून देणे -**

गावात विशिष्ट दिवशी शेतकामासाठी किती श्रमिकांची मागणी आहे आणि गावात किती श्रमिक उपलब्ध आहेत हे समजल्यानंतर नियोजनपूर्वक श्रमविभाजन करण्यात येईल. ज्या दिवशी मजुरांच्या मागणीच्या तुलनेत पुरवठा अधिक राहील तेव्हा त्या अतिरिक्त सर्व मजुरांनाही रोजगार उपलब्ध करून दिला जाईल, तो असा i) शेजारच्या ज्या ज्या खेडेगावात शेतकामासाठी मजुरांची कमतरता निर्माण होईल त्या त्या गावात अतिरिक्त मजुरांना आवश्यकतेनुसार पाठविण्याची व्यवस्था करण्यात येईल. असे गाव ४ - ६ किलोमीटर अंतरावर असेल तर तिथे केंद्राच्या खर्चाने मजुरांना पाठविण्याची व्यवस्था करण्यात येईल. ii) अतिरिक्त सर्व मजुरांना शेजारच्या गावात जर काम उपलब्ध होऊ शकत नसेल, तर त्या सर्व शिल्लक मजुरांना विविध ठिकाणी काम देण्याची व्यवस्था केली जाईल. जसे

अ) वनविभाग, वृक्षसंगोपन, रोपवाटिका संगोपन, आयुर्वेदिक वृक्ष लागवड व संगोपन, वनउत्पादने गोळा करणे, जलसाठ्यांची निर्मिती भूपृष्ठीय भूगर्भीय जलसंधारणाची कामे, पाणी आडवा - पाणी जिरवाची कामे, मत्स्य उत्पादन व कंपोस्ट व तत्सम खतांची निर्मिती, रस्ते व पाणंद दुरुस्ती, गावपरिसराची स्वच्छता, सांडपाण्याची व्यवस्था, रस्ते बांधकाम, विविध इमारतीची बांधकाम, कार्यालयाच्या इमारती, सभागृह, कार्यशाळा, सुसंस्कार केंद्राची ग्रंथालय इमारत, दवाखाने, निवास, गावठाणे, पुनर्निर्माण बांधकाम, धान्य गोदाम, औद्योगिक उत्पादन, संकुल बांधकाम, शाळा इमारत, सार्वजनिक सभागृह, मंगल कार्यालयाची बांधकाम इ.

**ब) विविध उत्पादन कार्य -** औद्योगिक उत्पादन गृह व ग्राम उपयोगी रोजच्या उपयोगांच्या वस्तुची निर्मिती, नित्य उपयोगी वस्तू, लाकडी-बांबूच्या वस्तू, शालेय साहित्य, गणवेश व तयार कपड्यांची उत्पादन, खाद्यपदार्थ व पेय पदार्थ, बेकरी उत्पादने, दुग्धजन्य पदार्थाची निर्मिती, जैविक इंधन प्रकल्प, रेशीम किडेपालन, मधमाशा पालन

(क) वाहन दुरुस्ती, वीज उपकरण दुरुस्ती, दूरदर्शन संच, दूरभाषा संच दुरुस्ती अशा स्वयंव्यवसायाच्या कार्याला प्रोत्साहन देणे इ. मार्गाने रोजगार संधी वाढवून पूर्ण रोजगार अवस्था निर्माण केली जाईल. वाचकांना असा प्रश्न पडेल की, भारतातील सूक्ष्म, मध्यम, लघु उद्योगांच्या आजारी पडण्याचे प्रमाण लक्षणीय आहे. नागपूरचे प्रसिद्ध पत्रकार म्हणाले, 'भारतात दर कामाच्या दिवशी ९० लघुउद्योग आजारी पडतात.' मग खेड्यात लघुउद्योगाचे जाळे कसे निर्माण होऊ शकेल? परंतु वाचक हो, पुढील पद्धतीचा अवलंब करून या दोषापासून मुक्ती मिळेल. सुधारणा अशी आहे की, विकासकेंद्र औद्योगिक वस्तूंच्या निर्मितीसाठी स्वतः व्यवस्था करेल. केंद्र प्रशस्त इमारत बांधणार, मजुरांना प्रशिक्षित करणार, कच्चामाल उत्पादनाची आवश्यक अवजारे, यंत्रसामुग्री इ. सर्व साहित्य मजुरांना विकास केंद्राकडून पुरविले जाईल आणि मजुरांनी केलेले उत्पादनही

विकासकेंद्राकडून जमा केले जाईल. मजुरांना उत्पादनाच्या आधारावर मोबदला दिला जाईल. केंद्राकडून जमा करण्यात आलेल्या वस्तुंचा संग्रह करून तसेच वेगवेगळ्या खेड्यांतून जमा झालेल्या वस्तुचा एकत्रित साठा विशिष्ट यंत्रणेद्वारे केला जाईल. ही यंत्रणा जमासाठा निरनिराळ्या बाजारपेठेमध्ये विकण्याची व्यवस्था करेल. या पद्धतीमुळे आजारी उद्योगाच्या समस्या उद्‌भवणार नाहीत आणि मजुरांना रोजगार मिळत जाईल.

ड) पाऊस पडला म्हणजे अनेकवेळा मजुरांना शेतातील कामे करणे शक्य नसते. अशावेळीसुद्धा मजुरांना रोजगार दिला जाईल. विकासकेंद्राने निर्माण केलेल्या उत्पादन गाळ्यामध्ये जाऊन वस्तुंचे उत्पादन कार्य व्यवस्थित करता येईल. धो-धो पाऊस सुरू असताना सुद्धा छताखाली काम करता येईल. एक तास ही बेरोजगार राहाण्याची मजुरांना वेळ येणार नाही.

इ) जे अंग मेहनतीचे काम करू शकत नाहीत अशा सुशिक्षित व कुशल कामगारांना त्याच्या लायकीची कामे दिली जातील.

ई) कृषी प्रक्रिया उद्योगामध्ये अनेक प्रकारचे अभियंता, तज्ज्ञ, कौशल्य, विकास प्रशिक्षकांनासुद्धा कामाची संधी मिळू शकते.

प) गावांच्या विकासामुळे आरोग्य सुविधांची मागणी वाढेल आणि त्या प्रकारच्या लोकांना रोजगार उपलब्ध होईल.

सातत्याने रोजगार आणि अर्थप्राप्तीमुळे दारिद्र्यातून सुटका होते. खेडी स्वयंपूर्ण होतील. म. गांधी, पं. नेहरू, डॉ. अब्दुल कलाम आणि आपल्या सर्वांचे स्वप्न साकार होईल. देशाची प्रगती तुफान वेगाने होईल.

**४) रोजगाराच्या पुरेशा संधीची निर्मिती -**

गावात पुरेशा रोजगार संधी निर्माण होण्यासाठी पुढील प्रकारची उपाययोजना करण्यात येईल.

**अ) भरपूर कृषी विकास -**

अनादी काळापासून अद्याप पावेतो कृषी व्यवसाय हाच खेडेगावातील उत्पन्नाचा प्रमुख आधार आहे. परंतु चार-पाच दशकांपासून शेतीव्यवसाय डबघाईस आलेला आहे. शेतीव्यवसाय परवडत नाही म्हणून ४२ प्रतिशत शेतकरी कृषी व्यवसाय सोडू इच्छितात. ग्रामीण कृषक हा कठोर मेहनती आहे. तो सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंत शेतात राबतो तरी त्याला पोटभर खायला मिळत नाही की, आपल्या मूलभूत गरजा भागविता येत नाहीत. या परिस्थितीत आमूलाग्र बदल करण्यासाठी केंद्राधिकारी झटतील. मुळात शेतकरी आपल्या व्यवसायात साक्षर नाही, अज्ञानी आहेत. सर्व प्रथम हा दोष घालवण्यासाठी इष्ट त्या सुधारणा केल्या जातील. कार्यशाळा, तज्ज्ञाकडून मार्गदर्शन प्रात्यक्षिक प्रयोग, सभा याद्वारे त्यांचे शेतीव्यवसायाचे अज्ञान संपविले जाईल. त्यांच्याकडून प्रत्यक्षात सुधारित शेती करवून घेतली जाईल, त्यांच्या प्रत्येक कृतीकडे लक्ष दिल्या जाईल. कृषी साहित्याची खरेदी असो की मालाची विक्री असो, त्यांच्या सर्व कार्याकडे पुरेसे लक्ष दिले जाईल, पीक पेरणी ते पीक काढणी, संग्रह, वसुली या सर्वांकडे पुरेपूर लक्ष दिले जाईल, मार्गदर्शन केले जाईल. गावातील सर्व शेतकऱ्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी केंद्राधिकारी आणि त्याची चमू कार्य करील. थोडक्यात, कृषकांची सर्वांगीण प्रगती करून रोजगार संधीमध्ये पुरेशी वाढ करण्यात येईल. या अशा विशाल कामामुळे ३००-४०० कुटुंब असणाऱ्या खेडेगावात एक प्रमुख रोजगार विकास केंद्राची आवश्यकता आहे.

**ब) ग्रामीण औद्योगिकरणाला प्रोत्साहन देणे -**

ग्रामीण औद्योगिक प्रक्रियाच भारताला सुसंपन्न बनविणारी आहे हे सांगण्यासाठी कोण्या ज्योतिष्याची आवश्यकताच नाही. खेड्यात उपलब्ध होणारा जो माल असेल त्या प्रकारचे उद्योगधंदे उभारले जावे. पुरेशा स्थानिक तरुण-तरुणींना त्या दृष्टीने प्रशिक्षित

केले जाईल व उत्पादनासाठी आवश्यक असणारी व्यवस्था केंद्राधिकाऱ्याच्या नियंत्रण मार्गदर्शन व सहकार्याने सुरू केली जाईल. ग्रामीण कार्यक्षम लोकामध्ये भरपूर उपक्रमशीलता निर्माण केली जाईल. त्यांच्यात उत्पादन निर्मितीचे साहस पैदा केले जाईल. त्यांना खात्री मिळू शकली म्हणजे ते आघाडीवर राहतील. आजपर्यंत उपक्रम हा लाभदायक असतो याची खात्री पटवून देण्याची कामगिरी झालेली नाही. विकास केंद्र व चमू हा उपक्रम करेल. पैसा कुठे गुंतवावा असा प्रश्न बहुतांश गावातील लोकांना असतो.

**क) प्रक्रिया उद्योगाच्या निर्मितीला चालना देणे -**

एकदल, द्विदल धान्य, तेलबिया, कापूस, ज्यूट, फळे इ. कृषिमालाचे उत्पादन कृषी विकासामुळे भरपूर वाढणार आहे. अशा सर्व मालावर १०-१५ खेडेगावांच्या मध्यवर्ती स्थळी कृषिमाल प्रक्रिया उद्योगांची निर्मिती करून विकेंद्रित औद्योगिकरणाची व्यवस्था करण्याचे नियोजनबद्ध प्रयत्न केले जातील. परिणामतः स्थानिकांना रोजगार मिळेल व शहरी कौशल्यप्राप्त धारकांनाही रोजगार मिळेल. शहरी बेकारीलासुद्धा आळा बसेल.

**ड) स्वयं उपक्रमाला चालना देणे -**

पशु व पक्षी पालन, जलचर संगोपन, दुग्धजन्य पदार्थ, अंडी, पक्षी, मच्छी यांना सर्वत्र मोठ्या प्रमाणावर मागणी आहे. परंतु त्यांचे उत्पादन कमी आहे. विद्युत उपकरणे, वाहतूक साधने यांच्या दुरुस्तीच्या केंद्राची गरज वाढणार, प्लंबर, वेल्डींग, सुतार, लोहार, हॉटेल्स, इमारत बांधकामाचे साहित्य इ. ग्रामीण व परिसर यांच्या प्रगती बरोबर या वस्तूची सर्वांची मागणी वाढल्यानंतर रोजगाराच्या संधीमध्ये वाढ होते. अशा विविध प्रकारच्या स्वयंउपक्रमाला सर्व प्रकारे साहाय्य केले जाईल. मुख्यमंत्री कै. वसंतराव नाईक हे नेहमी 'स्वयंरोजगाराचे' प्रतिपादन करीत असत.

**५) अधिकोषण सुविधाविषयक कार्य :**

खेड्यात पुरेशी उत्तम अधिकोषण सुविधा निर्माण केली जाईल. अधिकोषण व्यवहार हा स्वायत्त असेल. हे सर्व विकास केंद्राच्या मार्गदर्शक सूचनेखाली केले जाईल अशी व्यवस्थाच निर्माण केले जाईल. शेतकरी, मजूर, अन्य सर्व उत्पादक, दुकानदार अशा सर्वांची देणी-घेणी लहान असो की मोठ्या प्रमाणावर असो ती धनादेशाद्वारे केली जावी अशी व्यवस्था करण्यात येईल व सर्वांमध्ये त्या विषयीची साक्षरता जोपासण्याचे कार्य विकास केंद्र अधिकारी करतील. कर्ज वितरण, कर्जवसुलीसुद्धा धनादेशाद्वारे करण्यात येईल. रोखीने व्यवहार नाममात्र स्वरूपाचे असतील अशी मानसिकता सर्वांमध्ये निर्माण केली जाईल. कर्जाची परस्पर वसुली केली जाईल, उत्पन्न वाढल्यामुळे कर्ज थकीत हा प्रश्नच उरणार नाही आणि आत्महत्येचा विचारही मनाला शिवणार नाही.

**६) सांस्कृतिक कार्याचे व्यवस्थापन आणि आदर्श ग्रामस्थांची निर्मिती : पार्श्वभूमी :**

सुसंस्कृत व आदर्श नागरिक हीच तर राष्ट्राची खरी संपत्ती आहे. अनेक वर्षांच्या दारिद्र्यामुळे आणि अपोषक वातावरणामुळे मनुष्यप्राण्याला तणावाचे, संघर्षाचे जिणे जगणे भाग पडत आहे, त्यातून अमानवीय कृती जोपासल्या गेल्या. सिम्सने म्हटल्याप्रमाणे, १८९०-१९२० हा कालखंड ''हा संपूर्ण काळ ग्रामीण समाजाच्या पतनाचा काळ होता.'' १९व्या शतकाच्या पूर्वाधामध्ये औद्योगिक क्रांतीमुळे अनेक समस्या निर्माण झाल्या. उपासमार, बेकारी, दारिद्र्य विषमता, अमानवीता, न्यूनगंड, भयाची निर्मिती झाली (डॉ. संदीप आगलावे, ग्रंथ-ग्रामीण आणि नागरी समाजशास्त्र, २००२, पृ.११).

मनुष्य संधीसाधू बनला आहे. अनेक प्रसंगी घात होत आहेत. फसवेगिरी वाढली आहे, शेती असो की औद्योगिक क्षेत्र; तसेच घरकामासाठीसुद्धा मजूर मिळणे भयंकर कठीण झाले आहे. प्रस्तुत कार्याचे सर्वेक्षण प्रसंगी अनेकजन (माजी विद्यार्थी, पुढारी इ.) म्हणाले, 'ज्या शेतमजुरासाठी तुम्ही काम करत आहात,

उन्हापावसात, कोरोना महामारीचे भय न बाळगता फिरत आहात. आम्ही तर मजुरामुळे त्रासून गेलो आहोत. अहो सर, मजुरांना कामाची काय गरज, त्यांना तर मोफत राशन मिळत आहे, त्यांना कामाची निष्ठा राहिली नाही. अनेकवेळा प्रचलित मजुरीपेक्षा वाढीव मजुरी ठरवूनसुद्धा ते कामाला येण्याचे टाळतात. काही बोलावे तेही शक्य राहिले नाही.' सर्वच मजूर ह्या प्रवृत्तीचे नसतीलही; परंतु बहुतांश मात्र निश्‍चित सापडतील.

**सांस्कृतिक कार्यक्रमाद्वारे स्वभावात परिवर्तन :**

ग्रामस्थ शैक्षणिकदृष्ट्या प्रगत नसेलही; परंतु तो मुळात माणुसकी जपणारा आहे, भारतीय संस्कृतीचा आदर करणारा आहे. भोवतालचे वातावरण गढूळ झाल्यामुळे, आपण कितीही चांगले वागलो तरी उपयोग नाही. म्हणन तोही अमानवीय कृत्य करतो. एकाचे पाहून सर्वजन तसेच वागतात.

**योग्य मार्गदर्शन व चांगल्यांचा सहवास निर्मिती :**

विश्वास व उपदेशातूनच परिवर्तन घडवून आणता येते. डॉ. कुमार सप्तर्षी म्हणतात, ''भारताची संस्कृती प्राचीन आहे.'' याज्ञवल्क्य मुनी म्हणाले, ''कुठलाही व्यक्ती घडतो तो अनुकरणामुळे, संस्कारामुळेच.'' 'संस्कार' म्हणजे 'दोषपनयन' दोष घालविणे आणि 'गुणदान', गुणाची प्राप्ती करविणे.' डॉ. अरविंद पारसनीस म्हणतात, ''संस्कार दोन प्रकारचे, एक 'सहज' असतो तर दुसरा 'आहाय', जाणीवपूर्वक केलेला असतो. संस्काराशिवाय जीवनशैलीत इष्ट ते परिवर्तन शक्य नसते.'' प्रथमतः प्रत्येकाच्या मनावर संस्कार केले जाईल. मनुष्याच्या कल्याणासाठी झटले पाहिजे. इतरांच्या सुखात, आनंदात आपले हित आहे, अशी शिकवण सर्व ग्रामस्थांना दिली जाईल, गढूळ वातावरणाचे पूर्णपणे शुद्धीकरण केले जाईल. तेलगु संतकवी योगी वेमना म्हणतात,

'मधाचे पोळे ये इतरांच्या कामा ।।'

वृक्षाच्या पानावर कित्येक दिवसाची साचलेली धूळ ज्याप्रमाणे पावसाने धुतली जाते, तसे जर सर्वांचे क्षालन करता आले तर' (भगवत्‌गीता, जशी आहे तशी, कृष्णमूर्ती स्वामी प्रभुपाद, पृ. ८८) विनोबा भावे म्हणतात, ''एक बदलला की सर्वजन बदलतात.'' 'स्वरूप पाहा' ग्रामस्थ हे आदर्श नागरिकाप्रमाणे वर्तवणूक करतील असा पुरेपूर प्रयत्न विकास केंद्राधिकारी करतील. या कार्याला प्राथमिकता दिली जाईल. 'योगी वेमना साधनेने साध्य होतसे सुजाण।। आत्मशुद्धीविना आचार तो काय।। पात्र शुद्धीविना। आचार तो काय?।।'

पूर्वी म्हटल्याप्रमाणे आदर्श नागरिक हीच खरी राष्ट्राची संपत्ती आहे. संत नामदेव महाराज एका अभंगात म्हणतात- (विडंबन)

'नाचू कीर्तनाचे रंगी ।<br>
आदर्श मिरवू साऱ्या जगी ।।'

**७) इतर कार्य -**

अ) बालक आणि महिलांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी प्रयत्न करणे. ब) मुला-मुलींना शिक्षणाच्या दृष्टीने स्वतः पुढाकार घेऊन मार्गदर्शन करणे. क) गावात व परिसरात शांतता व सुव्यवस्था राखणे. ड) गावातील व परिसरात शांतता व सुव्यवस्था राखणे. इ) न्यायनिवाडा गावातच होईल, अशी व्यवस्था करणे.

थोडक्यात, ग्रामविकास आणि रोजगार निर्मिती, बेकारी निर्मूलनासाठी परिस्थितीनुसार उद्‌भवणारी सर्व कार्ये जबाबदारीपूर्वक करणे.

टीप - १) अनेक प्रकारची कार्ये यशस्वी झाली तरच ग्रामीण रोजगार पातळी कायमस्वरूपी (शाश्वत) राहू शकते. त्या दृष्टीने सर्व बाजूने विचार करून प्रस्तुत शोधनिबंधाची मांडणी केली आहे. २) विषयाची व्यापकता आणि लेखनाची मर्यादा विचारात घेता प्रस्तुत लेखात संदिग्धता निर्माण झाली आहे.

**संदर्भ ग्रंथसूची**

१) Census of India 1951, 1981, 1991, 2001, 2011.

२) Census Hand Book 1991, Registor Geneval Censur Commissioner, India.
३) Econimic Survey 2000-01.
४) Econimic Survey or Mahvastna 2019-20.
५) Agricultural Census - 1995-1996.
६) Arthashastra India, Journal of economics Reserch 2020.
७) कृषी विभागाची सांख्यिकीविषयक सर्वसाधारण जिल्हावार माहिती १९९१-९२, १९९२-९३, १९९६-९७ ते २०००-०१.
८) महाराष्ट्र सांख्यिकी गोषवारा १९८९-९०-९१, कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
९) अर्थसंवाद त्रैमासिक जुलै २००० खंड २४, अंक २ ते ऑक्टोबर - नोव्हेंबर - डिसेंबर २०२१, खंड ४५ अंक ३ पर्यंत (एकूण ५३ अंक).
१०) योजना मासिक - मार्च २००८, वर्ष ५२ वे, अंक ३ मार्च २०१०, वर्ष ३७ वे, अंक ८ मे २०१०, वर्ष ३७ वे, अंक १० एप्रिल २०२१, वर्ष ९ मे, अंक १० ऑगस्ट, अंक ९ नोव्हेंबर २०२१, अंक ४ डिसेंबर २०२१, अंक ५, फेब्रुवारी २०२२, अंक ७ मार्च २०२२, अंक ८, एकूण अंक ११.
११) लोकराज्य - जाने. २००८, अंक ११, जून २०१९. अंक १२, २०२० डिसेंबर , जाने, अंक ५, ऑक्टो. - नोव्हें. अंक ४, सप्टेंबर, अंक ३, जुलै, अंक १, २०२१ जुलै, अंक १, ऑगस्ट, अंक १२, सप्टें. अंक १, मे ९.
१२)दारिद्र्याची शोधयात्रा, लेखक हेरंब कुळकर्णी (प्रकाशन क्र. ७१, जाने, २०१९).
१३)ओ.पी.शर्मा, भारत की अर्थव्यवस्था, बदलता परिवेश लेखक जयपूर, १९९६ (पब्लिकेशन).
१४)प्रा. एन.बी.वैद्य, विदर्भाची अर्थव्यवस्था, श्री. मंगेश प्रकाशन, नागपूर, २००३.
१५) लोकमत, दिवाळी, अंक २००६ (नागपूर), दै. वृत्तपत्र-लोकमत, तरुण भारत, देशोन्नती, प्रजावाणी, दूरदर्शन.

◆

**Announcement for Call of Articles**
**Dr. Ravindra Sabnis Memorial Prize**

Marathi Arthshatra Parishad has considered an Endowment Fund for the award, on an annual basis of Dr. Ravindra Sabnis Memorial Prize of Rupees Four Thousand Only for outstanding contribution in form of an article published during the calendar year 2021 in standard accredited journals an themes belonging to the areas of Banking, Industrial Finance and General Industrial Economics.

Last date for Submission of the articles (Four Copies) for this year contest is 15th September 2022, For further details, contact the undersigned at this address.

**Dr. Avinash Ramlal Nikam**
Plot No. 49, Ganesh Nagar,
Behind Sai Bal Rugnalay,
Shahada, Dist. Nandurbar 425409
Cell. 9822665141

# भारतीय अर्थव्यवस्था : लोकसंख्या आणि आर्थिक विकास संबंध

**पांडुरंग नामदेव डापके** †

**प्रस्तावना :-**

कोणत्याही देशाचा आर्थिक विकास हा त्या देशात उपलब्ध असलेली नैसर्गिक साधनसामुग्री आणि लोकसंख्या या दोन घटकांवर अवलंबून असतो. नैसर्गिक साधनसामुग्रीमध्ये भूमी, पाणी, हवा, जंगले आणि खनिजे यांचा समावेश होतो, तर विकासाच्या दृष्टीने कार्यक्षम लोकांची संख्या आणि त्यांची गुणवत्ता ही महत्त्वपूर्ण असते. नैसर्गिक साधनांचा योग्य वापर करून मानवच देशाचा आर्थिक विकास करू शकतो. म्हणून आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत मानवाला अत्यंत महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. लोकसंख्येविषयी अभ्यास हा अगदी प्राचीन काळापासून केला जातो. परंतु सतराव्या शतकात ब्रिटनमधील जॉन ग्रँट या शास्त्रज्ञाने सर्वप्रथम लोकसंख्या या संकल्पनेचा विकास केला. त्यांच्यानंतर ससमिल्व, प्रटी, किंग, हॅले, मॉनटिम, थॉमस माल्थस आणि कार्ल मार्क्स या विचारवंतांनी लोकसंख्येविषयी अभ्यास करून आपले विचार मांडले. त्यापैकी थॉमस माल्थस यांनी १७९८ मध्ये लोकसंख्याविषयक सिद्धांत मांडला. त्यामुळे लोकसंख्येचा शास्त्रीय पद्धतीने अभ्यास करणारे ते पहिले विचारवंत म्हणून ओळखले जातात. प्राचीन काळी मानव जंगलात भटकून अन्न गोळा करीत असल्यामुळे त्याला जगण्यासाठी खूप संघर्ष करावा लागत होता. त्याचा परिणाम म्हणून त्या काळात लोकसंख्या कमी होती किंवा तिचे वाढीचे प्रमाण स्थिर होते. कालांतराने मानव वस्ती करून स्थिर स्वरूपाची शेती करू लागल्यामुळे अन्नधान्यात वाढ होऊन परिणामी लोकसंख्यासुद्धा वाढू लागली. पुढे औद्योगिक क्षेत्राचा जसजसा विकास होऊ लागला तसतशी लोकसंख्या मोठ्या प्रमाणावर वाढली. कारण औद्योगिक विकासानंतर लोकांचे राहाणीमान, खाणपाण आणि आरोग्यविषयक सुविधांमध्ये सुधारणा होऊन मृत्यूदरात घट झाली.

**उद्दिष्ट्ये :-**

१) लोकसंख्या आणि आर्थिक विकास यांच्यातील संबंध अभ्यासणे.
२) लोकसंख्या वाढीचा नैसर्गिक साधनसंपत्तीवर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास करणे.
३) लोकसंख्या वाढीच्या स्थिरीकरणासाठी करण्यात आलेल्या उपाययोजनांचा अभ्यास करणे.
४) लोकसंख्या वाढीमुळे अर्थव्यवस्थेपुढे निर्माण झालेल्या समस्यांचा अभ्यास करणे.

† सहयोगी प्राध्यापक व अर्थशास्त्र विभाग प्रमुख, पंडित जवाहरलाल नेहरू महाविद्यालय, औरंगाबाद.
आजीव सभासद क्र. : १८६१, भ्रमणध्वनी : ९४०४४७५२३१, ई-मेल : dapkepn26@gmail.com

**जगाच्या लोकसंख्या वाढीची पार्श्वभूमी :**

इ.स.१६५० पर्यंत जगाच्या लोकसंख्येची वाढ अत्यंत संथगतीने होत होती. किंबहुना ती स्थिर होती. याचे प्रमुख कारण म्हणजे या काळात लोकांना रोगराई, युद्ध आणि दुष्काळ या परिस्थितींचा सामना करावा लागत होता. यामुळे लोकसंख्येतील वाढ ही अत्यंत कमी होती हे आपल्याला पुढील तक्त्यावरून अधिक स्पष्ट होईल.

**तक्ता क्र. १ जगाची लोकसंख्या (कोटीमध्ये)**

| अ.क्र. | इ.स. / वर्ष | जगाची लोकसंख्या |
|---|---|---|
| १ | १६५० | ५० |
| २ | १८५० | १०० |
| ३ | १९३० | २०० |
| ४ | १९६० | ३०० |
| ५ | १९७५ | ४०० |
| ६ | १९८७ | ५०० |
| ७ | १९९९ | ६०० |
| ८ | २०२५ | ८५०* |

*(मागील वाढीवरून अंदाजे)

Source: Demographic year book - 2000.

तक्ता क्र. १ मध्ये जगाची लोकसंख्या दर्शविलेली आहे. इ.स. १६५० मध्ये जगाची लोकसंख्या केवळ ५० कोटी होती. पुढे ती दुप्पट होण्यासाठी तब्बल २०० वर्षे लागली. परंतु १९३० पासून जगाच्या लोकसंख्या वाढीचा दर हा खूपच जास्त असून याच वेगाने जर लोकसंख्या वाढत राहिली, तर २०२५ पर्यंत ही लोकसंख्या ८५० कोटीपर्यंत वाढेल असा अंदाज व्यक्त केला आहे. याला कुठेतरी आळा बसावा म्हणून संपूर्ण जगामध्ये ११ जुलै हा दिवस जागतिक लोकसंख्या दिन म्हणून साजरा केला जातो. सध्या जगाची लोकसंख्या ही ७.७ अब्ज इतकी आहे. ती २०३० आणि २०५० मध्ये अनुक्रमे ८.५ आणि ९.७ अब्ज इतकी वाढेल असा अंदाज व्यक्त केला जात आहे. अशा झपाट्याने वाढणाऱ्या लोकसंख्येला आळा घालण्यासाठी व त्याच्या परिणामांबद्दल लोकांमध्ये जागरूकता निर्माण करण्यासाठी संयुक्त राष्ट्रांनी ११ जुलै, १९८९ पासून हा दिवस जागतिक लोकसंख्या दिन म्हणून साजरा करण्याचं ठरविलं आहे. यानिमित्ताने कुटुंब नियोजन, दारिद्र्य, लैंगिक समानता, आरोग्य आणि शिक्षण याशिवाय स्पर्धा, रोड शो आणि पथनाटके अशा विविध सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करून जनजागृती केली जाते. सध्या भारताची लोकसंख्या ही जवळपास १३९.३४ कोटी तर चीनची लोकसंख्या जवळपास १४२ कोटी इतकी आहे.

तक्ता क्र. २ मध्ये भारताची लोकसंख्या दर्शविलेली आहे. सन १९०१ पासून ते २०११ पर्यंत लोकसंख्या सातत्याने वाढत गेलेली आहे. याचा अपवाद फक्त १९२१ ची जनगणना आहे. कारण १९११ ते १९२१ या दशकात लोकसंख्येत घट झालेली आहे. याचे प्रमुख कारण म्हणजे साथीच्या आजाराला जवळपास १५ दशलक्ष लोक बळी पडल्याचा अंदाज आहे. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर अन्नधान्य आणि आरोग्यविषयक सुविधांमध्ये वाढ झाल्यामुळे मृत्यूदर कमी झाला. परंतु जनन दर तोच राहिल्यामुळे १९५१ पासून लोकसंख्या

**तक्ता क्र. २ भारताची लोकसंख्या**

| अ.क्र. | जनगणना वर्ष | लोकसंख्या (कोटीत) | लोकसंख्या वृद्धी | जन्मदर प्रति हजारी | मृत्यूदर प्रति हजारी | स्त्री-पुरुष प्रमाण दर हजार पुरुषांमागे | साक्षरता प्रमाण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | १९०१ | २३.८४ | - | ४८.१ | ४२.६ | ९७२ | ५.५५ |
| २ | १९११ | २५.२१ | ५.७४ | ४९.२ | ४८.६ | ९६४ | ५.९२ |
| ३ | १९२१ | २५.१५ | -०.२३ | ४६.४ | ३६.३ | ९५५ | ७.१६ |
| ४ | १९३१ | २७.९० | १०.९३ | ४५.२ | ३१.२ | ९५० | ९.५० |
| ५ | १९४१ | ३१.८७ | १४.२३ | ३९.९ | २७.४ | ९४५ | १६.१० |
| ६ | १९५१ | ३६.११ | १३.३० | ४०.० | १८.० | ९४६ | १६.६७ |
| ७ | १९६१ | ४३.९२ | २१.६३ | ४१.२ | १९.२ | ९४१ | २४.०२ |
| ८ | १९७१ | ५४.८२ | २४.८८ | ३७.२ | १५.० | ९३० | २९.४५ |
| ९ | १९८१ | ६८.५२ | २५.१३ | ३२.५ | ११.४ | ९३५ | ३६.१७ |
| १० | १९९१ | ८४.४० | २३.१८ | -- | -- | ९२७ | ५२.२ |
| ११ | २००१ | १०२.७० | २१.६८ | २६.१ | ८.७ | ९३३ | ६५.४ |
| १२ | २०११ | १२१.०८ | १७.९० | २१.८ | ७.१ | ९४३ | ७४.०४ |
| १३ | २०२१ | १३९.३४ | १५.०८ | १७.४ | ७.१ | १०२० | ७५.०० |

Source: Economic Survey 2012-2013, भारतीय अर्थव्यवस्था: कदम विश्वास, गावंडे गणेश, https://www.statisticstimes.com (२०२१ ची आकडेवारी)

वाढीचा वेग प्रचंड मोठा राहून भारताची लोकसंख्या झपाट्याने वाढत गेली. भारतात स्त्री-पुरुष प्रमाण पाहाता १९०१ पासून २०११ पर्यंत पुरुषांच्या तुलनेत स्त्रियांच्या संख्येत काही अपवाद वगळता सातत्याने घट झाल्याचे दिसते. परंतु विशेष लक्षात घेण्यासारखी बाब म्हणजे जनगणना अहवाल २०११ नुसार स्त्री-पुरुष प्रमाण दरात ९४३ पर्यंत वाढ झाली, तर २०२१ च्या अंदाजानुसार, ही वाढ १०२० इतकी अधिक आहे. देशाच्या समतोल विकासासाठी स्त्री-पुरुष हे प्रमाण संतुलित असणे आवश्यक आहे. अन्यथा, समाजात अराजकतेसारखी परिस्थिती उद्‌भवू शकते.

**लोकसंख्या आणि आर्थिक विकास**

देशाच्या विकासासाठी नैसर्गिक साधनसंपत्ती आणि मानवी साधनसंपत्ती या दोन घटकांची आवश्यकता असते. प्रत्येक व्यक्तीकडे कोणते ना कोणते कौशल्य असते. त्यामुळे त्यांच्या या कौशल्याचा उपयोग करून नैसर्गिक साधनसंपत्तीच्या साहाय्याने उपयुक्त अशी वस्तूंची निर्मिती करून तिचा वापर समग्र मानवी कल्याणासाठी करता येतो. ज्या देशाकडे असे विविध कौशल्य प्राप्त लोकसंख्या जास्त असेल त्या देशाचा आर्थिक विकास हा निश्चित अधिक असतो. याचाच अर्थ असा की, मानवी साधनसंपत्तीत केवळ संख्येला महत्त्व नसून, गुणात्मक दर्जाला महत्त्व असते. विशेष म्हणजे मानवाचा गुणात्मक दर्जा हा शिक्षणाद्वारे घडवून आणता येणे शक्य आहे. देशाचा आर्थिक विकास घडवून आणताना केवळ यंत्रसामुग्री किंवा नैसर्गिक

साधनसंपत्ती असून चालत नाही तर ही यंत्रे चालवणारी कुशल आणि प्रशिक्षित व्यक्तींची आवश्यकता असते. मानव प्राणी हा मानवेतर प्राण्यांपेक्षा वेगळा आहे. त्यामुळे तो भविष्यकाळाचा अंदाज घेऊन हवे ते कौशल्य निर्माण करण्याचा सातत्याने प्रयत्न करत असतो. ज्या देशामध्ये ही कौशल्ये अधिकाधिक विकसित होतील तो देश अधिक विकास साधून जगात आपला प्रभाव निर्माण करू शकतो. मानवी साधनसंपत्तीची उपलब्धता साधारणतः लोकसंख्येच्या आकारमानाशी निगडित असते. परंतु नुसत्या आकारमानावरून मानवी साधनसंपत्ती ठरविता येत नाही. कारण त्या देशात लोकसंख्येचे आकारमान मोठे असून सुद्धा जर तेथे अपंग, व्यंग, मंदबुद्धी, वृद्ध आणि बालकांची संख्या अधिक असेल तर अशा परिस्थितीत कार्यकारी लोकसंख्या कमी होऊन त्याचा परिणाम त्या देशाच्या आर्थिक विकासावर होतो. कोणत्याही देशाचा आर्थिक विकास हा त्या देशातील कार्यक्षम लोकसंख्येवर अवलंबून असतो. ज्या देशामध्ये कार्यक्षम लोकसंख्या अधिक असते त्या देशाचा आर्थिक विकास अधिक होतो. याउलट ज्या देशामध्ये अवलंबित लोकसंख्येचे प्रमाण अधिक असते त्या देशाचा विकास कमी होतो. UNO च्या मते ० ते १४ वर्षे वयोगटातील लोकसंख्येला बालक, १४ ते ६० वयोगटातील लोकसंख्येला कार्यकारी लोकसंख्या तर ६० वर्षे वयाच्या पुढील लोकसंख्येला वयस्क संबोधले आहे. त्यांच्या मते, बालक आणि वयस्क गटातील लोकसंख्येवर देशाला उत्पादनापेक्षा अधिक खर्च करावा लागतो.

**तक्ता क्र. ३ भारतातील वयोगटनिहाय लोकसंख्येची टक्केवारी**

| वर्ष | वयोगट | | |
|---|---|---|---|
| | ० ते १४ (बालक) | १५ ते ५९ (युवक) | ६० पेक्षा जास्त (वृद्ध) |
| १९५१ | ३८.४ | ५६.० | ५.५ |
| १९६१ | ४१.० | ५३.३ | ५.६ |
| १९७१ | ४२.० | ५२.० | ६.० |
| १९८१ | ३९.५ | ५४.० | ६.५ |
| १९९१ | ३७.५ | ५५.७ | ६.८ |
| २००१ | ३५.४ | ५७.० | ७.५ |
| २०११ | ३०.९ | ६०.५ | ८.६ |
| २०२० | २६.१६ | ६७.२७ | ६.५७ |

Source: Census of India 2001 2011, Population Projections for India of States 2011-2036.

तक्ता क्र. ३ मध्ये भारतातील वयोगटनिहाय लोकसंख्येची टक्केवारी दर्शविलेली आहे. १९५१ मध्ये ० ते १४ वयोगटातील (बालकांची) संख्या ही ३८.४%, १५ ते ५९ वयोगटातील (युवकांची) संख्या ही ५६% तर ६० पेक्षा जास्त वयोगटातील (वृद्धांची) संख्या ही ५.५% इतकी होती. १९५१ ते २०२० या सत्तर वर्षांच्या कालावधी दरम्यान १९६१ ते १९७१ या १० वर्षांच्या काळात बालकांच्या संख्येत वाढ झाली असून, १९८१ ते २०२० या कालावधीत त्यांच्या संख्येत सातत्याने घट झाली आहे. मात्र १९५१ ते २०२० या कालावधीत युवकांच्या आणि वृद्धांच्या संख्येत सातत्याने वाढ होत असल्याचे दिसून येते. विशेष म्हणजे २०२० मध्ये

बालक आणि वृद्धांच्या प्रमाणापेक्षा युवकांचे प्रमाण हे खूप जास्त आहे.

१९५१ पासून भारताची लोकसंख्या ही झपाट्याने वाढत असल्याने तिने अर्थव्यवस्थेपुढे अनेक समस्या निर्माण केल्या आहेत. अशा वाढीव लोकसंख्येला जगविण्यासाठी उपलब्ध नैसर्गिक साधनसामुग्री, तंत्रज्ञान आणि भूमीचा अति वापर होऊन या सर्व घटकांवर त्याचा भार पडत आहे.

**लोकसंख्या वाढीच्या समस्या व उपाय**

लोकसंख्या वाढीच्या समस्या व त्यावरील उपाय पुढीलप्रमाणे सांगता येतील.

**अ) लोकसंख्या वाढीच्या समस्या**

१) भारताची लोकसंख्या प्रचंड वेगाने वाढत असल्यामुळे त्यातून अर्थव्यवस्थेसमोर अनेक गंभीर समस्या निर्माण झाल्या आहेत. त्यामुळे त्याचा कृषी, औद्योगिक आणि सेवा अशा तिन्ही क्षेत्रांवर प्रतिकूल परिणाम पडत आहे. हरितक्रांती, श्वेतक्रांती आणि नील क्रांतीमुळे आज आपण निश्चितच कमी भूक्षेत्रात अधिक धान्याचे उत्पादन घेत आहोत. एवढेच नव्हे; तर फलोद्योग विकासाच्या बाबतीत कॅलिफोर्नियाशी स्पर्धा करण्याचे सामर्थ्य भारतापाशी आहे. परंतु वाढत्या लोकसंख्येमुळे त्यावर नैसर्गिक व अन्न साधनसामुग्रीवर अतिरिक्त ताण पडून अन्न, वस्त्र आणि निवारा यासारख्या मूलभूत समस्यांमध्ये वाढ होत आहे. त्याचबरोबर सार्वजनिक आरोग्य, शिक्षण, रोजगार इत्यादीबाबत स्थिती दिवसेंदिवस गंभीर होत चालली आहे.

२) ग्रामीण भागातील स्त्रियांवर अपत्यांचे पालन, त्यांचे संगोपन, घरातील आणि शेतीतील कामे अशा अनेक जबाबदाऱ्या लादल्यामुळे या व्यापातून त्यांना डोकेसुद्धा वर काढावयास वेळ मिळत नाही. म्हणजेच वाढत्या लोकसंख्येचा अधिक भार हा प्रामुख्याने ग्रामीण भागातील स्त्रियांना सहन करावा लागतो.

३) देशातील लोकांच्या दीर्घायुष्याचा विचार करता भविष्यात आयुर्मान ७५ वर्षांच्या पुढे जाऊ शकते. परंतु भारताच्या स्वातंत्र्यप्राप्ती समयी हे आयुर्मान केवळ ३२ वर्षांच्या जवळपास होते. आयुर्मानाचा विचार करता भविष्यात आपल्या देशातील वृद्धांची संख्या पाच पटीने वाढेल. यातून नंतर निवृत्ती वेतन, मोफत वैद्यकीय सेवा, ज्येष्ठ नागरिकांना पुरवाव्या लागणाऱ्या अन्य मोफत सेवा इत्यादींमध्ये वाढ होऊन देशाच्या सामाजिक सुरक्षेचा खर्च वेगाने वाढेल. सध्या व्हिएतनाम, फिलिपिन्स, चीन, थायलंड, मलेशिया आणि जपान इत्यादी देशांमध्ये ही समस्या गंभीर स्वरूपाची आहे. म्हणूनच भारतात लोकसंख्येच्या वाढीचा दर विशिष्ट पातळीवर स्थिर करणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

४) लोकसंख्या वाढीमुळे अन्न, वस्त्र, निवारा, बेकारी, दारिद्र्य आणि रोजगार या प्रमुख समस्या तर जनतेपुढे आहेतच; पण त्याचबरोबर दिवसेंदिवस नैसर्गिक घटकांच्या अति वापरामुळे (उदा. पाणी, खनिज संपत्ती इ.) हे घटक संपुष्टात येत आहेत. तर दुसरीकडे औद्योगिकीकरणामुळे प्रदुषणाची समस्या निर्माण होत आहे.

**ब) लोकसंख्या वाढीवर उपाय**

१) लोकसंख्या वाढीचा वेग कमी करण्यासाठी लोकसंख्या विशिष्ट पातळीवर स्थिर करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. लोकसंख्या विशिष्ट पातळीवर स्थिर करण्यास जितका अधिक कालावधी लागेल तितकाच स्थिरीकरण पातळीचा कालावधी सुद्धा अधिक असेल. म्हणूनच वाढत्या लोकसंख्येला आळा घालण्यासाठी लोकसंख्येचे स्थिरीकरण करून आर्थिक विकासाच्या वेगात वाढ करावी लागेल. विकासाचा वेग वाढविल्यामुळे अन्नधान्य, सार्वजनिक स्वच्छता आणि आरोग्याच्या सुविधा मिळू लागल्यास बालमृत्यू दर कमी होईल. त्यामुळे नवजात बालके जिवंत राहाण्याची खात्री वाढून जननक्षमता कमी होईल आणि याचा परिणाम म्हणून लोकसंख्या स्थिर होईल.

२) संयुक्त राष्ट्रसंघाच्या मानवी विकास अहवालावरून असे दिसून येते की, ज्या देशांमध्ये दर हजारी बालमृत्यूचे प्रमाण कमी आहे तेथे बालकांचा जन्मदर कमी-कमी होत आहे. भारतातसुद्धा केरळ,

गोवा, तामिळनाडू इत्यादी राज्यांनी बालमृत्यूचे प्रमाण बरेच कमी करण्यात यश मिळविले आहे. परंतु भारतात विशेषत: ग्रामीण भागात अजूनही बालमृत्यूचे प्रमाण अधिक असल्यामुळे जन्मदरसुद्धा अधिक आहे. तेव्हा सरकारने या भागांमध्ये लक्ष केंद्रित करून आरोग्याच्या सुविधा वाढविणे गरजेचे आहे.

३) इतर देशांच्या तुलनेत भारतात आजही संतती प्रतिबंधक साधनांचा वापर खूपच कमी केला जातो. तेव्हा अशा संतती प्रतिबंधक साधनांचा वापर करणाऱ्यांच्या संख्येत वाढ करून जन्मदर कमी करता येणे शक्य आहे. त्यामुळे निश्चितच लोकसंख्या वाढीच्या वेगाला आळा घालता येईल.

४) वृद्धांच्या संख्येतील वाढ ही समस्या म्हणून न बघता त्याला वेगळ्या दृष्टिकोनातून पाहिल्यास ती एक संधी ठरू शकते. कारण वृद्ध लोक हे अनुभवी असतात. प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष ते आपल्या सेवा समाजाला देतच असतात. मात्र तशा स्वरूपाच्या योजना देशाने आतापासून तयार करून ठेवल्या तर निश्चितच या लोकांचा उपयोग देशाच्या विकासासाठी करता येईल.

५) लोकसंख्येच्या बाबतीत चीन आज जरी प्रथम क्रमांकावर असला, तरी भारताच्या लोकसंख्येच्या वाढीचा वेग विचारात घेतला तर भविष्यात भारत आघाडी घेऊ शकतो. अति प्रमाणात लोकसंख्या वाढ ही अर्थव्यवस्थेसमोर अनेक आव्हाने निर्माण करीत असते. ज्या देशात लोकसंख्या वाढीचे प्रमाण अधिक आहे. अशा देशांनी ही समस्या न समजता तेथील परिस्थितीनुरूप मनुष्य बळाचा योग्य वापर करून देशाच्या विकासासाठी त्याचा उपयोग केला पाहिजे.

६) भारताची लोकसंख्या निश्चितच जास्त आहे. परंतु विशेष महत्त्वाची बाब म्हणजे या लोकसंख्येत तरुणांची संख्या अधिक आहे तेव्हा या तरुणांना योग्य दिशा दाखवून त्यांचा उपयोग भारताला जगामध्ये महासत्तेचे स्थान मिळवून देण्यास करावा.

**निष्कर्ष :**

थोडक्यात आपल्याला असे म्हणता येईल की, लोकसंख्या वाढीचा आणि आर्थिक विकासाचा अगदी जवळचा संबंध आहे. एकीकडे लोकसंख्या वाढीमुळे नैसर्गिक साधनसंपत्तीवर ताण पडत असून, अर्थव्यवस्थेसमोर खनिज, पाणी, शिक्षण, आरोग्य, अन्नधान्य आणि बेरोजगारीसारख्या समस्या निर्माण होत आहेत, तर दुसरीकडे याच वाढलेल्या लोकसंख्येचा योग्य वापर केल्यास त्याचा अर्थव्यवस्थेच्या आर्थिक विकासावर अनुकूल परिणाम होत असल्याचे निदर्शनास येत आहे.

**संदर्भग्रंथ :**


१) भुतेकर डी.पी., कृषी अर्थशास्त्र, कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद, २०१५.

२) भांगे कालीदास, मुंढे चांगदेव; भारतातील लोकसंख्या, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद; २०१४.

३) जोशी शरद शंकर, भारतीय अर्थव्यवस्थेची वाटचाल, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, २००७.

४) काटे डी.एस., अर्थसंपदा, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद, २०१८.

५) रायखेलकर, दामजी, भारतीय अर्थव्यवस्था, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद, २००३.

६) झामरे जी.एन., भारतीय अर्थशास्त्र, पिंपळापुरे अॅण्ड कं. पब्लिशर्स, नागपूर, २०१०.

७) Census of India 2001, Report and Tables on age, C-14, C-14SC C-14ST Volume-I, Registrar General Census Commissioner, India.

८) Census of India 2011, Population Projections for India of States 2011-2036, Report of the Technical Group on Population Projections, New Delhi, November 2019.

९) Economic Survey 2012-2013, Ministry of Finance, Government of India, New Delhi.


◆

# प्रचरण विश्लेषणाद्वारे गृहीतकृत्याची चाचणी : एक टिपण

**विशाल चंद्रशेखर बेलुरे**†

सामाजिक शास्त्रे आणि विज्ञान यातील संशोधन कार्यात प्रचरण विश्लेषणास खूप महत्त्व आहे. प्रचरण विश्लेषणाचा शोध सर रोनाल्ड एल्मर फिशर या ब्रिटिश गणितज्ज्ञ, संख्याशास्त्रज्ञ, जीवशास्त्रज्ञ, जनुकशास्त्रज्ञ आणि शिक्षणतज्ज्ञाने सन १९१८ मध्ये "The Correlation between relatives on the supposition of Mendelian inheritance" या लेखाद्वारे लावला.

प्रचरण हे दिलेल्या आकडेवारीतील विचलन (Deviation) किंवा अपस्करण (Dispersion) मोजण्याचे एक मान आहे. एखाद्या आकडेवारीच्या मध्यापासून घेतलेल्या विचलनांची वर्गीय सरासरी म्हणजे प्रचरण होय. प्रचरण हे द्वितीय क्रमाचे परिबल (Second order moment) असते. कोणत्याही चलाच्या विविध निरीक्षणांमधून एका विशिष्ट संख्येचे विचलन काढले असता त्या विचलनाच्या सरासरीस परिबल असे म्हणतात. परिबलाच्या सहाय्याने आपणास दिलेल्या वितरणातील मध्यवर्ती प्रवृत्ती, अपस्करण किंवा विचलन, असममिती, वशिंडता किंवा शिखर दोष इत्यादींचे मापन करता येते. X या चलाची नमुना अवलोकने दिली असता, त्याच्या प्रचरणाचे परिगणन करण्यासाठी पुढील सूत्र उपयोगात आणले जाते. $V(X) = Var(X) = \Sigma(X - \bar{X}) / n - 1$ सदर सूत्राचे अवलोकन केले असता, हे सूत्र म्हणजे संख्याशास्त्रातील नमुना प्रमाण विचलनाचे (Sample standard deviation) वर्गमूळ होय असे लक्षात येते. म्हणून येथे, $S^2 = V(X)$ असतो असा निष्कर्ष काढता येईल.

**प्रचरणविश्लेषण म्हणजे काय?**

प्रचरण विश्लेषण (Analysis of Variance - ANOVA-अनोव्हा) हे संख्याशास्त्रातील F चाचणीच्या साहाय्याने दिलेल्या तीन किंवा त्यापेक्षा जास्त स्वतंत्र नमुना संचांच्या समष्टी मध्यात लक्षणीय फरक आहे का? हे तपासण्यासाठी तयार करण्यात आलेले एक वैशिष्ट्यपूर्ण असे सांख्यिकीय विश्लेषण तंत्र होय. मूळ F चाचणीत दोन समष्टीतील प्रचरणात फरक आहे का? हे तपासले जाते, तर अनोव्हामध्ये समष्टी मध्यात (Population means) फरक आहे का? हे तपासले जाते. म्हणजेच या पद्धतीद्वारे विविध समष्टी मध्यातील फरकांचे निर्धारण केले जाते. अनोव्हा ही एक लघूनमुना चाचणी (Small sample test-जेथे $n < 30$ असते) होय. साधारणपणे, जेव्हा दोन समष्टी मध्यात फरक आहे का? हे तपासायचे असते तेव्हा त्यासाठी t चाचणी

† सहयोगी प्राध्यापक व अर्थशास्त्र विभाग प्रमुख, राजीव गांधी महाविद्यालय, मुदखेड, जि. नांदेड
आजीव सभासद क्र. : १२४७, भ्रमणध्वनी : ८३२९२६३८५४, ई-मेल : vcbelure@gmail.com

वापरली जाते. परंतु नमुना संच दोनपेक्षा जास्त असतील आणि त्या ठिकाणी t चाचणी वापरली गेली तर दोष प्रकार I (Type I error -मूळ परिकल्पना बरोबर असून देखील ती नाकारली जाणे) उद्भवण्याची शक्यता वाढते. म्हणून त्या ठिकाणी अनोव्हा उपयोगात आणली जाते. बृहत् किंवा मोठ्या नमुन्यांसाठी (Large samples) Z चाचणी वापरली जाते.

**प्रचरण विश्लेषणाची तंत्रे** (Techniques of ANOVA) :

प्रचरण विश्लेषणाची दोन मुख्य तंत्रे किंवा पद्धती आहेत. त्यास एकमार्गी वर्गीकरण किंवा एक घटक अनोव्हा आणि द्विमार्गी वर्गीकरण किंवा द्विघटक, अनोव्हा असे म्हणतात.

**१) एकमार्गी वर्गीकरण किंवा एक घटक अनोव्हा** ( One way classification or One factor ANOVA) :

एकमार्गी वर्गीकरणात केवळ एकाच स्वतंत्र चलाचा अवलंबी चलावर पडणाऱ्या परिणामांचा अभ्यास केला जातो. हे चल एकतर ओळीत किंवा स्तंभात दर्शविले जाते. उदा.खतांच्या विविध प्रकारांचा पिकाच्या उत्पादनावरील परिणाम. पुढील तक्त्यात तीन प्रकारच्या खतांचा प्रत्येकी एक हेक्टरच्या १५ तुकड्यांवर वापर केला असता होणारे उत्पादन (टनांमध्ये) पुढीलप्रमाणे दर्शविले आहे. अशावेळी खतांच्या परिणामकारकतेत फरक नसतो, हे गृहीतकृत्य तपासा.

| **खताचा प्रकार-I** ( **नमुना संच-I) = $X_1$** | **खताचा प्रकार-II** **(नमुना संच-II) = $X_2$** | **खताचा प्रकार-III** **(नमुना संच-III) = $X_3$** |
|---|---|---|
| ९ | १३ | १९ |
| ११ | १२ | १३ |
| १३ | १० | १७ |
| ९ | १५ | ७ |
| ८ | ५ | ९ |
| **$X_1$ = १०** | **$X_2$ = ११** | **$X_3$ = १३** |

अशावेळी १% किंवा ५% सार्थकता पातळीला खतांच्या प्रकारानुसार समष्टी पातळीवर पिकाच्या सरासरी उत्पादनात फरक नसतो. म्हणजेच $\mu_1=\mu_2=\mu_3$ ही मूळ परिकल्पना ($H_0$) असेल. तर खतांच्या प्रकारानुसार समष्टी पातळीवर किमान एका तरी पिकाच्या सरासरी उत्पादनात फरक असतो (म्हणजे सर्वच समष्टीमध्ये ही समान नसतात) ही पर्यायी परिकल्पना ($H_1$) असेल. एकमार्गी वर्गीकरणांतर्गत वापरली जाणारी F चाचणी ही एक उजवी पुच्छ (Right tailed) चाचणी असते. उजवी पुच्छ चाचणी म्हणजे जेथे चाचणीचे नकार क्षेत्र (Rejection region) हे दिलेल्या वितरणाच्या अगदी उजवीकडे स्थित असते. अशा परिस्थितीत अनोव्हाच्या संदर्भात पर्यायी परिकल्पनेचे मूल्य साधारणतः$H_1$: $F_c$>1असे राहील.

**२) द्विमार्गी वर्गीकरण किंवा द्विघटक अनोव्हा** (Two way classification or Two factor ANOVA) :

द्विमार्गी वर्गीकरणात दोन स्वतंत्र चलांच्या अवलंबी चलावरील परिणामांचा अभ्यास केला जातो. यात दिलेली माहिती ही दोन प्रकारात विभागलेली असते.

सर्वसाधारणपणे एक प्रकार हा ओळीत तर दुसरा प्रकार हा स्तंभात दर्शविलेला असतो. थोडक्यात, जेव्हा संग्रहित माहिती एकाच वेळी ओळी आणि स्तंभांत तिच्या गुणधर्मांनुसार मांडलेली असते तेव्हा त्यास द्विमार्गी वर्गीकरण असे म्हणतात. द्विमार्गी वर्गीकरणाचे किंवा द्विघटक अनोव्हाचेदेखील दोन महत्त्वपूर्ण उपप्रकार आहेत.

**अ) प्रतिकरणाशिवाय द्विघटक अनोव्हा (**Two factor ANOVA without replication)**:**

यात आकडेवारीत केवळ एकच प्रायोगिक एकक (Experimental unit) किंवा नमुना विचारात घेतला जातो. उदा.खालील तक्त्यात खताचे चार प्रकार व जमिनीचे तीन प्रकार लक्षात घेऊन उत्पादनविषयक (हजार किलोत) माहिती संग्रहित केली आहे. त्याआधारे प्रचरण विश्लेषणाच्या मदतीने ५% सार्थकता पातळीला पुढील दोन गृहीतकृत्यांची चाचणी करता येते. १) खताच्या प्रकारांमुळे उत्पादनात भिन्नता आढळून येते का? २) जमिनीच्या प्रकारानुसार उत्पादनात भिन्नता आढळून येते का?

| **जमिनीचा प्रकार** | **खताचा प्रकार** | | | | **सरासरी** |
|---|---|---|---|---|---|
| | **अ** | **ब** | **क** | **ड** | |
| **X** | ६ | ६ | ० | ५ | ४.२५ |
| **Y** | २ | ३ | २ | ६ | ३.२५ |
| **Z** | ४ | १ | ४ | ७ | ४ |
| **सरासरी** | **४** | **३.३३** | **२** | **६** | **३.८३** |

या ठिकाणी दोन गृहीतकृत्यांद्वारे दोन स्वतंत्र चले (Two factors) आणि एक अवलंबी चल यातील वैयक्तिक संबंधांची पडताळणी केली जात असून, अनोव्हाच्या भाषेत त्यास मुख्य प्रभाव (Main effect) असे म्हणतात. येथे खताच्या विभिन्न प्रकारांमुळे उत्पादनात भिन्नता आढळून येत नाही आणि जमिनीच्या विविध प्रकारांमुळे उत्पादनात भिन्नता आढळून येत नाही. अशा दोन मूळ परिकल्पना (अनुक्रमे $H_0^{(1)}$ आणि $H_0^{(2)}$) तयार होतील.

**ब) प्रतिकरणासह द्विघटक अनोव्हा** (Two factor ANOVA with replication)**:**

यात आकडेवारीत एकापेक्षा जास्त प्रायोगिक एककांचा किंवा नमुन्यांचा अंतर्भाव केलेला असतो. उदा. उपरोक्त तक्त्यातील प्रायोगिक एककांची संख्या जर प्रत्येकी सहा घेऊन नमुने संग्रहित केले व त्यांची मांडणी पुढीलप्रमाणे केली असता.

| **जमिनीचा प्रकार** | **खताचा प्रकार** | | | | **सरासरी** |
|---|---|---|---|---|---|
| | **अ** | **ब** | **क** | **ड** | |
| **X** | ६,४,५,३,२,४ | ६,७,३,२,५,७ | ०,१,२,२,०,० | ५,५,४,३,६,६ | ३.६७ |
| **Y** | २,३,४,२,५,६ | ३,३,४,२,१,२ | २,१,३,२,१,३ | ६,३,४,२,७,७ | ३.१७ |
| **Z** | ४,२,५,६,४,२ | १,२,०,१,३,२ | ४,५,६,३,१,३ | ७,५,६,८,७,५ | ३.८३ |
| **सरासरी** | **३.६७** | **३** | **२.१७** | **५.३३** | **३.५५** |

या ठिकाणी उपरोक्त दोन मूळ गृहीतकृत्यांबरोबरच आपणास आणखी एक गृहीतकृत्य मांडता येते. जे की, प्रतिकरणासह द्विघटक अनोव्हाचे एक व्यवच्छेदक लक्षण मानले जाते. ते म्हणजे, खताच्या प्रकारामुळे जमिनीच्या सुपीकतेत फरक पडतो का? या तिसऱ्या गृहीतकृत्याद्वारे दोन स्वतंत्र चलातील परस्परसंबंधांची पडताळणी केली जाते. त्यास अनोव्हाच्या भाषेत आंतरक्रिया प्रभाव (Interaction effect) असे म्हणतात. येथे खताचा प्रकार आणि जमिनीची सुपीकता यात संबंध नसतो. अशी तिसरी मूळ परिकल्पना ($H_0^{(3)}$) तयार होईल.

थोडक्यात, प्रतिकरणाशिवाय द्विघटक अनोव्हाद्वारे केवळ मुख्य परिणामांची चाचणी केली जाते, तर प्रतिकरणासह द्विघटक अनोव्हाद्वारे मुख्य परिणामाबरोबरच आंतरक्रिया प्रभावाचीदेखील चाचणी केली जाते. उपरोक्त उदाहरणात प्रतिकरणांची संख्या प्रत्येकी सहा अशी समान ठेवण्यात आलेली आहे. अनोव्हाच्या भाषेत त्यास समतोल प्रतिरूप (Balanced model) असे म्हणतात.

**प्रचरण विश्लेषणातील गृहीते** (Assumptions in ANOVA) :

अनोव्हा चाचणी यशस्वीपणे पार पाडण्यासाठी दिलेल्या नमुना आकडेवारीद्वारे तसेच त्या नमुना आकडेवारीच्या समष्टींद्वारे पुढील गृहीतांची पूर्तता होणे आवश्यक असते.

१) नमुन्यांची स्वतंत्र व यादृच्छिक पद्धतीने निवड (Independent and random selection of samples) : प्रत्येक नमुन्याची निवड ही इतरांशी स्वतंत्र तसेच यादृच्छिक पद्धतीद्वारे केली जाते.

२) प्रसामान्यता (Normality) : समष्टी आकडेवारीचे वितरण हे संभाव्यतेसंदर्भातील प्रसामान्य वितरणाच्या (Normal distribution) नियमानुसार झालेले असावे.

एकविधता (Homogeneity) : प्रत्येक समष्टी आकडेवारीचे प्रचरण हे समान असावे. म्हणजेच, $\sigma_1^2 = \sigma_2^2 = \sigma_3^2 . . . = \sigma_k^2$ असावे.

अज्ञात समष्टी मध्य आणि प्रचरण (Unknown $\mu$ and $\sigma^2$) : दिलेल्या नमुना आकडेवारीचे समष्टीमध्ये आणि प्रचरणे माहीत नसतात. केवळ निवडलेल्या नमुन्यांवरून त्यासंबंधी अंदाज बांधले जातात.

समावेशी प्रचरणे (Additivity of variances) : समावेशी प्रचरणांचा मूळ अर्थ पुढील सूत्राद्वारे व्यक्त केला जातो. V(A + B) = V(A) + V(B). येथे याचा अर्थ एकमार्गी वर्गीकरण लक्षात घेता, एकूण प्रचरण = आंतरवर्ग प्रचरण + वर्गांतर्गत प्रचरण, तसेच द्विमार्गी वर्गीकरण लक्षात घेता, एकूण प्रचरण = आंतरवर्ग प्रचरण + वर्गांतर्गत प्रचरण + दोष वर्गबेरीज (+ आंतरक्रिया प्रचरण) असा होतो. थोडक्यात, या गृहीतानुसार, दिलेल्या आकडेवारीतील भिन्न प्रकारच्या प्रचरणांची बेरीज करणे शक्य असते.

**प्रचरण विश्लेषणाद्वारे गृहीतकृत्याची चाचणी** (Hypothesis testing through ANOVA) :

प्रचरण विश्लेषणाद्वारे गृहीतकृत्याची किंवा परिकल्पनेची चाचणी नेमकी कशा पद्धतीने केली जाते? हे समजून घेण्यासाठी आपणास पुढील तांत्रिक प्रक्रियेतून जावे लागते. त्यासाठी आपण एकमार्गी वर्गीकरणाचे उपरोक्त उदाहरण पुढे पाहू.

प्रचरण विश्लेषणाच्या माध्यमातून गृहीतकृत्याची चाचणी करीत असताना आपणास प्रथमतः F चाचणीचे परिगणित मूल्य काढावे लागते व त्यानंतर F चाचणीचे तक्ता मूल्य शोधावे लागते. जर परिगणित मूल्य हे तक्ता मूल्यापेक्षा लहान आले, तर मूळ परिकल्पनेचा स्वीकार करावा लागतो. एकमार्गी वर्गीकरणात परिगणित मूल्य काढण्यासाठी पुढील सूत्र उपयोगात आणले जाते. F = स्तंभ आंतरवर्गांचे प्रचरण/ स्तंभ वर्गांतर्गत प्रचरण= Between column variance / Withincolumn variance. अनोव्हा चाचणीचा

| $X_1$ | $X_2$ | $X_3$ | $X_1^2$ | $X_2^2$ | $X_3^2$ |
|---|---|---|---|---|---|
| 9 | 13 | 19 | 81 | 169 | 361 |
| 11 | 12 | 13 | 121 | 144 | 169 |
| 13 | 10 | 17 | 169 | 100 | 289 |
| 9 | 15 | 7 | 81 | 225 | 49 |
| 8 | 5 | 9 | 64 | 25 | 81 |
| **$\Sigma X_1 = 50$** | **$\Sigma X_2 = 55$** | **$\Sigma X_3 = 65$** | **$\Sigma X_1^2 = 516$** | **$\Sigma X_2^2 = 663$** | **$\Sigma X_3^2 = 949$** |
| **$X_1 = 10$** | **$X_2 = 11$** | **$X_3 = 13$** | **$x = 11.33$** | | |

तर्क असा की, स्तंभ वर्गांतर प्रचरणाच्या माध्यमातून त्या विशिष्ट स्तंभातील नमुना निरीक्षणे ही त्या स्तंभाच्या मध्यापासून किती विखुरलेली आहेत? हे तपासले जाते. अर्थात या विखुरणासाठी योगायोग, यादृच्छिकता किंवा नमुनादोष (Sampling error) यांना जबाबदार ठरविले जाते. तर, स्तंभ आंतरवर्ग प्रचरणाच्या माध्यमातून प्रत्येक नमुना संचाचे मध्य हे सर्व मध्याचा मध्य असणाऱ्या महामध्यापासून (Grand mean-येथे 11.33) किती विखुरलेले आहेत? याची चाचपणी केली जाते. या विखुरणासाठी उपचार गटास (Treatment group- येथे खताचा प्रकार) जबाबदार ठरविले जाते. अशा प्रकारे दिलेल्या नमुना संचात जर मोठ्या प्रमाणात प्रचरण अस्तित्वात असेल तर स्तंभ आंतरवर्गाचे प्रचरण हे स्तंभ वर्गांतराच्या प्रचरणापेक्षा जास्त असेल म्हणूनच उपरोक्त सूत्रातील गुणोत्तराचे मूल्य जर एकापेक्षा सार्थपणे मोठे येत असेल तर, आपण मूळ परिकल्पना नाकारत असतो. अनोव्हाचे तक्ता मूल्य शोधण्यासाठी १% किंवा ५% सार्थकता पातळीला दिलेल्या स्तंभाची संख्या वजा एक (c-1)आणि निरीक्षणांची संख्या वजास्तंभाची (n- c) अशा दोन मुक्तिसंख्यांचा आधार घ्यावा लागतो. यासंदर्भातील प्रक्रिया पुढीलप्रमाणे विशद केली आहे.

१. **नमूना बेरीज (Sample Total - T)** : T $\Sigma X_1 + \Sigma X_2 + \Sigma X_3 = 50 + 55 + 65 = 170$

२. **दुरुस्ती घटक (Correction Factor - CF)** : $CF = T^2 / n = (170)^2 / 15 = 1926.67$

३. **एकूण वर्ग बेरीज (Total Sum of Squares - TSS)** : $TSS = \Sigma X_1^2 + \Sigma X_2^2 + \Sigma X_3^2 - CF = 516 + 663 + 949 - 1926.67 = 201.33$

४. **नमुन्यांमधील आंतरवर्गांची बेरीज (Sum of Squares Between Samples - SSBS)** : SSBS = $(\Sigma X_1^2)/n_1 + (\Sigma X_2^2)/n_2 + (\Sigma X_3^2)/n_3 - CF = 516)/5 + (663)/5 + (949)/5 - 1926.67 = 23.33$

५. **नमुन्यांमधील वर्गांतर्गत बेरीज (Sum of Squares Within Samples - SSWS)** : SSWS = TSS - SSBS = 201.33 - 23.33 = 178

६. **प्रचरण विश्लेषण तक्ता (ANOVA Table)** :

| प्रचरणाचे स्रोत | वर्ग बेरीज | मुक्तिसंख्या | मध्य वर्ग | F |
|---|---|---|---|---|
| नमुन्यांमधील आंतरवर्गं | २३.३३ | ३ - १ = २ | ११.६७ | ११.६७ / १४.८३ = ०.७८७ |
| नमुन्यांमधील वर्गांतर | १७८ | १५ - ३ = १२ | १४.८३ | |

उपरोक्त अनोव्हा तक्त्यात F चे परिगणित मूल्य ०.७८७ इतके आले असून, अनुक्रमे २ आणि १२ या मुक्तिसंख्येला F वितरणाचे तक्ता मूल्य ३.८८६ इतके मिळते. या ठिकाणी F चे परिगणित मूल्य हे तक्ता मूल्यापेक्षा लहान आले असल्यामुळे ($F_C<F_T$ )मूळ परिकल्पना स्वीकार्य ठरते. याचा अर्थ सर्व समष्टीमध्ये ही समान आहेत व खतांच्या परिणामकारकतेत समष्टी पातळीवर लक्षणीय फरक दिसून येत नाही असा होतो. एकमार्गी वर्गीकरणात गृहीतकृत्याच्या चाचणीसाठी संभाव्यता- मूल्य दृष्टिकोन (P- value approach) देखील उपयोगात आणता येतो. अशावेळी P-value$<\alpha$ असेल तर मूळ परिकल्पना नाकारावी लागते. येथे $\alpha$ =लक्षणीयतेची सीमा किंवा दोष प्रकार- I ची शक्यता (उदा.१% किंवा ५%) होय. उपरोक्त उदाहरणात P- value ची किंमत ०.४८ येते जे की ०.०५ पेक्षा मोठी आहे.

अशा प्रकारे एकमार्गी वर्गीकरण असलेल्या तीन स्वतंत्र नमुना संचांच्या समष्टी मध्यासंदर्भातील सांख्यिकीय गृहीतकृत्याची चाचणी अनोव्हाच्या साहाय्याने केली जाते. द्विमार्गी वर्गीकरण असणाऱ्या आकडेवारी संदर्भातदेखील अशा प्रकारची वापरता येते. परंतु अशावेळी उपरोक्त तांत्रिक विश्लेषणामध्ये आपणास स्तंभ आंतरवर्गांची बेरीज (Sum of Squares Between Columns - SSBC), पंक्ती आंतरवर्गांची बेरीज (Sum of Squares Between Rows - SSBR) आणी त्रुटी किंवा अवशिष्ट पदांची वर्ग बेरीज (Sum of Squares due to Error or Residual - SSE) तसेच आवश्यकतेनुसार अंतरआंतरक्रिया वर्गांची बेरीज (Interaction Sum of Squares - SSI). या संकल्पना परिगणित कराव्या लागतात. F ची परिगणित मूल्ये काढण्यासाठी अनुक्रमे SSBC, SSBR आणि SSI च्या प्रचरणाला SSE च्या प्रचरणाने भागावे लागते. अलीकडच्या काळात संगणक क्षेत्रात घडून आलेल्या सॉफ्टवेअर क्रांतीमुळे आपणास संगणकाच्या मदतीने अत्यंत सुसह्यपणे अनोव्हा चाचणीची अंमलबजावणी करता येते. उदा. मायक्रोसॉफ्ट एक्सेलच्या टूलबारवरील डेटाटॅब अंतर्गत येणारा डेटाअनालिसिस हा पर्याय त्यासाठी अत्यंत सुलभ आहे.

अनोव्हा चाचणी उपयोगात आणत असताना या चाचणीच्या गृहीतांची पूर्तता होणे आवश्यक असते. तसेच अयोग्य प्रकारचे विश्लेषण तंत्र वापरले तर; उदाहरणार्थ जेथे द्विमार्गी वर्गीकरण वापरणे योग्य असते तेथे जर एकमार्गी वर्गीकरण तंत्र वापरले तर चाचणीद्वारे चुकीचे निष्कर्ष निघतात. याशिवाय अनोव्हा चाचणीद्वारे मिळालेल्या निष्कर्षांचे अर्थनिर्वचन करीत असताना देखील अत्यंत काळजी घ्यावी लागते.

**संदर्भ ग्रंथ यादी :**


- Anderson, D. R., Sweeney, D. J., Williams, T. A., Camm, J. D., & Cochran, J. J. (2015). Statistics for Business & Economics (13th ed.). Cengage Learning India Private Limited.
- Cook, I., & Upton, G. (2014). A Dictionary of Statistics (3rd ed.). OUP Oxford.
- Elhance, D. N., Elhance, V., & Aggarwal, B. M. (2018). Fundamentals of Statistics (59thed.). Kitab Mahal Publishers.

- Gupta, S. P. (2022). Statistical Methods (46th ed.). Sultan Chand & Sons.
- Jaggia, S., & Kelly, A. (2019). Business Statistics (12th ed.). McGraw Hill Education (India) Private Limited.
- Jaisingh, L. R. (2006). Statistics for the Utterly Confused (2nd ed.). McGraw-Hill Education.
- Kothari, C. R. (2004). Research Methodology: Methods and Techniques. New Age International Limited.
- Reagle, D., & Salvatore, D. (2011). Schaum's Outline of Statistics and Econometrics (2nd ed.). McGraw-Hill Education.
- Salkind, N. J., & Frey, B. B. (2019). Statistics for People Who (Think They) Hate Statistics (7th ed.). SAGE Publications.
- Spiegel, M. R., & Stephens, L. J. (2017). Schaum's Outline of Statistics, (6th ed.). McGraw-Hill Education.


◆

## ४५ व्या वार्षिक राष्ट्रीय अधिवेशनासाठी शोधनिबंध पाठविण्यासंबधी सूचना

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे ४५ वे वार्षिक राष्ट्रीय अधिवेशन ५, ६ व ७ नोव्हेंबर २०२२ रोजी जे.ई.एस. महाविद्यालय, जालना येथे होत आहे. शोधनिबंधासाठीची शब्दमर्यादा २००० व सोबत ३०० ते ४०० शब्दांत गोषवारा अत्यावश्यक आहे. शोधनिबंध मराठीतच असणे आवश्यक असून यापूर्वी तो इतरत्र प्रकाशित झालेला नसावा. शोधनिबंधावर आपला आजीव सदस्य क्रमांक, भ्रमणध्वनी क्रमांक, ई-मेल, महाविद्यालयाचे नाव व पत्ता इत्यादी तपशील मराठीत देणे आवश्यक आहे. शोधनिबंधाच्या दोन प्रतीत हार्ड कॉपी मा. अध्यक्षांच्या पत्त्यावर पाठवून आपला शोधनिबंध त्यांना (rajendra4615@gmail.com) मेल करावा. शोधनिबंध ०५ सप्टेंबर २०२२पर्यंत मा. अध्यक्ष मराठी अर्थशास्त्र परिषद यांना पोहचतील या बेताने पाठवावेत.

**शोधनिबंधासाठी विषय**

१. आर्थिक सिद्धांतन आणि प्रायोगिक पद्धती.

२. पंधरावा वित्त आयोग : केंद्र, राज्यवित्तीय संबंधाची चिकित्सा.

३. डॉ. पंजाबराव देशमुख यांचे आर्थिक विचार

**पत्रव्यवहारासाठी पत्ता**

प्रा.डॉ. रामदास बापूराव भांडवलकर, गजाननगर, पिंपळगाव रोड, यवतमाळ, पिन-४४५००१ मो. : ९४२३१३४६८६ ई-मेल : rajendra4615@gmail.com

**- डॉ. मारोती तेगमपुरे**

कार्यवाह खजिनदार, मराठी अर्थशास्त्र परिषद

# Freedom of Information

**शि. ना. माने †**

**प्रारंभिक :**

एक आटपाटनगर. तेथे पिण्याच्या पाण्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. एका बाजूला ऊस शेतीचे क्षेत्र वाढत आहे. साखर कारखान्यांची संख्या वाढत आहे. दुसऱ्या बाजूला टँकरची संख्या वाढत आहे. खासगी विंधण विहिरींच्या संख्येत भर पडत आहे. विंधन विहिरींचे अधिग्रहण करण्याची सरकारने कायदेशीर तरतूदही केली आहे. ऊस पाणी पीत आहे. कारखाने रस पीत आहेत. पाण्याविना लोकांचे हाल होत आहेत. एकपिकी ऊस शेती हे या समस्येचे मूळ कारण आहे. असे शोधनिबंध लिहून जलतज्ज्ञ त्यांचे मत मांडत आहेत. टँकरवाले व विंधन विहिरींचे मालक यांचा पाणी 'बाजार' तेजीत सुरू आहे. उलट पाणी विपणन संज्ञा नामशेष झाली आहे. लोक माहितीसमृद्ध आहेत. केवळ माहितीचा अधिकार नव्हे, तर ते लोकतंत्रात आविष्कार स्वातंत्र्याचा तसेच मतदानाचा हक्कदेखील बजावीत आहेत. उन्हाळा येतो. उन्हाळा जातो. निवडणुका होतात. सरकारे येतात. पण प्राणी प्रश्न इथला सुटत नाही. असे का? माहिती व हक्क मिळणे आवश्यक असले तरी ते पुरेसे नाही. तथाकथित माहिती बंदिस्त आहे. ती मुक्त नाही. तिला स्वतंत्र करणे आवश्यक आहे. त्या गरजेतून माहितीच्या स्वातंत्र्याची चळवळ उभी राहिली.

**जनक व उद्गाता :**

२१ वे शतक माहिती तंत्रविद्येचे शतक आहे. त्याच्या एका बाजूला माहितीचा तसेच आविष्कार स्वातंत्र्याचा सुकाळ आहे, तर दुसऱ्या व जास्त महत्त्वाच्या बाजूला माहितीच्या स्वातंत्र्याचा दुष्काळ आहे. 'गुरिला ओपन ॲक्सेस मॅनिफेस्टो'(२००८)चे संस्थापक व माहितीचे स्वातंत्र्य या चळवळीचे उद्गाते आहेत. आरॉन स्वार्ट्झ (Aaron Swartz) ते प्रखर बुद्धिमत्तेचे युवा क्रांतिकारक होते. गोपनिय माहिती किंवा विदेचे ते कडवे विरोधक होते. जेथे जेथे माहिती किंवा विदा दडपली जाते तेथे तेथे हल्ला करणे हा त्यांच्या ओपन ॲक्सेस घोषणापत्राचा उद्देश होता. ती उघड केलेली माहिती लोकांसाठी माहिती जालावर (Web) टाकणे हा स्वार्ट्झ यांचा कार्यक्रम होता. हा कार्यक्रम विदेशी बँकांतील काळेधन, नाममात्र किंवा कवच कंपन्या (Shall companies), देशांतील बँकातील संशयास्पद ठेवी, बँकेतील अनुत्पादक कर्ज गुणोत्तर, फुगविलेला ताळेबंद, टँकरवाड्यांतील पाणी बाजार, अवैध भूखंड खरेदी-विक्री, एक स्व(Patent),

† माजी अध्यक्ष, मराठी अर्थशास्त्र परिषद, निवृत्त प्राध्यापक, धनंजयराव गाडगीळ वाणिज्य महाविद्यालय, सातारा.
आजीव सभासद क्र. : १०८, भ्रमणध्वनी : ७७३८३५६७८१

रचना स्वामित्व अधिकार (Copy right), इत्यादी संस्थांपर्यंत वाढू शकतो. अर्थातच, हा कार्यक्रम देशातील प्रस्थापित व्यक्ती व संस्था यांना हानीकारक होता. त्यांचा माहिती स्वातंत्र्याला प्रखर विरोध झाला. स्वार्ट्झला पकडण्यात आले. ११ जानेवारी २०१३ रोजी वयाच्या २६ व्या वर्षी त्याने त्याच्या सदनिकेत आत्महत्या केली. आविष्कार स्वातंत्र्याच्या नावाने वारंवार हाकारे देणाऱ्या लोकसमूहात स्वार्ट्झने माहिती स्वातंत्र्याच्या वेदीवरील हौतात्म्य पत्करले. खटल्याच्या उपचारात पडणे त्याने टाळले.

**स्वरूप :**

आता माहिती स्वातंत्र्य संज्ञेच्या स्वरूपाविषयी दोन शब्द. अर्थसंवादातील या सदरात मूळ इंग्रजी संज्ञेच्या मराठी पर्यायाची जडणघडण केली जाते. त्यासाठी मराठी परिभाषेचे काही मापदंड विचारात घेतले जातात. या संज्ञेच्या बाबतीत तो संकेत येथे बाजूला ठेवला आहे. त्याची दोन कारणे आहेत. एक, फ्रीडम ऑफ इन्फॉर्मेशन ही संज्ञा मूळात सरळ व सुबोध आहे आणि दुसरे व जास्त महत्त्वाचे कारण म्हणजे तिच्या अर्थापेक्षा तिचा अनर्थ जास्त चिंतेचा विषय आहे. या चिंतेच्या विषयाला मध्यबिंदूत ठेवून पुढील चर्चा केली आहे. म्हणून सुरुवातीलाच सांगून टाकतो की या संज्ञेचा मराठी पर्याय (खरे तर भाषांतर) आहे. माहितीचे स्वातंत्र्य, माहिती स्वातंत्र्य या संज्ञेचे स्वरूप स्पष्ट करण्यासाठी आविष्कार स्वातंत्र्य या संज्ञेचा उल्लेख अनिवार्य ठरतो. आविष्कार स्वातंत्र्य ही संज्ञा वैयक्तिक स्वरूपाची आहे. उलट माहिती स्वातंत्र्य ही संज्ञा सामाजिक स्वरूपाची आहे. पहिलीला खासगी सेवन वस्तू म्हटली तर दुसरीला सार्वजनिक वस्तू म्हटली पाहिजे. आविष्कार स्वातंत्र्य व्यक्तिनिष्ठ म्हणून ते व्यष्टी अर्थशास्त्राशी संबंधित तर माहिती स्वातंत्र्य समाजनिष्ठ म्हणून समष्टीय अर्थशास्त्राशी संबंधित. आविष्कार स्वातंत्र्य मनुष्यप्राण्याची खासगी मालमत्ता आहे. उलट माहिती स्वातंत्र्य हा माहितीचा विशेषाधिकार आहे. परिणामी, दोन्हीमध्ये संघर्ष निर्माण होतो. तो किती खरा? किती आभासी? माहिती स्वातंत्र्यामुळे प्रदूषण अपव्यय तसेच रस्ते अपघात यांच्या प्रमाणात घट होते, असा दावा केला जातो. तो किती खरा? या प्रश्नांची समाधानकारक उत्तरे ते माहिती स्वातंत्र्य किती 'स्वतंत्र' आहे. यावर अवलंबून असतील आणि अचूक विदा व योग्य अभिकल्प (Design) यांच्याकडून मिळणाऱ्या बळावर (Back-up) ते स्वातंत्र्य अवलंबून असेल.

(सदरच्या चर्चेसाठी युवॅल नोटा हरारि यांच्या होमो ड्युस (अ ब्रीफ हिस्टरी ऑफ टुमॉरो) पेंग्विन रँडम हाऊस यु. के. २०१६ या पुस्तकातील भाग ३, प्रकरण ११ चा विशेष आधार घेतला आहे.)

◆

## निवेदन

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या सर्व आजीव सदस्यांना व अर्थसंवाद लेखकांना कळविण्यात येते की, कार्यकारिणीच्या ठरावानुसार दि. १ एप्रिल २०२० पासून अर्थसंवाद हा '**तज्ज्ञ परिक्षित नियतकालीक**' करण्यात आलेला आहे. त्यामुळे यापुढील काळात अर्थसंवादचे लेख हे तज्ज्ञांकडून परिक्षण करुन घेऊन, गरजेनुरूप त्यामध्ये लेखकांकडून योग्य त्या सुधारणा करुन घेऊनच अर्थसंवादमध्ये प्रसिद्ध केले जातील. युजीसीचे बदलते धोरण आणि गुणवत्ता वाढीच्या अनुषंगाने सदर हितावह बदल अर्थसंवादमध्ये करण्यात आलेला आहे, याची सर्वांनी नोंद घ्यावी.

**- प्रमुख संपादक, अर्थसंवाद**

# New Welfarism, Crypto-currency, Block chain, Mining and Stable Coin

**जे. एफ. पाटील** †

गेल्या कांही महिन्यात काही नवे इंग्रजी शब्द, पुन्हा पुन्हा वापरात येऊ लागले आहेत.

१) New Welfarism असा शब्दप्रयोग श्री. अभिषेक आनंद व अरविंद सुब्रमण्यम यांनी "New Welfarism of India's Right" (इंडियन एक्सप्रेस २२ डिसेंबर, २०२०) वापरला. तोच शब्दप्रयोग पुन्हा ३/१२/२०२१ च्या New Geography of Welfare - Indian Express या लेखात पुन्हा वापरला आहे.

आवश्यक व पूर्णत: खाजगी वस्तूंचा, - स्वयंपाक गॅस, शौचालये, बँक खाती, वीज, निवारा इ. यांचा सार्वजनिक पुरवठा (बऱ्याच प्रमाणात अंशदानित वा मोफत) म्हणजे New Welfarism याला आपण 'नव कल्याणवाद' असा पर्याय देवू शकतो.

२) त्यातील दुसरा शब्द Crypto-currency हा आहे. यालाच कांही लोक Digital असाही शब्द प्रयोग वापरतात. Crypt म्हणजे दडवलेले. गुप्तपणे एखाद्या गटाशी संलग्न असा क्रिप्टोचा अर्थ होता. करन्सी म्हणजे चलन. हे एकत्र लक्षात घेतल्यास - क्रिप्टोकरन्सी म्हणजे-

- गुप्त चलन
- कूट चलन
- आभासी चलन
- प्रच्छन्न चलन

यापैकी आभासी चलन हा शब्दप्रयोग योग्य व सोपा वाटतो. कारण -

या प्रकारच्या चलनास वस्तूमय, धातुमय वा सरकारी/मध्यवर्ती बँकेचा आधार असत नाही. आजतरी त्या चलनाला वैधानिक आधार नाही. त्याच्या फक्त बोटांकित नोंदी होतात. त्याचे रूपांतर वैधानिक चलनामध्ये होणे हा वैधानिक नव्हे तर विश्वासाचा भाग ठरतो.

३) Block chain - हा शब्द प्रयोग मुख्यत: आभासी चलनाच्या संदर्भात आधारभूत तंत्र म्हणून येतो. त्यासाठी ठोकळा-साखळी व चौकट शृंखला असा शब्दप्रयोग लक्षात घेता येतील. आभासी चलनाचा संबंध - व्यक्तीशी, विक्रेते - खरेदीदार व्यवहाराशी - नेहमीच्या वैधानिक चलन व्यवस्थेशी, - भांडवल बाजाराशी येतो. त्या सर्वांची विशेष हिशोबी नोंदणी म्हणजे ब्लॉक व अशा अनेक व्यवहारांची संलग्न नोंद म्हणजे Block chain - सामान्यत: Block म्हणजे ठोकळा - चौकट किंवा घन असा अर्थ आहे. त्यादृष्टीने

† माजी अध्यक्ष, कार्याध्यक्ष व विश्वस्त, मराठी अर्थशास्त्र परिषद
आजीव सभासद क्र.६२, भ्रमणध्वनी : +९१-९४२२०४६३८२, ई-मेल : jfpatil@rediffmail.com

रचना शृंखला किंवा ठोकळा साखळी असे पर्यायी शब्द होऊ शकतील. पण सर्वसामान्यासाठी ''ठोकळा साखळी'' असा शब्दप्रयोग अधिक सोपा व मान्य होईल असे वाटते.

४) आभासी चलनाच्या संदर्भात 'मायनिंग' mining असा एक शब्दप्रयोग वापरला जातो. बऱ्याच वेळी ठोकळा साखळीत अनेक सांकेतिक कोडी निर्माण होतात. ती सोडविणाऱ्यास आभासी चलन प्राप्त होते. ठोकळा साखळीतील सांकेतिक कोडी सोडवून आभासी चलन मिळविण्यास खणन म्हणतात. त्यासाठी आपण मराठी ''मुद्रा खणन'' किंवा ''चलन खणन'' असे शब्दप्रयोग वापरू शकतो. प्रस्तुत लेखकास त्यापैकी 'चलन खणन' हा शब्दप्रयोग अधिक योग्य वाटतो. कारण चलन शब्द अधिक परिचित आहे.

५) आभासी चलनाच्या क्षेत्रातच "stable coin" हा शब्दप्रयोग येवू लागला आहे. सामान्यत: आभासी चलनाच्या बाजार मूल्यात मोठ्या प्रमाणात चढउतार होतात. कारण त्यांच्यासाठी मौलिक वस्तू वा धातू किंवा शासकीय/सार्वभौम आधार नसतो. ही अस्थिरता टाळण्यासाठी जेव्हा आभासी चलन एखाद्या वैधानिक चलनाशी संलग्न केले जाते तेव्हा त्यास ''स्टेबल कॉईन'' असे म्हटले जाते. त्यासाठी आपण ''स्थिर चलन'' असा शब्दप्रयोग वापरणे योग्य ठरेल. स्थिरमुद्रा हा अनेकार्थी शब्द होतो.

◆

## डॉ. सौ. अरुणा रारावीकर आर्थिक लेख पुरस्कार

मराठी अर्थशास्त्र परिषदेतर्फे २०११ पासून हा पुरस्कार सुरू केला आहे. परिषदेच्या आजीव सदस्यांनी आर्थिक विषयांवर सतत वाचन-मनन करून त्यावर जिल्हा व राज्यपातळीवरील मराठी दैनिक वृत्तपत्रासाठी वैचारिक व प्रबोधनात्मक लेख लिहिण्यास उद्युक्त व्हावे हा त्यामागील हेतू आहे. त्यांच्या अशा प्रसिद्ध झालेल्या व निवड समितीने शिफारस केलेल्या लेखांना दोन पुरस्कार दिले जातील. प्रथम पुरस्कार ₹१०००/- चा व द्वितीय पुरस्कार ₹५००/- याप्रमाणे आहे. या पुरस्कारासाठी १ जानेवारी, २०२१ ते ३१ डिसेंबर २०२१ या कालावधीतील लेख विचारात घेतले जातील.

एक सदस्य जास्तीत जास्त आपले तीन लेख (चार प्रती) पाठवू शकतील. त्यासाठी प्रसिद्ध झालेले लेख, वृत्तपत्रांचे नाव व दिनांकासह झेरॉक्स करून १५ सप्टेंबर २०२२ पूर्वी कार्यवाह, मराठी अर्थशास्त्र परिषद यांच्याकडे पाठवावेत. दिनांक ५, ६ व ७ नोव्हेंबर २०२२ रोजी जे.ई.एस. महाविद्यालय, जालना, येथे संपन्न होत असलेल्या मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या ४५ व्या राष्ट्रीय अधिवेशनात हे पुरस्कार प्रदान केले जातील.

**पत्रव्यवहारासाठीचा पत्ता**

कार्यवाह खजिनदार, मराठी अर्थशास्त्र परिषद, डॉ. मारोती तेगमपुरे, 'संगाई', घर क्रमांक २२, भालचंद्र पेट्रोल पंपाच्यामागे, शहीद भगतसिंग नगर, पारनेर रोड, अंबड, जि. जालना ४३१२०४ (भ्रमणध्वनी: ९४२३९९३१३७)

**- डॉ. मारोती तेगमपुरे**

कार्यवाह खजिनदार, मराठी अर्थशास्त्र परिषद,

# Gig Economy and Zombie Company

**शिवकुमार खोबरे** †

मराठी अर्थशास्त्र परिषद आणि भाषा संचलनालय महाराष्ट्र राज्य शासन यांच्या संयुक्त विद्यमाने तीन दिवसांची एक कार्यशाळा लोणावळा येथे संपन्न झाली होती. त्या कार्यशाळेत ज्यांनी अर्थसंवाद अंकात अर्थशास्त्रातील शब्दांवर चर्चा केली आणि लेखन केले त्यांना सहभागी करून घेतले होते. या कार्यशाळेत प्रस्तुत लेखक सहभागी होते. त्या कार्यशाळेत प्रचलित आक्षेपहार्य शब्दाचा पुनर्विचार करणे, हा पहिला उद्देश होता. तसेच अर्थशास्त्रात नव्याने इंग्रजीतून येणाऱ्या शब्दांना योग्य पर्यायी अर्थपूर्ण शब्द सुचविणे, हा दुसऱ्या उद्देश होता. ज्या इंग्रजी शब्दांना अर्थपूर्ण पर्यायी शब्द सुचविणे कठीण आहे. अशा शब्दांसाठी नवीन मराठी शब्दरचना रूढ करावी, हा तिसरा उद्देश होता. तसेच मराठी अर्थशास्त्र परिभाषा कोष हा परिपूर्ण, निर्दोष आणि शास्त्रोक्त व्हावा, हा शेवटचा उद्देश होता.

पहिला अर्थसंवादचा अंक प्रसिद्ध झाल्यावर कै.नी.वि. सोवनी यांनी 'अर्थ शब्दांची वाट पाहे' हे सदर सुरू केले. इंग्रजीतून अर्थशास्त्रात येणाऱ्या शब्दावर सविस्तर चर्चा व्हावी, ही कै. सोवनी सरांची इच्छा होती. अर्थशास्त्र परिभाषा अधिक अर्थपूर्ण, परिपूर्ण, शास्त्रशुद्ध आणि समृद्ध व्हावी, हा त्या मागील उद्देश होता. नव्या शब्दांचे मराठीत रूपांतर जुन्या कालबाह्य शब्दांना नवीन मराठी शब्द आणि एकदम नवा अर्थवाहक शब्दांचा समावेश हा संदर्भ कै.सोवनी सरांना अभिप्रेत होता. ही नवीन शब्द रचना सुस्पष्ट, अर्थवाहक, शास्त्रोक्त, साधे, सोपश्र, सुटसुटीत अचूक आणि अर्थपरिपूर्ण असावेत, अशी त्यांची भूमिका होती. इतर विषयांतील इंग्रजी शब्दांची या सदरात चर्चा करणे इष्ट वाटत नाही. अन्यथा, ती चर्चा म्हणजे हॉबसन चॉईस (Hobson choice) होईल. तसेच अर्थशास्त्र हे तटस्थशास्त्र (Neutral Science) आहे. यांचे भान ठेवून या सदरात अन्य विषयांतील शब्दावरील चर्चा टाळणे इष्ट वाटते. तसेच विद्यापीठांच्या अभ्यासक्रमावर जी क्रमिका पुस्तके लिहिली जातात त्यात मराठी अर्थशास्त्र परिभाषा कोषातील शब्दांचाच वापर व्हावा. यामुळे सर्व विद्यापीठातील क्रमिक पुस्तकांत समानता तर दिसेलच; शिवाय शास्त्रशुद्धताही रूढ होईल. मराठी अर्थशास्त्र शब्दकोष तयार करण्यामागचा हा महत्त्वपूर्ण उद्देश साकार होईल. प्रत्यक्षात असा सर्वांगीण प्रयत्न होताना दिसत नाही, असे खेदाने म्हणावे लागते.

आता आपण इंग्रजीतून अर्थशास्त्रात आलेल्या Gig Economy या शब्दाची सविस्तर चर्चा करू.

† माजी प्राचार्य, डॉ. घाळी कॉलेज, गडहिंग्लज, जि. कोल्हापूर
आजीव सभासद क्र. : १६२, भ्रमणध्वनी : ९४२२५१३२२७ ई-मेल : skkhobare@gmail.com

न्यूयॉर्कमधील सुप्रसिद्ध ज्येष्ठ पत्रकार ब्रोन (Brown) यांनी २००९ मध्ये हा शब्द प्रथम वापरला. अमेरिकेत २००९ साली ही गिग अर्थव्यवस्था कार्यान्वित झाली होती. या नव्या आर्थिक व्यवस्थेवर दियान मल्की यांनी एक ग्रंथ प्रकाशित केला. त्या ग्रंथात गिग अर्थव्यवस्थेचे स्वरूप, व्याप्ती, गरज, फायदे, तोटे आणि धोके याची सविस्तर चर्चा केली. संगणक प्रणाली हे गिग अर्थव्यवस्थेचे महत्त्वाचे व्यासपीठ (Digital Platform) आहे. या प्रणालीमुळे श्रम बाजारात नवप्रवर्तन (Innovation) आले. या नवप्रवर्तनामुळे मानवी जीवनाची संपूर्ण जीवनशैली बदलून गेली. मानवाचे आर्थिक प्रश्न, मानवी वर्तन आणि उपभोक्त्यांचे लाभाधिक्य (Consumers Surplus) यात प्रचंड प्रमाणात बदल आहे. उत्पादन, रोजगार, वितरण आणि उपभोगात रचनात्मक बदल झाले. त्यामध्ये गतिशिलता आली. सध्या आपण Gig Economy मध्ये जगत आहोत. गिग अर्थव्यवस्था ही रोजगार बाजारातील नवीन मैलाचा दगड ठरली आहे. किंबहुना तो जागतिक अर्थव्यवस्थेचा कणा (Backbone of economy) झाला आहे. संगणक प्रणालीही या नवप्रवर्तनाचा पाया आहे.

गिग अर्थव्यवस्था म्हणजे मोबदला घेऊन फावल्या वेळेत वेळेच्या बंधनाशिवाय स्वखुशीने स्वीकारलेला तात्पुरता रोजगार होय. घरातून संगणकाद्वारे विमान, रेल्वे, बस, मोटारसायकल, ओबेरा गाडी इ. प्रवासी वाहानांच्या तिकिटांची नोंदणी करता येते, त्यामुळे प्रवासाचे अंतर समजते. ॲपमुळे प्रवास खर्च समजतो, तो भागवता येतो. यामुळे पर्याप्त खर्च आणि सुरक्षितता मिळते. तसेच घर, फ्लॅट, शेतजमीन, गाडी, फर्निचर, किराणा-भुसार माल, स्टेशनरी, कपडे, खेळणी, खेळाचे साहित्य इ. सर्व प्रकारच्या वस्तूची खरेदी-विक्री ॲपद्वारे करता येतात. उपभोक्ता अपेक्षित किंमतीला वस्तूची खरेदी करतात. यामुळे श्रमाची आणि वेळेची बचत होते; शिवाय कामे आनंददायी होतात.

अशा प्रकारच्या डिजिटल अर्थव्यवस्थेत औद्योगिक संबंध बिघडत नाहीत. औद्योगिक शांतता टिकून राहाते. पिळवणुकीला थारा नसतो. त्यामुळे श्रमप्रतिष्ठा वाढते. शिवाय या प्रकारच्या अर्थव्यवस्थेत उत्पादक, वितरक आणि ग्राहक यांचे हितसंबध अबादित राहतात. अन्न, वस्त्र आणि निवारा या मानवाच्या मूलभूत गरजा आहेत. या गरजा तात्काळ ॲपद्वारा भागविल्या जातात. त्यासाठी नो ब्रोकर, ९९ एकर्स, नोकरी डॉट कॉम, रोजगार, अमेझोन, झोमॅटो, फ्लिपकार्ट, मॅकडोनल आणि डॉमिनोज इ. संस्था कार्यरत आहेत. त्यामुळे सर्व प्रकारच्या वस्तूंची खरेदी-विक्री तात्काळ होत राहाते. श्रम बाजारात या प्रक्रियेला गिग अर्थव्यवस्था असे म्हणतात. देशातील असंघटित क्षेत्रातील ९०% इतका हिस्सा या अर्थव्यवस्थेने व्यापला आहे. कोविड-१९ मुळे गृहवितरण (Home Delivery) पद्धतीला चालना मिळाली. आपल्या देशात गिग अर्थव्यवस्था २०१९ पासून सुरू झाली आहे. सर्वात प्रथम २००० साली अमेरिका आणि इतर देशांत ही अर्थव्यवस्था सुरू झाली. मात्र या अर्थव्यवस्थेतील दोषामुळे काही देशांत कायदे करण्यात आले आहेत. आपल्या देशात या क्षेत्रात अद्याप तसे कायदे करण्यात आलेले नाहीत. अर्धवेळ, तात्पुरता आणि फावल्या वेळेत त्वरित रोजगार मिळण्याची संधी गिग अर्थव्यवस्थेतून उपलब्ध झाली आहे.

गिग अर्थव्यवस्था Gig Economy या शब्दाला मी **शीघ्र सेवा अर्थव्यवस्था** हा पर्यायी शब्द सुचवत आहे. तथापि, या शब्दावर आणखी सखोल चर्चा होणे अपेक्षित आहे.

### Zombie Company झोंबी कंपनी

'झोंबी कंपनी' हा शब्द सर्वात प्रथम १९८७ साली एडवर्ड काने (Edward Kane) या जपानी लेखकांनी आपल्या ग्रंथात वापरला. झोंबी कंपनी म्हणजे कायम

तोट्यात चालणारी; पण कर्ज घेण्यात यशस्वी होणारी कंपनी होय. झोंबी कंपन्या आपला व्यवसाय चालविण्यासाठी नव्हे तर आपले अस्तित्व कायम ठेवण्यासाठी मोठ्या रकमेची कर्जे घेतात. मिळालेल्या कर्जातून झोंबी कंपन्या आपला स्थिर खर्च आणि दैनंदिन खर्च म्हणजे वेतन, वीज बिल मालमत्ताकर, फोन बिल आणि कर्जावरील व्याज भरतात. तथापि, कर्जाचे हप्ते किंवा मुद्दल परत करत नाहीत. झोंबी कंपन्या कायम तोट्यात चालतात. त्यामुळे मुद्दल किंवा कर्जाचे हप्ते भरणे अशक्य असते. केवळ कर्ज घेण्यात यशस्वी होऊन त्या आपले अस्तित्व कायम ठेवण्यात यशस्वी होतात. अशा स्वरूपाच्या कुकर्ज घेणाऱ्या कंपन्या सर्वात प्रथम जपानमध्ये आढळून आल्या. त्यानंतर अमेरिका आणि अन्य देशांत त्यांचे अस्तित्व दिसून आहे.

आपल्या देशात झोंबी कंपन्याचे अस्तित्व दिसून येते. झोंबी कंपन्यांमुळे केवळ बँक व्यवसायालाच नव्हे; तर संपूर्ण अर्थव्यवस्थेला धोका निर्माण झाल्याचा इशारा अलीकडे रिझर्व्ह बँकेने दिला आहे. रिझर्व्ह बँकेच्या मते, झोंबी कंपन्या देशातील एकूण वितरित कर्जाच्या १०% पेक्षा जास्त कर्ज प्राप्त करतात. तसेच बिगर वित्तीय कंपन्या १०% कुकर्ज गिळंकृत करतात. म्हणजे एकूण कर्ज वितरणापैकी २०% कर्ज हे कुकर्ज या झोंबी कंपन्या हडप करतात. रिझर्व्ह बँकेने झोंबी कंपन्यांना २०% कर्ज दिल्याने त्याचा कोणताच लाभ अर्थव्यवस्थेला होत नाही. ही गंभीर बाब असल्याचे म्हटले आहे. तसेच दीर्घकालात या कुकर्जाचे वाढत जाणारे ओझे हे धोकादायक असल्याचे मत व्यक्त केले आहे.

अशा प्रकारच्या झोंबी कंपन्यांच्याबाबत रिझर्व्ह बँक संवेदनशील झाली असून, त्यावर कठोर नियंत्रण लादण्यास २०१५ पासून सुरुवात झाली आहे. या झोंबी कंपन्यांचे आश्रय दाते हे रिझर्व्ह बँकेचेच सभासद बँका आहेत. म्हणून रिझर्व्ह बँकेने Asset Quality Review म्हणजे मत्ता गुणवत्ता पडताळणी सुरू केली आहे. या प्रक्रियेत कंपन्यांची मत्ता गुणवत्ता तपासली जाते. मंदीमुळे आणि सततच्या तोट्यामुळे मत्तांचे बाजार मूल्य घटल्याने झोंबी कंपन्याचा फटका बँक व्यवसायाला आणि पर्यायाने अर्थव्यवस्थेला बसतो. झोंबी कंपन्यांचा परतावा हा नकारात्मक असतो. कर्ज हशील करण्यात मात्र या कंपन्या पटाईत असतात. त्यांच्यातील गुंतवणूक अनुत्पादक किंवा वांझोटी असते. या कुकर्ज प्रथेमुळे समग्र अर्थव्यवस्था कुंठितावस्थेकडे (Stagment Stage) नेण्यास झोंबी कंपन्या कारणीभूत ठरतात. आपल्या देशात १९९० पासून झोंबी कंपन्यांच्या अलाभदायी मतांचा प्रश्न गंभीर झाला आहे.

झोंबी कंपनी (Zombie Company) या विशेषनामाला मराठीत परोपजीवी, परावलंबी किंवा बांडगूळ कंपनी म्हणता येईल. तसेच झोंबी पेढी (Zombie Firm) म्हणजे परोपजीवी पेढी, परावलंबी पेढी किंवा बांडगूळ पेढी असे म्हणता येईल. झोंबी कंपनी, झोंबी पेढीप्रमाणे झोंबी बँकांचेही प्रकटीकरण साकारत आहे. या झोंबी बँका Zombie Banks आपल्या प्रधान कार्यालयावर किंवा मध्यवर्ती बँकेच्या कर्जावर आपले नाणेबाजारातील अस्तित्व टिकवून ठेवतात. अशा **झोंबी बँकांना परावलंबी बँक परोपजीवी बँक किंवा बांडगूळ बँक असे म्हणता येईल.** प्रस्तुत लेखक Zombie या शब्दाला 'बांडगूळ' शब्द सुचवत आहे.

◆

# National Monetization Pipeline

**संतोष दास्ताने** †

दि. २३ ऑगस्ट, २०२१ रोजी भारताच्या अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी नेशनल मोनेटायझेशन पाईपलाइन - राष्ट्रीय चलनीकरण वाहिनी हे महत्त्वाकांक्षी धोरण जाहीर केले. त्या निमित्ताने ज्या इंग्रजी - मराठी संज्ञा वृत्तपत्रांमध्ये आणि माध्यमांमध्ये वापरल्या गेल्या त्यांची दखल घेणे भाग आहे (उदा. चलनीकरण चालेल? लोकसत्ता अग्रलेख, दि. २६ ऑगस्ट, २०२१).

या धोरणाच्या शीर्षकात मोनेटायझेशन असा शब्द आहे. त्याचे चलनीकरण हे भाषांतर सर्वत्र वापरले जात आहे. पाच वर्षांपूर्वीच्या देशातील निश्चलनीकरण धोरणावेळी हा शब्द सगळीकडे वापरला गेला होता. मोनेटायझेशन याचा रूढ अर्थ मौद्रिक अर्थशास्त्र आणि बँकिंग या विषयांच्या संदर्भात पाहिला पाहिजे. तो असा : काही विशिष्ट नियम - कायदे आणि मर्यादेच्या चौकटीत राहून देशात रोख पैसा - नोटा / नाणी या स्वरूपात, अधिकृतरीत्या चलनात आणणे. (निश्चलनीकरण - डीमोनेटायझेशन याचा अर्थ काही नोटा - नाणी चलनातून रद्द ठरवणे, बाद करणे, ते आता व्यवहारात वापरता येणार नाही - ते आता कायदेशीर नाही असे जाहीर करणे). शासनाच्या अर्थशास्त्र परिभाषा कोशात मोनेटायझेशनला पैसाकरण, मुद्रीकरण, चलनादेशन असे शब्द दिलेले आहेत. यापैकी पैसाकरण हा शब्द व्याकरणदृष्ट्या चूक आहे. कृ आणि भू या क्रियापदांचे नाम करताना आधीच्या शब्दाचे दीर्घ ईकारात रूपांतर होते. जसे राष्ट्रीयीकरण, शुद्धीकरण, द्रवीभवन, वक्रीभवन इ. त्यामुळे पैसाकरण ही संज्ञा बाद ठरते.

आता जे धोरण जाहीर झाले आहे त्यात सरकारला वेगळाच अर्थ अभिप्रेत आहे. सरकारच्या मालकीची सध्या जी अनेक अनुत्पादक संसाधने - मत्ता - उपक्रम आहेत ते परिचालनासाठी खासगी कंपन्यांच्या हातात सोपवले जाणार आहेत. त्यातून जे उत्पन्न मिळेल त्यातील काही हिस्सा सरकारी तिजोरीत जमा होणार आहे. यातून पुढील चार वर्षांत मिळून सरकारकडे एकूण सुमारे सहा लाख कोटी रुपये जमा होतील, असा अंदाज आहे. या व्यापक आराखड्यास नॅशनल मोनेटायझेशन पाईपलाइन असे नाव देण्यात आले आहे. असे चलनीकरण म्हणजे अर्थातच खासगीकरण नव्हे. त्या मत्तांची मालकी सरकारकडेच राहाणार आहे. मालकी सरकारी, फक्त परिचालन अधिकार खासगी असा हा व्यवहार असणार आहे.

† माजी अध्यक्ष व माजी विश्वस्त,मराठी अर्थशास्त्र परिषद.
आजीव सभासद क्र. : ६३, भ्रमणध्वनी : ९८२२००९९५४ ई-मेल : santosh.dastane@gmail.com

राष्ट्रीय चलनीकरण वाहिनी असा शब्दप्रयोग या संदर्भात जर वापरला तर तो पहिल्या पारंपारिक अर्थाने घेतला जाण्याची दाट शक्यता आहे. पण ते चूक आणि दिशाभूल करणारे होईल. कारण रु.६ ला. को. इतकी रक्कम या धोरणातून नव्याने चलनात आणण्याचा सरकारचा कोणताही मानस नाही (ते निर्णय शेवटी फक्त रिझर्व्ह बँकच घेत असते). त्या रकमेचे केवळ हस्तांतरण होणार आहे. ती फसगत होऊ नये यासाठी राष्ट्रीय रोखीकरण वाहिनी असा शब्दप्रयोग वापरणे अधिक योग्य ठरेल. मालमत्तेतून सरकार रोख पैसा मिळवू पाहत आहे, असा अपेक्षित अर्थ या शब्दप्रयोगातून व्यक्त होईल.

Brownfield and Greenfield Projects

वरील रोखीकरण वाहिनीच्या संदर्भात ब्राऊनफिल्ड प्रोजेक्ट आणि ग्रीनफिल्ड प्रोजेक्ट अशा संज्ञा सरकारने वापरल्या आहेत. या दोन प्रकारच्या प्रकल्पांमध्ये गुंतवणुका होण्यासाठी सरकार उत्तेजन व सवलती देत आहे. विदेशातूनही या प्रकल्पांमध्ये गुंतवणूक अपेक्षित आहेत. या संज्ञा नागरीकरण, नगर नियोजन, पायाभूत सेवा विकसन, नगर विकास या संदर्भात सध्या वापरतात. जी जमीन विकसित झालेली आहे; पण आता वापरात नाही, मोकळी अथवा उजाड आहे अशा जमिनीवरील प्रकल्पाला ब्राऊनफिल्ड असे नाव आहे. येथे विकसित याचा अर्थ त्यावर वीज, रस्ते, पाणी, सांडपाण्याचा निचरा, दूरसंपर्क जोडण्या यांची व्यवस्था झालेली असणे. जर जमीन वापरली नाही तर तिचा दुरुपयोग होईल, तिचा दर्जा खालावेल, भू-प्रदूषण होईल, अशी शक्यता असते. यासाठी अशा प्रकल्पांना उत्तेजन दिले जाते. अशी जमीन मुळात विकसित असल्याने त्यावर नव्याने परवानग्या - प्रमाणपत्रे मिळवण्याचा खर्च आणि वेळ वाचतो म्हणूनही यांना प्राधान्य असते. एखादा प्रकल्प रद्द केला किंवा स्थलांतरित केला तर जी जमीन शिल्लक राहाते तीवर ब्राऊनफिल्ड प्रकल्प उभारले जातात. घर बांधणी, दुकाने, उद्याने, क्रीडांगणे यांची उभारणी येथे होते. देशात होणाऱ्या थेट विदेशी गुंतवणुकीत ब्राऊनफिल्ड प्रकल्पांना अग्रक्रम मिळतो. किमान रु.१०० कोटी मूल्य असणाऱ्या अशा प्रकल्पांना सरकार अधिक सवलती देत आहे. बहुराष्ट्रीय कंपन्या ब्राऊनफिल्ड प्रकल्प अधिक पसंत करतात.

ग्रीनफिल्ड प्रोजेक्ट याचा अर्थ पूर्णपणे अविकसित असलेल्या जमिनीवर प्रकल्प उभारणे. म्हणजे तेथे मोठा पैसा - वेळ खर्च करून रस्ते-वीज-पाणी अशा पायाभूत सोयी प्रथम द्याव्या लागतील आणि मग त्यानंतर इतर कोणता प्रकल्प उभारता येईल.

वृत्तपत्रांनी आणि माध्यमांनी या घटनांचे वर्णन करताना अनुक्रमे बदामी क्षेत्र प्रकल्प व हरित क्षेत्र प्रकल्प अशी परिभाषा वापरली आहे. तो शब्दशः अनुवाद एकवेळ ठीक मानता येईल. पण त्यात अभिप्रेत असलेला अर्थ पाहता अनुक्रमे **पूर्वसिद्ध प्रकल्प आणि असिद्ध प्रकल्प** असे म्हणणे अधिक योग्य होईल, असे वाटते.

◆

पुस्तक
परिचय

# भारतातील आरोग्यसेवा व धोरण

**उत्तम वाकोडकर** †

पुस्तकाचे नाव : आरोग्याचे अर्थशास्त्र
लेखक: डॉ. सतीश श्रीवास्तव, डॉ. विजय ककडे, डॉ. रामदास माहोरे
प्रकाशक : शब्दमल्हार प्रकाशन, नाशिक,
पृष्ठसंख्या : २५०, किंमत : रु.३५०/-
प्रकाशन वर्ष : २०२०

प्रा. डॉ. सतीश श्रीवास्तव, डॉ. विजय ककडे आणि डॉ. रामदास माहोरे यांनी लिहिलेले 'आरोग्य अर्थशास्त्र भारतीय आरोग्यसेवा व धोरण' हे पुस्तक नुकतेच प्रकाशित झाले. सदर पुस्तक हे या विषयावरील दर्जेदार असे मराठी भाषेतील पहिलेच पुस्तक आहे. तिन्ही लेखक अर्थशास्त्राचे नावाजलेले विश्लेषक व अभ्यासक आहेत.

प्रस्तुत पुस्तकात दोन व्यापक प्रकरणे व प्रत्येक प्रकरणात ५-६ उपविषय आणि परिशिष्ट असा समावेश आहे.

आरोग्य अर्थशास्त्राच्या विविध पैलूवर सैद्धांतिक आणि धोरणात्मक पातळीवर व्यापक चौकटीत या विषयावर मराठी भाषेत महत्त्वपूर्ण व प्रस्तुत विषयावर अभ्यासकांना आणि संशोधकांना नवीन दिशा देणारे लिखाण समोर आले हे या पुस्तकाचे वैशिष्ट्य आहे. या पुस्तकाला मुंबईचे प्रख्यात डॉक्टर आणि ग्रॅन्ट मेडिकल कॉलेजचे भूतपूर्व मानद प्रोफेसर डॉ. प्रदीप गो. तळवळकर यांची प्रस्तावना लाभली आहे. प्रस्तुत पुस्तकातील प्रस्तावनेत आरोग्यसेवांचे नियोजन करणे आणि त्याची योग्य अंमलबजावणी यासाठी आरोग्य अर्थतज्ज्ञाची मदत अधोरेखित करून या पुस्तकामुळे एक दीर्घकालीन गरज पूर्ण होत आहे, हे स्पष्ट केले आहे.

प्रस्तुत पुस्तकात मनोगतामध्ये लेखकांनी या लिखाणाच्या संदर्भातील भूमिका व प्रयोजन व्यक्त करताना म्हटले की, आरोग्य हे अर्थशास्त्राशी कसे निगडित आहे आणि अर्थशास्त्रातील मूलभूत सिद्धांताच्या आधारे आरोग्य विवेचन कसे करता येईल, हा या पुस्तकाचा मूळ गाभा आहे. संशोधनाच्या आणि आरोग्य अर्थशास्त्रीय लिखाणाच्या संभाव्यतः अधिक विस्ताराव्यात हा या पुस्तकाच्या लिखाणाचा हेतू त्यांनी अधोरेखित केला आहे व हेच या पुस्तकाचे फलित आहे.

आरोग्याचा अर्थशास्त्राशी आणि अर्थव्यवस्थेशी कसा संबंध आहे हे प्रस्तुत पुस्तकातील लिखाणातून अधिक प्रभावीपणे स्पष्ट होते. प्रस्तुत पुस्तकात

† निवृत्त प्राध्यापक, स्वामी रामानंदतीर्थ महाविद्यालय, अंबाजोगाई, जि. बीड.
आजीव सभासद क्र. : ७०८, भ्रमणध्वनी : ९८८१८५९९९४ ई-मेल : wakodkarud@gmail.com

आरोग्यसेवांची मागणी, आरोग्यसेवांचे स्वरूप आणि उत्पादन, भारतातील आरोग्यसेवा आणि भारतातील वैद्यकीय शिक्षण ही प्रकरणे डॉ. सतीश श्रीवास्तव यांनी तर आरोग्यसेवांची बाजारपेठ, आरोग्यसेवांची समानता आणि वितरण, आरोग्यसेवा आणि खर्च. लाभ सिद्धांत आणि भारतातील औषध आणि वैद्यकीय उपकरणे डॉ. विजय ककडे यांनी आणि आरोग्य अर्थशास्त्राचे स्वरूप आणि महत्त्व, भारतातील आरोग्यसेवावरील खर्च, भारतातील आरोग्य विमा व आयुष्यमान योजना ही प्रकरणे डॉ. रामदास माहोरे यांनी लिहिलेली आहेत. डॉ. ककडे यांनी कोरोनाविषयक परिशिष्ट लिहिले आहे. पुस्तकातील असममिती माहिती हा भाग नावीण्यपूर्ण आहे.

पहिल्या प्रकरणाच्या संदर्भात उपप्रकरण १.१ मध्ये अर्थशास्त्राचे सैद्धांतिक स्वरूप खूप सखोलरित्या स्पष्ट केले आहे.

मॉरिश, डेवलिन पार्किन आणि स्पेन्सर (२०१२) इ. अर्थतज्ञांनी आरोग्य अर्थशास्त्राची जी व्याख्या केली त्याचे विवेचन करून नोबेल पारितोषिक विजेते अर्थशास्त्रज्ञ केनेथ ॲरो (१९५३) यांनी आरोग्य आणि इतर वस्तू यामध्ये जो संकल्पनात्मक फरक स्पष्ट केला त्याचे विवेचन केले आहे. ॲलन विल्यम यांनी आरोग्याच्या अर्थशास्त्राचे अध्ययन करण्यासाठी सुचविलेल्या क्षेत्राचे चिकित्सकरित्या विवेचन केले आहे. प्रस्तुत प्रकरणात आरोग्यविषयक बाजाराचे अध्ययन कशा प्रकारे करता येईल, यावरही प्रकाश टाकला आहे.

आरोग्याच्या व्याप्तीचा महत्त्वपूर्ण घटक म्हणून नियोजन, अर्थसंकल्पन आणि संनियंत्रण यंत्रणा यावर विवेचन करून या शास्त्राच्या विकासाला बराच वाव असल्याचा निष्कर्श अधोरेखित केला आहे. प्रस्तुत प्रकरणात आरोग्याच्या अर्थशास्त्राचे स्वरूप विशद करून १९९० नंतर आरोग्याच्या अर्थशास्त्राचे स्वरूप कसे बदलले ते थोडक्यात स्पष्ट केले. माहितीची समस्या, आरोग्याच्या अर्थशास्त्राचे महत्त्व, आरोग्यसेवा प्रदान करण्यातील आर्थिक प्रश्न, आरोग्यावरील पोहोच (Access) वैद्यकीय पर्यटन, आरोग्य अर्थशास्त्रात सांख्यिकीय तंत्राचा अवलंब आरोग्य उत्पादन फलन, औषधाची भूमिका आणि आरोग्यविमा सामाजिक भांडवल आणि आरोग्य, आरोग्यात डॉक्टरची भूमिका, आरोग्याचे आर्थिक मूल्यांकन आदी मुद्दे विचारात घेऊन या प्रकरणात जी मांडणी केली ती चिकित्सक व सखोल अभ्यासाची साक्ष देते.

प्रस्तुत प्रकरणात आरोग्याच्या अर्थशास्त्राची दोन वैशिष्ट्ये नमूद करून त्याचे विवेचन करताना आरोग्य संशोधनाचे स्वरूप आंतरशास्त्रीय आहे व आरोग्यनिगा प्रणालीतील संस्था महत्त्वपूर्ण मानल्या जातात, हे अधोरेखित केले आहे. आरोग्याचे आर्थिक विश्लेषण म्हणजे काय हे स्पष्ट करून आर्थिक कार्यक्षमता आणि व्यय-लाभ विश्लेषण व त्याची आवश्यकता स्पष्ट केली आहे. सामाजिक भांडवल आणि आरोग्य या संदर्भात ऊहापोह करून हे नमूद केले की, आरोग्याच्या अर्थतज्ज्ञांनी यावर लक्ष केंद्रित करून सामाजिक भांडवलात सुधारणा झाली तर आरोग्य सुधारणा घडून येते हा काढलेला निष्कर्ष अधोरेखित केला आहे.

उपप्रकरण १.२ मध्ये आरोग्यसेवेचे मागणीचे स्वरूप व आरोग्याच्या मागणीचे निर्धारक घटक कोणते आणि अन्य कोणते सिद्धांत आरोग्याच्या मागणीस लागू पडतात हे शास्त्रीयरित्या स्पष्ट केले आहे. तक्ते व आकृत्याच्या साहाय्याने हे केलेले विवेचन प्रस्तुत प्रकरणाच्या संदर्भात आकलनाच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे. अर्थशास्त्रातील मागणी सिद्धांतानुसार आरोग्यसेवेचे विश्लेषण करणे कसे शक्य आहे हे स्पष्ट करून आरोग्यसेवेच्या मागणीच्या बाबतीत असममिती माहिती आणि अनिश्चिततेतील निवड या समस्या कशा निर्माण होतात याचा संक्षिप्त आढावा घेतला आहे.

१.३ या उपप्रकरणात आरोग्यसेवांचे स्वरूप व त्यात आणि अन्य आर्थिक सेवांमध्ये भिन्नता कोणती

याचा ऊहापोह करून अर्थशास्त्रातील उत्पादनफल सिद्धांतानुसार आरोग्यसेवांच्या उत्पन्नाचे विश्लेषण कसे करता येते हे सोप्या भाषेत समजून दिले आहे. आरोग्यसेवेचा पुरवठा करणाऱ्यांच्या निर्णयाचे आणि निवडीचे अर्थसिद्धांत, आर्थिक प्रतिमाने, उत्पादन, वितरणा, समानता, बाजारपेठेचे सिद्धांत प्रयोगसिद्ध तंत्र आदी आर्थिक विश्लेषणाची साधने वापरून आरोग्यसेवेचा अभ्यास करता येतो हे सखोलरित्या समजून दिले आहे.

१.४ या उपप्रकरणात निरनिराळ्या बाजारपेठांची वैशिष्ट्ये आरोग्य, आरोग्यसेवांच्या संदर्भात स्पष्ट केली आहे. आकृती व कोष्टकांच्या साहाय्याने विवेचन केले आहे. खेळ सिद्धांत किंवा कैद्याची शृंगापत्ती याचे तक्त्याच्या साहाय्याने विवेचन डॉक्टरसमोरील पेचप्रसंग कसा असतो ते स्पष्ट केले आहे. डॉक्टर व रोगी याबाबत निर्णय प्रक्रियेत खेळ सिद्धांताचा निष्कर्ष वापरता येतो, हे तक्त्यावरून स्पष्ट केले आहे.

१.५ या उपप्रकरणात आरोग्यसेवेची समानता किंवा न्याय आणि वितरण याचा शाखीयरित्या व सखोल असा आढावा घेताना आकृतींचा वापर केलेला आहे.

आरोग्यसेवेतील समांतर व उर्ध्वसमता, समांतर असामानता निर्माण होणारी कारणे, उर्ध्वसमता आदीचा सोप्या भाषेत ऊहापोह केला आहे. आरोग्य खर्च मापनासाठी काकवानी (kak ani) indew) निर्देशकाचे महत्त्व अधोरेखित करून या निर्देशकाची पद्धती स्पष्ट केली आहे. अनारोग्याचे दृष्टचक्र ही संकल्पना आकृतीच्या साहाय्याने स्पष्ट करून आरोग्यदर्जा आणि आर्थिक स्थिती यातील मरमॅट (१९९८) याचा अभ्यास व त्यातील निष्कर्ष अधोरेखित केला आहे. आरोग्यातील विषमता विविध सामाजिक घटक्यात ज्या काही निर्देशकांच्या स्वरूपात व्यक्त होत असते, त्याची चिकित्सक चर्चा केली आहे.

नोबेल पारितोषिक विजेते अमर्त्य सेन यांनी आरोग्यसमता साध्य करण्याचा संदर्भात मांडलेल्या मानवी क्षमता दृष्टिकोन विशद केला आहे. आरोग्याचे व्यापक निर्देशक (Health indicatures) स्पष्ट करण्यात आले आहे. आजारीपणाचा भार मापनासाठी क्लारमन यांनी मांडलेल्या समायोजित जीवनवर्ष ही संकल्पना स्पष्ट करून विविध पद्धतीने आजारी कालखंडाचे व्यक्तिनिष्ठ मापन करण्यासाठी धारकांचा वापर कसा केला जातो, याचे विवेचन प्रस्तुत उपप्रकरणात केले आहे.

१.६ या उपप्रकरणात आरोग्य अर्थशास्त्राचा एक महत्त्वाचा घटक म्हणून लाभ, खर्च सिद्धांत स्पष्ट करून लाभमापन घटक स्पष्ट केले आहेत. आरोग्यसेवेचे विविध प्रकारचे लाभ मोजण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या विविध पद्धती व दृष्टिकोन सुलभ व प्रवाही भाषेत स्पष्ट केले आहेत. लाभ-खर्च मापन आरोग्यसेवा क्षेत्रासंदर्भात विचारात घेताना आजारपणाचा परिणाम वैयक्तिक व सामाजिक किंवा राष्ट्रीय स्तरावर होतो, याची सखोल चर्चा केली आहे.

२.१ या प्रकरणात भारतातील वैद्यकीय सेवेची रचना, मानवी संसाधने, आरोग्य निर्देशक, आरोग्यसेवेची उपलब्धता, आरोग्यसेवेवरील खर्च करण्याची देय क्षमता, समिश्र निदान पद्धतींचा प्रश्न राष्ट्रीय आरोग्य धोरण इत्यादी पैलूचा अभ्यासपूर्ण व चिकित्सकरित्या परामर्श घेतला आहे. आकडेवारी व तक्त्यांच्या साहाय्याने केलेले विवेचन हे या प्रकरणाचे वैशिष्ट्य आहे. आरोग्यसेवेतील मानवी संसाधनाचे महत्त्व आणि देशातील याबाबतची उपलब्धता याचा विचार कोविड-१९ या महासाथीच्या परिणामाच्या संदर्भात किती महत्त्वाचा आहे हे अधोरेखित होते. सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेतील संरचनात्मक कमतरता व खाजगी वैद्यकीय सेवाचे वर्चस्व हे वास्तव समोर येते. आरोग्यसेवेचे वित्तीय कवच भारतातील रुग्णसेवेच्या संदर्भात किती महत्त्वाचे आहे, हे प्रस्तुत प्रकरणातून समोर येते.

२.२ या उपप्रकरणात भारतातील आरोग्यसेवावरील खर्चाची आरोग्य संवर्धनात भूमिका सखोलरित्या विशद केली आहे व त्या अनुषंगाने आरोग्यसेवेवरील अर्थप्रबंधनाच्या पद्धती आणि आरोग्यवित्ताचे चार दृष्टिकोन स्पष्ट केले आहेत.

प्रस्तुत उपप्रकरणात राज्यनिहाय सार्वजनिक आरोग्याची स्थितीची आकडेवारी व तक्ते यांचा आधार घेऊन आढावा घेतला आहे व भारतात आरोग्य सोयीची राज्यनिहाय विषमता कशी आहे हे याचे विवेचन आकडेवारीच्या आधारे केलेले आहे.

२.३ या उपप्रकरणात देशातील बहुसंख्य लोकसंख्या ही विम्याच्या संरक्षणापासून वंचित आहे हे वास्तव अधोरेखित करून भारतात उपलब्ध विविध योजना तसेच आयुष्यमान भारत योजनेची आवश्यकता विशद करून या योजनेची प्रगती व टीकात्मक मूल्यमापन करताना आकडेवारीचा आधार घेतला आहे व गरिबांना जर गुणवत्तापूर्ण उपचार मिळाले, तर आयुष्यमान भारत योजना ही वरदान ठरू शकते, हे अधोरेखित केले आहे.

२.४ या उपप्रकरणात भारतातील औषध उद्योगाचे स्वरूप, जनीपधीची निर्मिती व पेटंट कायदे, औषध उद्योगाची निर्यात, जैवतंत्र औषध उद्योग या विविध पैलूंवर विवेचन करून सकॉस्कीव्हिजन यांनी औषध कंपन्यांच्या संदर्भात मांडलेला कटसिद्धांत स्पष्ट करून डेव्हिड ग्रिम्स यांनी कटविद्धांताची गणिती अशक्यता कशी स्पष्ट केली ते अधोरेखित केले आहे.

आरोग्य बाजारपेठेचा आकार व कोष्टकाआधारे स्पष्ट केला आहे. आरोग्य बाजारपेठ विस्तारण्याची कारणे स्पष्ट केली आहेत. वैद्यकीय उपकरणे आरोग्यसेवेची गुणवत्ता, अचूकता, कार्यक्षमता वाढीस कशी महत्त्वाची आहेत. आरोग्यसेवा आणि उपकरणे यासंदर्भात काही प्रमुख देशांचा विचार करून तुलनात्मक आकडेवारी दिली आहे व आरोग्यसेवा व उपकरणे यांच्या विस्ताराला खूप वाव असल्याचे स्पष्ट केले. भारतातील वैद्यकीय उपकरणे उद्योगाची रचना स्पष्ट करून सध्या या क्षेत्रावर बहुराष्ट्रीय कंपन्यांची मोठी पकड असल्याचे साधार मत व्यक्त केले. भारतीय वैद्यकीय उपकरणे उद्योगास विस्तारण्यासाठी कोणते महत्त्वपूर्ण घटक आहेत याचे मुद्देसूद विवेचन करून या क्षेत्रातील विकासाच्या संधी आणि आव्हाने स्पष्ट केली आहेत.

२.४ या उपप्रकरणात भारतातील वैद्यकीय शिक्षणाचा संक्षिप्त इतिहास, महाविद्यालयाची संख्या आणि प्रवेश संख्या, इतर साहाय्यक वैद्यकीय सेवक आणि वैद्यकीय शिक्षणाची सद्यस्थिती व त्यातील प्रमुख समस्या याचा घेतलेला आढावा अभ्यासपूर्ण आहे. संमिश्र निदान पद्धती (क्रॉसोपॅथी.) चा ऊहापोह करून आयुष डॉक्टरना संमिश्र उपचार पद्धतीस परवानगी देऊन अनधिकृत डॉक्टरांच्या व्यवसायाला आळा घालता येईल, असे मत अधोरेखित केले. 'मिशनची स्थापना आणि उद्देश' याचाही आढावा प्रस्तुत उपप्रकरणात घेतला आहे. नॅशनल मेडिकल कोरोना महामारी धोरणात्मक बदल हे परिशिष्ट खूप वैशिष्ट्यपूर्ण आहे. जागतिक स्तरावर कोरोनाचा प्रसार विविध राष्ट्रांत कशा प्रकारे झाला याबद्दलची ताजी व अद्ययावत आकडेवारी देऊन विवेचन केले आहे. तसेच भारतातील राज्यनिहाय कोरोनास्थितीविषयक तक्ता दिलेला आहे. कोरोना या महासाथीच्या निमित्ताने भारतातील सार्वजनिक आरोग्य व्यवस्था किती कमकुवत आहे, हे स्पष्ट झाले. आरोग्य व्यवस्थेत केवळ आवश्यक मनुष्यबळाची कमतरता नसून अनेक संरचनात्मक दोष आहेत हे प्रस्तुत प्रकरणात अधोरेखित करण्यात येऊन नीती आयोगाने प्रकाशित केलेला धोरणात्मक आढावा व भारतीय आरोग्य व्यवस्था पुढील दशकात बदलणे कसे आवश्यक आहेत हे काही महत्त्वपूर्ण मुद्दे समोर ठेवून चर्चिले आहेत.

आरोग्य धोरण दिशा सामाजिक लाभाच्या व्यवस्थेकडे नेण्याची आवश्यकता खूप अभ्यासपूर्ण व तर्कसंगतमुद्दे समोर ठेवून अधोरेखित केली आहे. वैद्यकीय

बाजारपेठेत माहितीची असमानता मोठ्या प्रमाणावर असते, असे नमूद करून वैद्यकीय क्षेत्रापुढे बाजारपेठेच्या नियमानुसार पाहणे हे सामाजिक हिताकरिता योग्य ठरत नाही हा महत्त्वाचा निष्कर्ष प्रस्तुत प्रकरणात मांडला आहे. प्रस्तुत पुस्तकामुळे आरोग्याच्या अर्थशास्त्रावरील मराठीत दर्जेदार संदर्भग्रंथ उपलब्ध झाला आहे. या पुस्तकाचे महत्त्व केवळ अभ्यासाच्या व आकडेवारीच्या आधारापुरते मर्यादित नाही, तर शाखीय विश्लेषण आणि विवेचनाच्या ओघात लेखकांनी या क्षेत्रातील नवीन संशोधनाच्या दिशा सुचविलेल्या आहेत. विश्लेषणातील अचूकता, सखोलपणा व संशोधनपर दृष्टिकोन आणि मुद्देसूद मांडणी यांमुळे पुस्तकाचा दर्जा स्वागतार्ह आहे.

वैद्यकीय क्षेत्राशी निगडित अभ्यासक आणि विद्यार्थी वैद्यकीय क्षेत्रातील संबंधित प्रशासकीय अधिकारी, संशोधक व धोरणकर्ते या सर्वांना हे पुस्तक उपयुक्त ठरणार आहे व प्रस्तुत विषयावर मराठी भाषेत एक उत्कृष्ट संदर्भस्रोत म्हणून या पुस्तकाचे स्वागत होईल, अशी अपेक्षा आहे. सखोल चर्चा, अद्ययावत आकडेवारी, नकाशे, तक्ते व अनेक संदर्भ असलेले हे पुस्तक खूप महत्त्वपूर्ण भर टाकणारे आहे व त्याचे संदर्भमूल्य सहज लक्षात येते.

पुस्तकाच्या शेवटच्या भागात दिलेली विस्तृत संदर्भसूची अभ्यासकांना खूप उपयुक्त ठरणारी आहे. प्रस्तुत पुस्तकामुळे अर्थशास्त्र विषयाशी निगडित मराठी साहित्यात मोलाची भर घातली आहे. या पुस्तकाचे सुनील वेळजाली यांनी चितारलेले मुखपृष्ठ वेधक व अर्थपूर्ण आहे व हे या पुस्तकाचे आकर्षण आहे. आरोग्याचे अर्थशास्त्र व आरोग्यविषयक धोरण, प्रशासन आणि भारताच्या आरोग्य क्षेत्रातील प्रगती व समस्या आणि भवितव्य यात स्वारस्य असणाऱ्यांनी प्रस्तुत पुस्तक जरूर वाचावे.

◆

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ ग्रंथ पारितोषिक

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या वतीने मराठी भाषेत प्रकाशित झालेल्या अर्थशास्त्रीय ग्रंथास ₹१०००/- चे डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ ग्रंथ पारितोषिक प्रतिवर्षी देण्यात येते. १ जानेवारी, २०२१ ते ३१ डिसेंबर २०२१ या कालावधीतील मराठीतील अर्थशास्त्रीय ग्रंथाच्या लेखकांना (मराठी अर्थशास्त्र परिषदेचे आजीव सभासद असणे आवश्यक) स्पर्धेत सहभागी होता येईल. नमुन्यातील अर्ज, संबंधित ग्रंथाच्या चार प्रती कार्यवाहांकडे १५ सप्टेंबर २०२२ पर्यंत पाठवाव्यात. दिनांक ५, ६ व ७ नोव्हेबर २०२२ रोजी जे.ई.एस. महाविद्यालय, जालना, येथे संपन्न होत असलेल्या मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या ४५ व्या राष्ट्रीय अधिवेशनात हे पुरस्कार प्रदान केले जातील.

**पत्रव्यवहारासाठीचा पत्ता**

कार्यवाह खजिनदार, मराठी अर्थशास्त्र परिषद, डॉ. मारोती तेगमपुरे, 'संगाई', घर क्रमांक २२, भालचंद्र पेट्रोल पंपाच्यामागे, शहीद भगतसिंग नगर, पारनेर रोड, अंबड, जि. जालना ४३१२०४ (भ्रमणध्वनी: ९४२३९९३१३७)

**- डॉ. मारोती तेगमपुरे**

कार्यवाह खजिनदार, मराठी अर्थशास्त्र परिषद,

पुस्तक
परिचय

# Contemporary Relevance of Thoughts and Policies of Chhatrapati Shahu Maharaj

**एस.एस. कळमकर** †

पुस्तकाचे नाव : Contemporary Relevance of Thoughts and Policies of Chhatrapati Shahu Maharaj
संपादक : पी. एस. कांबळे आणि एस. टी. कोंबडे
प्रकाशक : एबीएस पब्लिकेशन, वाराणसी
प्रकाशन वर्ष : २०१८
पृ.१९९, किंमत रु.६५०/-
ISBN : 978-93-86077-70-7

उभय संपादकांचे उपरोक्त पुनरावलोकनाधीन पुस्तक हे शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर (महाराष्ट्र) येथील अर्थशास्त्र विभागामध्ये फेब्रुवारी २०१८ मध्ये आयोजित 'छत्रपती शाहू महाराजांचे विचार आणि धोरणांची समकालीन प्रासंगिकता' या राष्ट्रीय चर्चासत्रात सादर केलेल्या निवडक शोधनिबंधांचे संकलन आहे. शाहू महाराजांची विविध धोरणे, कार्य, शिक्षण, सिंचन, शेती, उद्योग, आर्थिक व्यवहार, सामाजिक भेदभाव, कला आणि संस्कृती इत्यादी विषयांवरील त्यांचे विचार यावरील निवडक २३ शोधनिबंध त्यात समाविष्ट आहेत. छत्रपती शाहू महाराजांचे कार्य आणि धोरणे वेगळे वेगळे करणे कठीण असले, तरीही पुस्तकाचे पुनरावलोकन सहा शीर्षकाखाली केले आहे.

**सामाजिक न्याय आणि सामाजिक अभियांत्रिकी:**

बागलकोटी, एस. टी. यांनी भारतातील दलितांच्या स्थितीचे आणि सर्वसमावेशक विकासाच्या संकल्पनेचे विश्लेषण केले आणि शाहू महाराजांचे विचार आणि धोरणे ते साध्य करण्यासाठी किती मदत करतात याचे विश्लेषण केले आहे. भारतातील दलित सशक्तीकरण चळवळीत शाहू महाराजांचे कार्य अतुलनीय असल्याचे लेखकाने अधोरेखित केले आहे. लेखकाने नमूद केले आहे की, ते एक सक्षम अर्थशास्त्रज्ञ, योजनाकार, प्रशासक, दयाळू आणि परोपकारी शासक होते, शेवटच्या मैलावर शेवटच्या व्यक्तीच्या कल्याणासाठी वचनबद्ध होते. ककडे, व्ही. बी. यांनी सामाजिक अभियांत्रिकीच्या माध्यमातून आधुनिक अटींच्या सर्वसमावेशक वाढीसाठी शाहू महाराजांची दूरदृष्टी आणि वचनबद्धतेचा आढावा घेतला आहे. भरतीमध्ये मागासवर्गीय आरक्षणासाठीचे धोरण, जातिव्यवस्था संपवण्याचे प्रयत्न, वेदोक्त वाद आणि ब्राह्मणेतर चळवळ, कुलकर्णी वतन रद्द करणे आणि पुरोहितपदाची बदली, नेतृत्व यांसारख्या महत्त्वाच्या पावलांनी त्यांनी उचललेले महत्त्वाचे पाऊल लेखकाने नोंदवले आहे. वाघमारे नलिनी अविनाश

† संचालक आणि प्राध्यापक कृषी-आर्थिक संशोधन केंद्र सरदार पटेल विद्यापीठ, वल्लभ विद्यानगर, आनंद, गुजरात
आजीव सभासद क्र. : १६५८, भ्रमणध्वनी :९८२२४३७४५१ ई-मेल : shrikantkalmkar@yahoo.com

यांनी अस्पृश्यांच्या उत्थानातील शाहू महाराजांच्या योगदानाचे विश्लेषण केले आहे आणि मानवता हे शाहूंच्या विचारात आणि कार्यात आढळणारे मुख्यतत्त्व सर्वांचे कल्याण असल्याचे नमूद केले आहे. लेखकाने नमूद केले आहे की, राष्ट्राच्या अनेक सामाजिक-आर्थिक समस्या सोडवण्यासाठी अस्पृश्यांचे उत्थान आवश्यक आहे. आपल्या भारतीय संविधानात नमूद केलेली समानता, स्वातंत्र्य आणि बंधुता ही तत्त्वे तेव्हाच लागू होतील जेव्हा अस्पृश्यता समाजातून नष्ट होईल. शाहू महाराजांनी जे सांगितले ते आचरणात आणले. शाहू महाराजांनी जात, वर्ग, लिंग, समाजाचा विचार न करता सर्वांना समान संधी दिली. शाहू महाराजांनी अस्पृश्यांना विविध पदांवर नेमले. आरक्षण धोरणानुसार दलितांची विविध पदांवर नियुक्ती होणे आवश्यक आहे, असे लेखकाने सुचवले आहे. मोहिते एस.व्ही., भोसले डी. एम. आणि टी. व्ही.जी.शर्मा यांनी शाहू महाराजांच्या आर्थिक दृष्टीचे विश्लेषण करुन असे नमूद केले आहे की, शाहू महाराजांच्या काळातील सर्व उपक्रम त्यांच्या अनेक सामाजिक कार्यक्रमांच्या आर्थिक फायद्यांबद्दल त्यांचा ठाम समज सिद्ध करतात. हा लेख सिद्ध करतो की, शाहू महाराजांनी आर्थिक उद्दिष्टे पूर्ण करण्यासाठी सर्व धोरणे आखून ती अंमलात आणली. कांबळे पी. एस. आणि ओव्हाळ विशाल विष्णू यांनी शाहू महाराजांच्या सामाजिक न्यायाच्या विचारांचा अभ्यास करुन असे नमूद केले आहे की, राजर्षी छत्रपती शाहू महाराज हे २६ जुलै, १९०२ पासून भारतात आणि त्यांच्या स्वत:च्या कोल्हापूर राज्यातील एका विशिष्ट भागात आरक्षणाच्या अंमलबजावणीचे जनक आहेत. ज्याची मूळ कल्पना महात्मा जोतिराव फुले यांची होती; पण ती प्रत्यक्षात आणण्याचे काम त्यांचे बौद्धिक वारस व अनुयायी म्हणून राजर्षी शाहू महाराज यांनी केले.

**शिक्षण**

शाहू महाराजांच्या शैक्षणिक प्रयत्नांमुळे महाराष्ट्रातील अनेक सामाजिक कार्यकर्त्यांना जनसामान्यांसाठी शैक्षणिक संस्था स्थापन करण्याची प्रेरणा मिळाली. 'जिथे गाव तिथे शाळा' हा अजेंडा जाहीर करणारा तो भारतातील पहिला राजा होता. शाहू महाराज त्यांच्या राज्याच्या एकूण उत्पन्नांपैकी जवळपास एक चतुर्थांश शिक्षणावर खर्च करायचे. जगात असा दूरदर्शी कोणीही शासक आढळत नाही. कांबळे पी. एस. यांनी त्यांच्या लेखात शाहू महाराजांच्या सर्वसमावेशक शैक्षणिक धोरणांचा आढावा घेतला आणि शाहू महाराज हे खऱ्या अर्थाने व्यावहारिक व सर्वसमावेशक शिक्षणतज्ज्ञ होते, असे नमूद केले आहे. लेखकाने नमूद केले आहे की, त्यांचे सर्व विचार, धोरणे आणि शिक्षणासंबंधीची कामे अत्यंत महत्त्वाची असून त्याची शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीमध्ये समावेश करण्याची नितांत गरज आहे. सोनकांबळे सी. पी. आणि सांजुरे डी. पी. यांच्या लेखात शाहू महाराजांचे शिक्षण आणि कार्य यांचा समावेश आहे. त्यांनी शाहू महाराजांनी शिक्षणव्यवस्थेत केलेल्या सुधारणांचे महत्त्व नमूद केले आहे. १८९४ मध्ये शाहू महाराज ज्यावेळी गादीवर आले त्यावेळी बहुतांश लोकसंख्या निरक्षर होती. शिक्षण ही ब्राह्मणांची मक्तेदारी होती. ग्रामीण भागात प्राथमिक शाळाही नव्हत्या, असे लेखकाने नमूद केले आहे. प्रतिकूल परिस्थिती असतानाही शाहू महाराजांनी बहुजनांना, स्त्रियांना प्राथमिक स्तरापासून ते पदव्युत्तर स्तरापर्यंत शिक्षण देण्यास मदत होईल असे धोरण ठरवले आणि स्वीकारले. कुंभार विजय एम. यांनी शाहू महाराज हे शिक्षणाच्या माध्यमातून समाजपरिवर्तनाची महत्त्वाकांक्षा असलेले द्रष्टे होते यावर प्रकाश टाकला. लेखकाने पुढे असे नमूद केले आहे की, त्यांना सामाजिक बदल, मागासांचे सक्षमीकरण, महिलांचे सक्षमीकरण आणि सामाजिक वंचित लोकांमध्ये शिक्षणाचे महत्त्व लक्षात आले होते. मुख्य म्हणजे त्या काळात सर्वांना मोफत आणि सक्तीच्या

शिक्षणाची संकल्पना त्यांनी जाणली आणि स्वीकारली. पाटील संदीप वसंत यांच्या लेखात मागासवर्गीयांच्या शिक्षणाकडे विशेष लक्ष असलेल्या शाहू महाराजांच्या 'शिक्षण हे सर्वांसाठी' या धोरणाची चर्चा आहे. लेखकाने नमूद केले आहे की, शाहू महाराजांनी राज्याच्या विविध भागांत ग्रंथालये स्थापन करण्याचे धोरण अवलंबले आणि पुढील विकासासाठी अनुदान दिले. त्यांनी केवळ संघटना आणि संघटनांना शाळा उघडण्यासाठी प्रोत्साहन दिले नाही तर विविध जाती आणि समाजातील विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहे उघडण्यासही सांगितले. शाहू महाराजांच्या कार्याचे विश्लेषण करताना, बराले संतोष यांनी असे नमूद केले आहे की, ते एक शैक्षणिक सुधारक होते ज्यांनी गरीब लोकांसाठी विशेषतः मागासलेल्या आणि दलित लोकांसाठी शिक्षणाची सुविधा दिली. कुंभार सोनाली बाजीराव यांनीही शाहू महाराज हे त्यांच्या काळातील महान सुधारक असल्याने त्यांचे शैक्षणिक विचार व कार्य अमूल्य असल्याचे आपल्या लेखात नमूद केले. चव्हाण सुरजित बाबुराव यांनी नमूद केले आहे की, शाहू महाराजांनी शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी अनेक शैक्षणिक कार्यक्रम सुरू केले. तसेच विविध जाती आणि धर्मांसाठी स्वतंत्र वसतिगृहे स्थापन केली. याशिवाय त्यांनी गरजू आणि हुशार विद्यार्थ्यांना मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देऊ केली. सोनकांबळे सी.पी. आणि मुतनाळे विजयकुमार सी. यांनी आपल्या लेखात असे नमूद केले आहे की, शाहू महाराज शेवटच्या श्वासापर्यंत शैक्षणिक कार्यात पूर्णपणे गुंतले होते. पुढे शिक्षण, सामाजिक समता आणि जनसामान्यांच्या संगोपनाची कारणे मनावर घेतलेल्या सर्व सांसारिक सुखांना विसरून जाणाऱ्या राजसत्तेचे ते एकटे उत्तम उदाहरण आहेत.

**कृषी, उद्योग आणि वाणिज्य क्षेत्रः**

देशमुख एम. एस. आणि घागरे टी. एन. यांनी शाहू महाराजांच्या कृषी लागवड पद्धती, सिंचन धोरण, कृषी शिक्षण धोरण आणि कृषी विपणन आणि पत व्यवस्थेबद्दलच्या योगदानाचा आपल्या लेखात आढावा घेतला आहे जो सध्याच्या काळात अधिक प्रासंगिक आहे. लेखकांनी नमूद केले आहे की, शाहू महाराज हे २० व्या शतकातील भारतातील सर्वात लोकप्रिय कृषिशास्त्रज्ञ होते आणि त्यांचे कृषी आणि संलग्न क्षेत्रातील कार्य उल्लेखनीय आहे. त्यांनी अनेक प्रकल्प सादर केले ज्यामुळे त्यांच्या विषयांना त्यांच्या निवडलेल्या व्यवसायात स्वावलंबी राहाण्यास सक्षम केले. शाहू महाराजांनी शेतकऱ्यांसाठी सहकारी संस्थांची स्थापना केली, शेतकऱ्यांना कर्ज उपलब्धतेची हमी दिली, शेतकऱ्यांना पीक उत्पादन आणि संबंधित तंत्रज्ञान शिकवण्यासाठी किंग एडवर्ड कृषी संस्थेची स्थापना केली. महाजन श्रीकृष्ण यांनी शाहू महाराजांच्या कृषी, उद्योग आणि व्यापारातील योगदानावर आपल्या लेखाद्वारे प्रकाश टाकला आहे. लेखकाने असे नमूद केले आहे की, शाहू महाराजांनी कोल्हापुरात आणि इतर ठिकाणी मेळावे आयोजित करून, बाजारपेठेची स्थापना करून स्थानिक उद्योग आणि शेतीला प्रोत्साहन दिले. लोकसंख्येचे दारिद्र्य दूर करण्यासाठी, वर्गीकृत अर्थशास्त्रज्ञांच्या विद्यमान लेसेझ-फेअर धोरणाविरुद्ध त्यांनी काही व्यावहारिक आर्थिक उपाययोजना सुरू केल्या. सुधारित शेती, औद्योगिकीकरण आणि रोजगाराभिमुख सार्वजनिक प्रकल्प हे त्यांच्या आर्थिक धोरणाचा आधार होते. शिंदे महेश व्ही. यांनी राधानगरी पाटबंधारे प्रकल्पाच्या उभारणीतून राधानगरी तालुक्याच्या सामाजिक-आर्थिक विकासावर प्रकाश टाकला ज्यामुळे जीवनाची सुरक्षा तर झाली आहेच; शिवाय उत्पन्न आणि जमिनीचे मूल्य तसेच त्यातून मिळणारा महसूलही वाढला आहे. यामुळे दुष्काळ निवारणाचा खर्च कमी झाला आहे आणि संपूर्ण प्रदेश सुसंस्कृत होण्यास मदत झाली आहे. धरण बांधल्यानंतर कृषी वैविध्य, उत्पन्न आणि खर्चाच्या बाबतीतही राधानगरी पाटबंधारे

विभागाचे संपूर्ण चित्र बदलले आहे. किंबहुना, यामुळे शेतीमध्ये तांत्रिक बदल घडवून आणण्यास मदत झाली ज्यामुळे शेतकरी आणि प्रदेशाची आर्थिक समृद्धी वाढली. कांबळे बी.एस. यांनी आपल्या लेखात असे नमूद केले आहे की, शाहू महाराजांवर दोन महान स्वातंत्र्यसैनिकांचा प्रभाव होता. महात्मा जोतिबा फुले आणि आगरकर आणि त्यांनी भारताच्या इतिहासात एक विशिष्ट छाप सोडली आहे. त्यांचे विचार आणि केलेले कार्य आजच्या काळातील विकासाशी खूप सुसंगत आहेत. जसे की, औद्योगिक विकासासाठी मदत आणि लोकांचा सहभाग, संरक्षण आणि निष्ठा धोरण, संतुलित औद्योगिक वाढ, मानवी घटक आणि कौशल्याचा विकास, सहकारी संस्था आणि इतर आधारभूत पायाभूत सुविधा. वाकरेकर रामचंद्र केशव यांनीही शाहू महाराजांच्या कृषी धोरणाचा अभ्यास करून शाहू महाराजांनी शेती, उद्योग, सामाजिक न्याय, जातिनिर्मूलन, सहकार, शिक्षण, व्यापार, कला या क्षेत्रात उत्कृष्ट व क्रांतिकारी कार्य केल्याचे आपल्या लेखात नमूद केले आहे. दांडगे र.गो., बनसोडे न.प. यांनीही शाहू महाराजांचे कृषी, व्यापार व उद्योग यांचे विचार व धोरणे तपासून पाहिली व कोल्हापूरच्या विकासासाठी शाहू महाराजांचे कृषी, उद्योग व व्यापार यासंबंधीचे विचार उपयुक्त व महत्त्वाचे असल्याचा निष्कर्ष काढला आहे. शेतकऱ्यांना कर्जाची तरतूद, बंधारे आणि विहिरी बांधणे, आधुनिक कृषी तंत्रज्ञान, जमिनीचे उपविभाग कमी करणे आणि मोठ्या शेतीला प्रोत्साहन देणे यांसारखी त्यांची शेतीविषयक धोरणे आजही शेतीच्या विद्यमान स्थितीशी संबंधित आहेत. शेतकऱ्यांना कृषी शिक्षण देण्यासाठी कृषी प्रदर्शन, संस्था उभारणे आणि प्रशिक्षणाची व्यवस्थाही शाहू महाराजांनी केली. शिवाय म्युझियम सुरू करून शेतकऱ्यांना कर्जाची सुविधा उपलब्ध करून दिली. औद्योगिक क्षेत्राच्या विकासासाठी त्यांनी छोट्या-मोठ्या उद्योगांना मदत केली आणि उद्योगांच्या विमुक्तीकरणावर भर दिला. त्यांनी सर्व प्रकारचे उद्योग उभारले आणि त्याद्वारे मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्माण केला. त्यांनी राज्यात उद्योग सुरू करण्यासाठी लोकांना मदत केली आणि प्रेरणा दिली. उद्योगांवर मजुरांचे नियंत्रण असावे, असे शाहू महाराजांचे मत होते.

**सहकार चळवळ :**

कट्टी व्ही.पी. यांनी कोल्हापूर जिल्ह्यातील सहकार चळवळीच्या विकासात शाहू महाराजांच्या भूमिकेचे विश्लेषण केले आहे. शाहू महाराजांनी फी आणि मुद्रांक शुल्कात सूट देऊन सहकारी संस्थांच्या स्थापनेला पाठिंबा दिला होता. सहकाराच्या फायद्यांची लोकांना जाणीव करून देण्यासाठी त्यांनी जाहीर सभेला संबोधित केले. शाहू महाराजांमुळे कोल्हापूर हे सहकार चळवळीचे अग्रगण्य बनले आहे आणि त्यामुळेच ते कोल्हापूर जिल्ह्यातील सहकार चळवळीचे जनक बनले आहेत. बँकांचे खेळते भांडवल, ठेवी, कर्जे आणि ॲडव्हान्स आणि निव्वळ नफा यासंबंधीची वाढ शोधण्याचा प्रयत्न या लेखात केला गेला आहे.

**कोल्हापूरचे वास्तुविशारदः**

माने दादासाहेब बी. यांनी आधुनिक कोल्हापूरच्या विकासात शाहू महाराजांच्या योगदानाचा अभ्यास केला आहे. लेखकाने असे नमूद केले आहे की, कोल्हापूर हे एक प्रभावी ऐतिहासिक पार्श्वभूमी असलेले एक छोटेसे शहर आहे, जे कोकण किनारपट्टीच्या आणि दखखनच्या मैदानी प्रदेशाच्या भेटीच्या ठिकाणी वसलेले आहे. याला 'कलापूर' म्हणजेच 'कलेचे शहर' असेही म्हणतात. १९ व्या शतकाच्या शेवटी, परमपूज्य छत्रपती शाहू महाराज कोल्हापूरचे राज्यकर्ते झाले. ते एक महान द्रष्टे सुधारणावादी होते आणि आधुनिक कोल्हापूरचे शिल्पकार होते. एकीकडे, सुदृढ अर्थव्यवस्थेसाठी, त्यांनी शेतीला मदत करण्याचा निर्णय घेतला आणि हे उद्दिष्ट साध्य केले; त्यांनी 'राधानगरी धरण' बांधले आणि कोल्हापूरचे प्रसिद्ध 'गूळ मार्केट' स्थापन केले. त्यांनी समाजातील सर्व वर्गांसाठी शिक्षणाचा प्रसार केला आणि दुर्बल घटकांच्या विकासासाठी ते उत्सुक होते. प्रसिद्ध

श्री महालक्ष्मी मंदिरामुळे पवित्र स्थळ म्हणून ओळखले जाणारे कोल्हापूर शाहू महाराजांमुळे देशाचे प्रगतीशील राज्य म्हणून ओळखले जाऊ लागले. म्होपरे आर.एस. आणि वाईंगडे आर.ए. यांनी शाहू महाराजांच्या कारकिर्दीत कोल्हापूर राज्यातील सेवाक्षेत्रातील उत्पन्न आणि खर्चाचे विश्लेषण केले आहे. त्यांना असे आढळून आले की, राजर्षी राज्याच्या खर्चाबाबत अत्यंत दक्ष होते आणि त्याकाळात राजर्षींना आर्थिक विकासासाठी ब्रिटिश सरकारकडून कोणतीही मदत केली जात नव्हती. राज्याच्या सेवाक्षेत्रावरील खर्च या क्षेत्रातून मिळणाऱ्या उत्पन्नापेक्षा जास्त होता, जे मुख्यत्वे सेवाक्षेत्रातील विकासात्मक कामांमुळे होते.

**कला, क्रीडा आणि संस्कृतीक**

देशमुख प्रशांत यांनी विकासातील शाहू महाराजांच्या योगदानाचा अभ्यास करुन असे नमूद केले आहे की, शाहू महाराज एक महान समाजसुधारक व्यक्तिमत्त्व होते. क्रीडा, संगीत, नाटक आणि संस्कृतीचे संरक्षक होते. कुस्ती, घोडेसवारी करणे, साठमारी (हत्तीशी लढणे) अशा पारंपरिक खेळांचे त्यांनी आपल्या राज्यात संरक्षण केले. तरुणांना क्रीडा आणि संस्कृतीकडे आकर्षित करण्यासाठी सरकारने विविध धोरणे आखली पाहिजेत, असे लेखकाचे म्हणणे आहे.

थोडक्यात, लोकांच्या सामाजिक आणि आर्थिक जीवनात उल्लेखनीय बदल घडवून आणणाऱ्या महान द्रष्ट्या आणि क्रांतिकारी राजाचे विचार आणि कार्य सादर करत असल्याने हे पुस्तक वाचनासाठी खूप छान वाटले. पुस्तकाच्या अधिक समृद्धीमध्ये संपादन आणि लेख प्रवाहावर आणखी काम करता आले असते. तथापि, आपल्या देशाच्या अशा क्रांतिकारक नेत्यावर निवडक शोधनिबंधांसह पुस्तक आणल्याबद्दल संपादकांनी केलेले प्रयत्न कौतुकास पात्र आहेत. हे पुस्तक विद्यार्थी, संशोधक आणि धोरणकर्ते यांच्यासाठी वाचण्यासारखे आहे आणि विद्यापीठ आणि संशोधन संस्था ग्रंथालयांसाठी एक खजिना म्हणून काम करू शकते.

◆


**मराठी अर्थशास्त्र परिषद**

## मातोश्री बयाबाई श्रीपतराव कदम महिला ग्रंथ पारितोषिक

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या वतीने महिला लेखिकेने लिहिलेल्या सर्वोत्कृष्ट अर्थशास्त्रीय संदर्भग्रंथास ₹११०००/-, प्रमाणपत्र व मानचिन्ह देण्यात येते. १ जानेवारी, २०२१ ते ३१ डिसेंबर २०२१ या कालावधीत प्रसिद्ध झालेल्या मराठीतील अर्थशास्त्रीय संदर्भग्रंथांच्या महिला लेखिकेस (मराठी अर्थशास्त्र परिषदेचे आजीव सभासद असणे आवश्यक) स्पर्धेत सहभागी होता येईल. नमुन्यातील अर्ज, संबंधित ग्रंथाच्या चार प्रती कार्यवाहांकडे १५ सप्टेंबर २०२२पर्यंत पोहचतील या बेताने पाठवावे. दिनांक ५, ६ व ७ नोव्हेंबर २०२२ रोजी जे.ई.एस. महाविद्यालय, जालना, येथे संपन्न होत असलेल्या मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या ४५ व्या राष्ट्रीय अधिवेशनात हे पुरस्कार प्रदान केले जातील.

**पत्रव्यवहारासाठीचा पत्ता**

कार्यवाह खजिनदार, मराठी अर्थशास्त्र परिषद, डॉ. मारोती तेगमपुरे, 'संगाई', घर क्रमांक २२, भालचंद्र पेट्रोल पंपाच्यामागे, शहीद भगतसिंग नगर, पारनेर रोड, अंबड, जि. जालना ४३१२०४ (भ्रमणध्वनी: ९४२३९९३१३७)

**- डॉ. मारोती तेगमपुरे**

कार्यवाह खजिनदार, मराठी अर्थशास्त्र परिषद,

# मराठी अर्थशास्त्र परिषद
# ४४ वे राष्ट्रीय वार्षिक अधिवेशन : २०२१-२२ कार्यवाहांचा अहवाल

**मारोती वि. तेगमपुरे**

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे ४४ वे राष्ट्रीय वार्षिक अधिवेशन शुक्रवार, दि.११ मार्च ते रविवार दि.१३ मार्च, २०२२ या तीन दिवसांच्या कालावधीत गो.सी. टोम्पे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, चांदूर बाजार, जि. अमरावती येथे अतिशय उत्साहाच्या वातावरणात यशस्वीरित्या संपन्न झाले. प्राचार्य. डॉ. अनिल सूर्यवंशी, बार्शी, जि. सोलापूर हे अधिवेशनाच्या अध्यक्षस्थानी होते.

**अधिवेशन उद्‌घाटन सोहळा :**

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या ४४ व्या राष्ट्रीय वार्षिक अधिवेशनाचे उद्‌घाटन शुक्रवार, दिनांक ११ मार्च, २०२२ रोजी गो.सी. टोम्पे महाविद्यालय सार्वजनिक ट्रस्टद्वारा संचालित गो.सी. टोम्पे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय चांदूर बाजार, जि. अमरावती येथे महामानवांचे प्रतिमा पूजन व दीपप्रज्वलनाचे झाले. उद्‌घाटक म्हणून कुलगुरू (रायसोनी विद्यापीठ, अमरावती) डॉ. विनायक देशपांडे उपस्थित होते. विद्यापीठ अनुदान आयोगाचे माजी अध्यक्ष डॉ. सुखदेव थोरात यांची यावेळी विशेष उपस्थिती होती. संस्थेचे सचिव मा. भास्कर टोम्पे, ४४ व्या अधिवेशनाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. अनिल सूर्यवंशी, कार्याध्यक्ष प्राचार्य डॉ. के. के. पाटील, कार्यवाह-खजिनदार मारोती तेगमपुरे, अर्थसंवादचे संपादक डॉ. राहुल शं. म्होपरे स्थानिक कार्याध्यक्ष प्राचार्य डॉ. राजेंद्र रामटेके, स्थानिक कार्यवाह डॉ. संजय कोठारी, डॉ. संतोष कुटे, डॉ. मुक्ता जहागीरदार, डॉ. आर.वाय. माहोरे, डॉ. नंदकुमार गव्हाळे, डॉ. विजय टोम्पे उपस्थित होते. उद्‌घाटन समारंभानिमित्त स्वागतपर मनोगत प्राचार्य डॉ. राजेंद्र रामटेके यांनी व्यक्त केले. स्थानिक कार्यवाह डॉ. संजय कोठारी यांनी अधिवेशन आयोजनामागील भूमिका व महाविद्यालयातील अर्थशास्त्र विभागासंदर्भात माहिती आपल्या प्रास्ताविकातून दिली. उपस्थित मान्यवरांचे स्मृतिचिन्ह, शाल व पुष्पगुच्छाने स्वागत करण्यात आले. यावेळी अधिवेशनानिमित्त ‘अर्थसुमती’ या स्मरणिकेचे विमोचन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी डॉ. सुखदेव थोरात यांच्या ‘वंचितांचे वर्तमान’, डॉ. मारोती तेगमपुरे व राजक्रांती वलसे यांच्या ‘नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात आम्ही भारताचे लोक कुठे?’, डॉ. गौतम कांबळे, डॉ. श्रीनिवास खांदेवाल व डॉ. जी. एस. ख्वाजा यांच्या ‘पॉलिटिक्स ऑफ रिजनल डेव्हलपमेंट’, डॉ. सुभाष गुर्जर यांच्या ‘बँकिंग संकल्पना आणि कार्यप्रणाली’, डॉ. मुकुंद दातीर व डॉ. सुभाष गुर्जर या लेखकद्वयांचे ‘महाराष्ट्राची अर्थव्यवस्था’ या ग्रंथाचे प्रकाशनही मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

कार्यवाह-खजिनदार डॉ. मारोती तेगमपुरे यांनी परिषदेचा गौरवशाली इतिहास, परिषदेची उद्दिष्ट्ये,

विस्तार आणि ध्येय यावर संक्षिप्तपणे आढावा घेत असताना परिषदेच्या विविध उपक्रमांची आणि कार्याची माहिती दिली. यावेळी परिषदेच्या वतीने कार्याध्यक्ष प्राचार्य डॉ. के.के. पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. परिषदेच्या माजी अध्यक्षा प्रा. डॉ. मुक्ता जहागीरदार यांनीही यावेळी आपले विचार ठेवले. परिषदेच्या ४४ व्या वार्षिक अधिवेशनाचे उद्घाटक डॉ. विनायक देशपांडे यांनी आपल्या उद्घाटनपर भाषणात म्हणाले की, परिषदेचे आजपर्यंतचे सर्व अध्यक्ष, कार्याध्यक्ष, कार्यवाह-खजिनदार, संपादक, विश्वस्त, कार्यकारिणीचे आजपर्यंतचे सर्व पदाधिकारी व सर्व आजीव सभासदांच्या परिश्रमाची प्रचिती म्हणजे मराठी अर्थशास्त्र परिषदेला महाराष्ट्राच्याच नव्हे; तर देशाच्या अर्थशास्त्राच्या योगदानात महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. परिषदेच्या ४४ व्या वार्षिक अधिवेशनाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. अनिल सूर्यवंशी यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात कोरोनाच्या पार्श्वभूमीवर भारतातील आरोग्य खर्च आणि आरोग्य सुविधांचा विस्ताराने आढावा घेतला. कोरोनाच्या भारतात आलेल्या तिन्ही लाटेंवर त्यांनी आकडेवारीच्या साहाय्याने तुलनात्मक विश्लेषण केले. कोरोनामुळे समाजातील विविध घटकांचे मोठे नुकसान झाले असून, यामुळे मानवाच्या मानसिकतेवरही या महामारीचा गंभीर विपरित परिणाम झाल्याचे त्यांनी आपल्या मांडणीतून स्पष्ट केले. उद्घाटनाच्या सोहळ्याचे अध्यक्ष संस्थेचे सचिव भास्कर टोम्पे यांनी अध्यक्षीय समारोप करताना महाराष्ट्रातील सर्व नामवंत अर्थतज्ज्ञ आमच्या महाविद्यालयात आल्याबद्दल समाधान व्यक्त करून सर्वांचा पाहुणचार करण्याची संधी दिल्याबद्दल आभार व्यक्त केले.

**चर्चासत्रे :**

सदर अधिवेशन कालावधीत दरवर्षीप्रमाणे एकूण चार चर्चासत्र संपन्न झाली. शुक्रवार, दिनांक ११ मार्च, २०२२ रोजी भोजनावकाशानंतर दुपारी 'नोबेल पारितोषिक प्राप्त अभिजीत बॅनर्जी यांचे योगदान' या विषयावरील पहिल्या चर्चासत्राचे सूत्रसंचालक डॉ. जीवन सोळुंके, वृत्तसंकलक डॉ. लक्ष्मण म्हस्के आणि सत्राध्यक्ष म्हणून प्रा.डॉ. अनिल वावरे यांनी कामकाज पार पाडले. या सत्रात डॉ. समित माहोरे, डॉ. वैशाली देशमुख / नाईक डॉ. एस.एल. मेढे, डॉ. प्रशांत हरमकर, डॉ. माधव शिंदे, डॉ. अनिलकुमार वावरे, डॉ. कुमुदिनी जोगी, डॉ. जीवन सोळुंके या शोधनिबंधकांनी आपले शोधनिबंध वाचले. यावर खुली चर्चा होऊन डॉ. अनिलकुमार वावरे यांच्या अध्यक्षीय भाषणाने हे सत्र संपले. शनिवार, दिनांक १२ मार्च, २०२२ रोजी दुसरे सत्र 'भारतातील वर्तमान दशकातील आर्थिक स्थित्यंतरे' या विषयावरील सत्राचे सूत्रसंचालन डॉ. वनिता चोरे, वृत्तसंकलक डॉ. सुरेश घुमटकर आणि सत्राध्यक्ष म्हणून प्रा. डॉ. विकास सुकाळे यांनी जबाबदारी पार पाडली. या चर्चासत्रात एकूण सात शोधनिबंधकांनी आपले शोधनिबंध वाचले. यामध्ये डॉ. दिलीप महाजन, डॉ. विनोद नन्नवरे, प्रा. संतोष दळवी, डॉ. राजश्री रायभोग, डॉ. जे.एस. इंगळे, डॉ. सुनिल गोरडे, डॉ. अविनाश निकम, डॉ. वनिता चोरे यांनी शोधनिबंध सादर केले, तर खुल्या चर्चेमध्ये प्रा. डॉ. श्रीनिवास खांदेवाले, डॉ. दि.व्यं. जहागीरदार यांनी महत्त्वपूर्ण सहभाग घेतला. प्रा. डॉ. विकास सुकाळे यांनी सत्राचा अध्यक्षीय समारोप केला. त्याचदिवशी तिसरे सत्र 'अण्णा भाऊ साठे यांचे आर्थिक विचार' या विषयावरील सत्राचे सूत्रसंचालक डॉ. सुमित माहोरे, वृत्तसंकलक डॉ. आबासाहेब कल्याणकर आणि सत्राध्यक्ष म्हणून प्रा.डॉ. दिलीप अर्जुने यांनी कामकाज यशस्वीपणे पार पाडले. या सत्रात डॉ. सचिन कुंभार आणि डॉ. सुरेश घुमटकर यांनी शोधनिबंध वाचले. अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्याचे अभ्यासक डॉ. प्रमोद गारोडे यांनी या सत्रात अण्णाभाऊंच्याच साहित्यातील विविध पैलूंवर प्रकाश टाकला. खुल्या

चर्चेत डॉ.आर.वाय. माहोरे, डॉ. जयवंत इंगळे, डॉ. दि.व्यं. जहागीरदार यांनी सहभाग घेतला. या सत्राचे अध्यक्ष प्रा.डॉ. दिलीप अर्जुन यांच्या अध्यक्षीय भाषणाने सत्राचा समारोप झाला. अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशी सायंकाळी ०५:३० वाजता ऐनवेळच्या विषयावरील चौथे सत्र 'तीन कृषी कायदे, कृषी किंमती : सैद्धांतिक विश्लेषण' यावर संपन्न झाले. या सत्रात प्रा.डॉ. श्रीनिवास खांदेवाल यांनी उपरोक्त विषयावर विस्ताराने मांडणी केली. या विषयावरील चर्चेत डॉ. दि.व्यं. जहागीरदार, डॉ. आर.वाय. माहोरे, डॉ. विकास सुकाळे यांनी सहभाग घेतला. डॉ. मारोती तेगमपुरे यांनी सर्वांचे आभार मानले.

या चारही सत्रामध्ये परिषदेचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. अनिल सूर्यवंशी, कार्याध्यक्ष प्राचार्य डॉ.के.के. पाटील, कार्यवाह-खजिनदार डॉ. मारोती तेगमपुरे, संपादक डॉ. राहुल शं. म्होपरे उपस्थित होते.

**डॉ. आनंद नाडकर्णी यांच्या स्मृतिप्रित्यर्थ विशेष व्याख्यान :**

दरवर्षी अधिवेशन काळात एका माजी अध्यक्षांच्या गौरवार्थ विशेष व्याख्यानाचे आयोजन आपण करीत असतो. यावेळी परिषदेचे माजी अध्यक्ष डॉ. आनंद नाडकर्णी यांच्या स्मृतिप्रित्यर्थ विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. दि. ११ मार्च, २०२२ रोजी, दुपारी ०२:३० वाजता हे विशेष व्याख्यान संपन्न झाले. डॉ. सुखदेव थोरात यांनी महाराष्ट्रातील उच्च शिक्षणातील वर्तमानकालीन समस्याः नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० या विषयावर विस्ताराने मांडणी केली. डॉ. आनंद नाडकर्णी यांच्या कार्याचा परिचय कार्यवाह-खजिनदार डॉ. मारोती तेगमपुरे यांनी करून दिला. या विशेष व्याख्यानाचे अध्यक्षस्थान प्राचार्य डॉ. अनिल सूर्यवंशी (अध्यक्ष ४४ वे अविधेशन) यांनी भूषविले. डॉ. थोरात यांनी आपल्या मांडणीत डॉ. आनंद नाडकर्णी यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकून आपल्या मुख्य विषयाच्या मांडणीस सुरुवात केली. यामध्ये शिक्षण संस्थाचे प्रकार व संस्था, शिक्षण क्षेत्रातील उपलब्धता आणि विषमता, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील गळतीची स्थिती, शिक्षणक्षेत्रातील विषमतेची कारणे, खाजगी शिक्षण संस्थातील भरमसाठ शुल्क, उच्च शिक्षणाची गुणवत्ता याविषयीचे तपशीलवार विश्लेषण करून नवीन शैक्षणिक धोरण हा अन्याय अधिक गडद करणारे ठरणार असल्याची मांडणी त्यांनी केली. प्राचार्य डॉ. अनिल सूर्यवंशी यांनी अध्यक्षीय समारोप करताना डॉ. आनंद नाडकर्णी यांच्या अनेक आठवणींना उजाळा दिला. परिषदेचे कार्याध्यक्ष प्राचार्य डॉ.के.के. पाटील यांनी सर्वांचे आभार मानले.

**प्रा.नी.वि. सोवनी स्मृती व्याख्यान :**

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे संस्थापक अध्यक्ष प्रा.नी.वि. सोवनी स्मृती व्याख्यान या नावीन्यपूर्ण उपक्रमामध्ये अकरावे पुष्प महाराष्ट्राच्या नियोजन मंडळाचे माजी सदस्य तथा मराठी अर्थशास्त्र परिषदेचे माजी अध्यक्ष, कार्याध्यक्ष व विश्वस्त प्रा. डॉ. ज.फा. पाटील यांनी गुंफले. 'वर्तमान संशोधन काही नवे आयाम' हा त्यांच्या व्याख्यानाचा विषय होता. सदर व्याख्यानाचे अध्यक्ष ४४ व्या वार्षिक अधिवेशनाचे अध्यक्ष प्राचार्य. डॉ. अनिल सूर्यवंशी होते. यावेळी कार्यवाह-खजिनदार डॉ. मारोती तेगमपुरे यांनी प्रा.नी.वि. सोवनी स्मृती व्याख्यानाचा उद्देश आणि त्यांचे परिषदेतील योगदान याविषयीची माहिती आपल्या प्रास्ताविकात दिली. कार्याध्यक्ष प्राचार्य डॉ. के.के. पाटील यांनी प्रमुख मार्गदर्शक प्रा.डॉ.ज.फा. पाटील यांचा आपल्या ओघवत्या शैलीत परिचय करून दिला. यावेळी स्थानिक कार्याध्यक्ष प्राचार्य डॉ. राजेंद्र रामटेके, स्थानिक कार्यवाह डॉ. संजय कोठारी यांची मंचावर उपस्थिती होती.

**समारोप सोहळा :**

दि.१३ मार्च, २०२२ रोजी सकाळी ०९:१५ वाजता समारोप सोहळ्यास सुरुवात झाली. समारोपाच्या कार्यक्रमाचे अध्यक्ष परिषदेच्या ४४ व्या अधिवेशनाचे

अध्यक्ष प्राचार्य डॉ. अनिल सूर्यवंशी हे होते. प्रमुख अतिथी म्हणून गोंडवाना विद्यापीठ गडचिरोलीचे प्र. कुलगुरू डॉ. श्रीराम कावळे, संस्थेचे सचिव भास्करदादा टोम्पे, प्रमुख अतिथीमध्ये डॉ. श्रीनिवास खांदेवाले, डॉ. दि.व्यं., जहागीरदार, डॉ. विजय टोम्पे, कार्याध्यक्ष प्राचार्य डॉ. के.के. पाटील, कार्यवाह-खजिनदार डॉ. मारोती तेगमपुरे, अर्थसंवाद-संपादक डॉ. राहूल शं. म्होपरे, डॉ. नंदकिशोर गव्हाळे, प्राचार्य डॉ. राजेंद्र रामटेके, डॉ. संजय कोठारी, विश्वस्त डॉ. अजय दरेकर, कार्यकारिणी सदस्य डॉ. बळवंत कोरे, डॉ. विजय भोपाळे, डॉ. माधव शिंदे, डॉ. दयालू राठोड, प्रा. शिवाजी काकडे, डॉ. मनिषकुमार कायरकर, डॉ. गोरक्षनाथ सानप, डॉ. जयवंत इंगळे आदि उपस्थित होते. उद्घाटकीय सत्रापासून समारोपीय सोहळ्यापर्यंत परिषदेचे माजी अध्यक्ष डॉ. श्रीनिवास खांदेवाले, डॉ. ज.फा. पाटील, डॉ. दि.व्यं. जहागीरदार, डॉ. मुक्ता जहागीरदार, डॉ. श्रीराम जोशी, डॉ. रामचंद्र रसाळ, प्रा. चारूदत्त गोखले, डॉ. रामदास माहोरे यांनी अधिवेशनात सक्रिय सहभाग घेतला. सर्व आजीव सभासदांनी हा आदर्श नक्कीच घेतला पाहिजे.

**परिषदेच्यावतीने विविध पारितोषिकांचे वितरण :**

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्यावतीने दिल्या जाणाऱ्या विविध पारितोषिकांचे वितरण समारोपाच्या सोहळ्यातील प्रमुख पाहुणे व मान्यवर पदाधिकाऱ्यांचे हस्ते करण्यात आले.

१. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ उत्कृष्ट ग्रंथ पारितोषिक (रु.१०००/- व सन्मानपत्र), डॉ. ज.फा. पाटील यांच्या 'अर्थसंभ्रम' या ग्रंथास देण्यात आला.

२. प्रा.मो.स. भावे पारितोषिक (रु.५००/- व सन्मानपत्र) अर्थसंवादमधील सर्वोत्कृष्ट लेखाबद्दल डॉ. अमृता सूर्यवंशी यांच्या 'भारतीय अर्थव्यवस्था-मंदीच्या उंबरठ्यावर?' (जाने.-मार्च २०२०, खंड ४३, अंक ४, पृ.क्र.३३२) आणि डॉ. सुभाष कोंबडे यांच्या 'महाराष्ट्रातील प्राथमिक शिक्षणावरील सार्वजनिक खर्च व शालेय शिक्षण प्रगती विश्लेषण', (जाने.-मार्च, २०२१, खंड ४४, अंक ४, पृ.क्र. ३४५) या लेखकांना विभागून देण्यात आला.

३. मातोश्री बयाबाई श्रीपतराव कदम महिला ग्रंथ पारितोषिक (रु.११,०००/- व सन्मानपत्र) डॉ. कुमुदिनी जोगी, अचलपूर यांच्या 'ग्रामीण विकासाची वाटचाल' या ग्रंथास देण्यात आला.

४. प्रा.सौ. अरूणा राराविकर, वृत्तपत्रातील आर्थिक विषयक लेखाला प्रथम पारितोषिक (रु.१०००/-व सन्मानपत्र डॉ. विकास सुकाळे, नांदेड यांच्या 'मराठवाड्यातील दुष्काळ व प्राणी प्रश्न' तर द्वितीय पारितोषिक रु.५००/- व सन्मानपत्र) प्रा. कमलाकर हणवंते-यवतमाळ यांच्या 'स्वातंत्र्यात शेतकरी उपेक्षितच' या लेखाला देण्यात आला.

५. स्व. प्रा. भास्कर ढाले स्मृती पारितोषिक संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती पदव्युत्तर अर्थशास्त्र विषयात विद्यापीठात प्रथम आलेली कु. भाग्यश्री संपतराव खेरडे-वरूड, जि. अमरावती यांना (रु.२०००/- व सन्मानपत्र) देण्यात आले.

**अविधेशन काळात सादरीकरण झालेल्या सर्वोत्कृष्ट शोधनिबंधास पारितोषके :**

१. कै. ग.प्र. पिंपरकर पारितोषिक (रु.१०००/-) अधिवेशन काळात सादर केलेल्या सर्वोत्कृष्ट शोधनिबंधास दिले जाते. डॉ. सुनिल गोरडे-कन्नड, जि. औरंगाबाद यांच्या 'शेती व्यवसायातील आर्थिक स्थित्यंतराचा आढावा' या विषयावरील शोधनिबंधास देण्यात आले.

२. प्रा. कांतीभाई ठक्कर ऋणमुक्ती प्रतिष्ठानचे डॉ. अमर्त्य सेन पारितोषिक (रु.५००/-) सर्वोत्कृष्ट

शोधनिबंधास दिले जाणारे पारितोषिक डॉ. सुरेश घुमटकर-बीड यांच्या 'आर्थिक विषमतेच्या परिणामांविषयी अण्णा भाऊ साठे यांचे विचार' या विषयावरील शोधनिबंधास देण्यात आले.

३. डॉ. ज.फा. पाटील पारितोषिक (रु.२०००/-) अधिवेशन काळात सादर केलेल्या सर्वोत्कृष्ट शोधनिबंधास (विद्यार्थ्यांकरिता) सचिन कुंभार-जळगांव यांच्या 'अण्णा भाऊ साठे यांचे आर्थिक विचार' या विषयावरील शोधनिबंधास देण्यात आला.

४. पद्मजा गंधे पारितोषिक (रु. १०००/-) अधिवेशन काळात सादर केलेल्या सर्वोत्कृष्ट शोधनिबंधास (महिलांकरिता) डॉ. वैशाली ल. देशमुख / नाईक यांच्या 'अभिजीत बॅनर्जीची दारिद्र्याबाबतची भूमिका व वास्तविकता' या विषयावरील शोधनिबंधास देण्यात आला.

**ऋणनिर्देश :**

१. तज्ज्ञ परीक्षक : डॉ. भरतकुमार सोलापुरे-मंडणगढ, डॉ. जीवन सोळुंके-नाशिक, डॉ. विशाल बेलुरे-नांदेड, डॉ. हिरालाल चव्हाण-जळगाव, डॉ. आर.के. राऊत-घनसावंगी, डॉ. कृष्णा शहाणे-नाशिक यांनी पारितोषिक निवड करीत असताना तज्ज्ञ परीक्षक म्हणून सहकार्य केल्याबद्दल आभार.

२. सूत्रसंचालक व वृत्तसंकलक : डॉ. लक्ष्मण म्हस्के-अमरावती, डॉ. सुरेश घुमटकर-बीड, डॉ. आबासाहेब कल्याणकर-नांदेड (वृत्तसंकलक), डॉ. जीवन सोळुंके-नाशिक, डॉ. वनिता चोरे-चांदूर बाजार, डॉ. समित माहोरे-नागपूर (सूत्रसंचालक), डॉ. अनिल वावरे-सातारा, डॉ. विकास सुकाळे-नांदेड, डॉ.दिलीप अर्जुने-जालना (सत्राध्यक्ष) यांनी सहकार्य केल्याबद्दल आभार!

३. निवडणूक अधिकारी व सहकारी : डॉ. मंगला भाटे-अमरावती, (निवडणूक निर्णय अधिकारी), डॉ. वणिता चोरे-चांदूर बाजार, डॉ. राजश्री रायभोग-अमरावती यांनी निवडणूक प्रक्रिया अतिशय सुरळीत पार पाडली त्याबद्दल आभार.

विशेष म्हणजे परिषदेच्या इतिहासात निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून महिला सदस्याने प्रथमच भूमिका पार पाडली. हे या अधिवेशनाजे एक वेगळे वैशिष्ट्य ठरले.

याशिवाय गो.सी. टोम्पे महाविद्यालय सार्वजनिक ट्रस्टद्वारा संचलित गो.सी. टोम्पे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय चांदूर बाजार, जि. अमरावती संचालक मंडळाचे सर्व पदाधिकारी, महाविद्यालयाचे प्राचार्य राजेंद्र रामटेके, स्थानिक कार्यवाह डॉ. संजय कोठारी, विजय टोम्पे, डॉ. सुभाष शिरसाठ, डॉ. जयंत बनसोड, डॉ. प्रविण खोडे, डॉ. प्रियदर्शनी देशमुख, प्रा. अनुज धाबलीया, डॉ. प्रविण परिमल, डॉ. नंदकिशोर गव्हाळे, डॉ. धनंजय विजवे, डॉ. प्रफुल चौधरी, डॉ. प्रिया देवळे, डॉ. युगंधरा गुल्हाने, प्रा.पी.आर. यावले, श्री. नितीन तसरे, प्रा. राहुल दारोकार, डॉ. ज्योती चोरे याबरोबरच परिषदेचे ४४ वे वार्षिक राष्ट्रीय अधिवेशन यशस्वी करण्यासाठी अनेक अदृश्य हातांचे सहकार्य लाभले. या सर्वांप्रति मी मराठी अर्थशास्त्र परिषदेचा कार्यवाह-खजिनदार या नात्याने आभार प्रकट करतो. हे कार्य करीत असताना कोणी-कुणाकडूनही अनवधानाने दुखावले गेले असल्यास त्यांच्याबद्दल मी दिलगिरी व्यक्त करून सहकार्याची अपेक्षा करतो. अशा प्रकारे परिषदेचे ४४ वे अविधेशन प्राचार्य डॉ. अनिल सूर्यवंशी यांचे अध्यक्षतेखाली अतिशय यशस्वीपणे संपन्न झाले.

**वार्षिक सर्वसाधारण सभा (आमसभा) :**

४४ व्या वार्षिक अधिवेशनाच्या निमित्ताने रविवार दिनांक १३ मार्च, २०२२ रोजी सकाळी १०:४५ वाजता परिषदेचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. अनिल सूर्यवंशी यांच्या अध्यक्षतेखाली वार्षिक सर्वसाधारण सभा (आमसभा) अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झाली. सभेच्या

सुरुवातीलाच परिषदेचे दिवंगत सदस्य प्राचार्य डॉ. विठ्ठल मोरे, डॉ. विजयकुमार अदवंत, प्रा. मो.स. भावे, डॉ. एस.आर. चिरमाडे, प्रा. एकनाथ एस. महाजन, डॉ. श्रीरंग झोपे, डॉ. सुदाम कोरडे याबरोबरच भाई एन.डी. पाटील, भारतरत्न लता मंगशकर प्राचार्य डॉ. विठ्ठल मोरे आणि ज्ञात, अज्ञात दिवंगत सदस्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. सर्वसाधरण सभेतील काही महत्त्वाचे निर्णय पुढीलप्रमाणे आहेत-

ऑक्टोबर-नोव्हेंबर २०२३ मध्ये होणाऱ्या परिषदेच्या ४५ व्या वार्षिक अधिवेशनाचे यजमानपद स्वीकारण्यासाठी प्राप्त परिस्थितीत प्रस्ताव प्राप्त न झाल्यामुळे यासंदर्भात कार्यकारणीने निर्णय घ्यावा, असे ठरले. ४५ व्या वार्षिक अधिवेशनात चर्चेकरिता पुढील तीन विषय निश्चित करण्यात आले.

१. आर्थिक सिद्धांतन आणि प्रायोगिक पद्धती.
२. पंधरावा वित्तआयोग : केंद्र राज्यवित्तीय संबंधाची चिकित्सा.
३. डॉ. पंजाबराव देशमुखांचे आर्थिक विचार.

**निवडणूक :**

४५व्या वार्षिक अधिवेशनाच्या अध्यक्षपदी प्रा.डॉ. राजेंद्र भांडवलकर, यवतमाळ यांची अविरोध निवड झाली. कार्याध्यक्ष प्राचार्य. डॉ.के.के. पाटील, परभणी यांची मुदत दि. ३१ मार्च, २०२२ रोजी पूर्ण होत असल्यामुळे ०१ एप्रिल, २०२२ ते ३१ मार्च, २०२५ या तीन वर्षांसाठी कार्याध्यक्ष म्हणून डॉ. अविनाश निकम, शहादा यांची अविरोध निवड करण्यात आली. विश्वस्त प्राचार्य डॉ. आ.गो. पुजारी, मंगळवेढा यांची मुदत दि. ३१ मार्च, २०२२ रोजी पूर्ण होत असल्यामुळे दि. ०१ एप्रिल, २०२२ ते ३१ मार्च, २०२५ या तीन वर्षांसाठी विश्वस्त म्हणून प्रा.डॉ. विकास सुकाळे, नांदेड यांची अविरोध निवड करण्यात आली. ०१ एप्रिल, २०२२ ते ३१ मार्च, २०२५ या तीन वर्षांकरिता कार्यकारी मंडळावर प्राचार्य डॉ. संजय घनवटे पं., वर्धा, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर, प्रा.डॉ. विजय नागोराव भोपाळे, पूर्णा (जं.), स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड, प्रा. डॉ. दिलीप अर्जुने, जालना, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांची अविरोध निवड झाली. सोलापूर येथील अधिवेशनापासून अविरोध निवडणूकीची सुरु झालेली प्रथा या अधिवेशनात देखिल सुरु राहिली.

धन्यवाद!

◆

**निवेदन : अर्थसंवाद**

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या ज्या आजीव सदस्यांना अंक मिळत नसेल किंवा पत्त्यात बदल झाला असेल तर त्यांनी प्रमुख संपादक, अर्थसंवाद यांच्याकडे तशा आशयाचे पत्र पाठवून त्या पत्रात आपला नवीन पत्ता लिहून पाठवावा; मात्र या पत्रात आजीव सदस्य क्रमांकाचा उल्लेख असणे अत्यंत गरजेचे आहे.

**- प्रमुख संपादक, अर्थसंवाद**

# आर्थिक सिद्धांतन व प्रायोगिक पद्धत

**अनिलकुमार कृष्णराव वावरे** †

भौतिक शास्त्रांच्या अभ्यासाची एक शास्त्रीय पद्धती असते. अभ्यास-विषयाचा तपशील गोळा करणे, शक्य ते सर्व प्रयोग करणे, या सर्वांच्या आधारे आपली सैद्धांतिक अनुमाने तयार करणे, ती अनुमाने पुन्हा तपशिलाच्या व प्रयोगाच्या आधारे पारखून घेणे, या पद्धतीने भौतिक शास्त्रांच्या रचनेचे कार्य चाललेले असते. एकाने काढलेले सिद्धांत दुसऱ्याला त्याच कसोट्या वापरून, वस्तुनिष्ठ पद्धतीने पारखून घेता येतात. नवा तपशील उपलब्ध झाला किंवा प्रयोगातून काही वेगळे निदर्शनास येऊ लागले, तर सिद्धांताची फेरमांडणी करण्यात येते किंवा जुने सिद्धांत बाजूला टाकून वस्तुस्थितीशी अधिक सुसंगत असे नवीन सिद्धांत स्वीकारण्यात येतात. 'शास्त्र' या दृष्टीने सामाजिक शास्त्राची रचना याच पद्धतीने होणे आवश्यक आहे. परंतु या पद्धतीच्या वापरात सामाजिक शास्त्रांच्या बाबतीत काही अडचणी येतात. प्रयोगशाळेत नियंत्रित अशा परिस्थितीत प्रयोग करून सिद्धांत पारखून घेण्याचा मार्ग सामाजिक शास्त्रांना मोकळा असत नाही. परंतु समाजातील परिस्थितीचे निरीक्षण करून ही शास्त्रे आपले सिद्धांत तयार करू शकतात. प्रत्येक माणसाचे व्यक्तिमत्त्व स्वतंत्र असल्यामुळे एखाद्या परिस्थितीत एखादा विशिष्ट माणूस कसा वागेल याचे भविष्य वर्तविणे शक्य नसले, तरी समाजातील बहुसंख्य लोकांची प्रतिक्रिया काय होईल, याचा अंदाज बांधणे कित्येकदा शक्य असते. या आधारावर उपयुक्त सिद्धांत मांडता येतात.

तथ्य संकलन करणे व त्याचे संख्याशास्त्रीय पद्धतीने संगणकासारख्या यांत्रिक साधनांच्या साहाय्याने विश्लेषण करणे यात उत्तरोत्तर अधिक प्रगती होत आहेच. परंतु याचबरोबर भौतिक शास्त्राप्रमाणेच प्रायोगिक पद्धतीचा जास्तीत जास्त वापर करून आर्थिक सिद्धांत मांडणे व ते आर्थिक समस्या सोडवणूक करण्यासठी लागू पडणे गरजेचे आहे. अर्थशास्त्र हे एक सामाजिक शास्त्र आहे. सिद्धतांची मांडणी करणे हा अर्थशास्त्राचा अविभाज्य भाग आहे. अर्थशास्त्रातील सिद्धांत मांडण्यासाठी व ते सिद्धांत व्यावहारिक समस्या सोडविण्यासाठी लागू पाडण्याकरिता प्रायोगिक पद्धत वापरणे गरजेचे आहे.

सन २००२ चे नोबेल पारितोषिक विजेते Vernon Smith यांनी नवीन आर्थिक धोरणाच्या अंमलबजावणी पूर्वी त्याची तपासणी करण्याची पद्धत शोधून काढण्यासाठी प्रायोगिक पद्धतीचा वापर केला.

तसेच अभिजित बनर्जी, अस्थेर डूप्लो व मायकेल क्रेमर यांनी वैश्विक दारिद्र्य निर्मूलनाकरिता सामाजिक

† विभागप्रमुख, अर्थशास्त्र विभाग छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा (स्वायत्त)
आजीव सभासद क्र. : ८८०, भ्रमणध्वनी : ९८५०११७२२६

कल्याण महात्तमिकरण करण्याकरिता प्रायोगिक पद्धतीच्या आधारे प्रयोग करून दारिद्र्य निर्मूलनाविषयी आपले स्वतंत्र प्रतिमान विकसित केले. त्याबद्दल त्यांना अर्थशास्त्रातील २०१९ चे नोबेल पारितोषिक देण्यात आले.

सदर विषयाच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे उपविषयावर आपणास लेखन करता येईल.

१. शास्त्र व प्रायोगिक पद्धत परस्परसंबंध
२. आर्थिक सिद्धांताची मांडणी व प्रायोगिक पद्धतीची गरज
३. आर्थिक सिद्धांतात प्रायोगिक पद्धतीचे महत्त्व
४. आर्थिक सिद्धांतात प्रायोगिक पद्धतीच्या वापराचा इतिहास
५. आर्थिक सिद्धांतन व प्रायोगिक पद्धतीच्या वापराची मर्यादा
६. आर्थिक सिद्धांताच्या मांडणीमध्ये प्रायोगिक पद्धतीच्या वापरातील आव्हाने
७. आर्थिक सिद्धांत आणि प्रायोगिक पद्धत - समस्या
८. खेळ सिद्धांत आणि प्रायोगिक पद्धत
९. अर्थशास्त्र व प्रायोगिक पद्धत
१०. अर्थशास्त्राच्या उपशाखा व प्रायोगिक पद्धत
११. अर्थशास्त्राच्या संशोधनामध्ये प्रायोगिक पद्धतीच्या प्रभावी वापराच्या संभाव्य शक्यतांचा अभ्यास
१२. अर्थशास्त्रीय संशोधनात उपभोक्त याच्या वर्तणुकीच्या विश्लेषणासाठी प्रायोगिक पद्धतीचा वापर
१३. सार्वजनिक निर्णयप्रक्रिया व प्रायोगिक पद्धत
१४. प्रायोगिक पद्धतीच्या वापरातून प्रभावी विपणन व्यवस्था
१५. प्रायोगिक पद्धतीचा वापर व शेतमाल किमान किंमत निर्धारण
१६. प्रायोगिक पद्धतीद्वारे हवामान बदल आणि कृषि क्षेत्रावरील परिणामांचा अभ्यास
१७. मौद्रिक धोरण निश्चितीसाठी प्रायोगिक पद्धतीचा वापर
१८. पैसा व विनिमय व्यवहारांच्या विकासातील प्रायोगिक पद्धतीच्या वापराचा इतिहास
१९. स्पर्धात्मक बाजार व्यवस्थेतील उत्पादकाच्या वर्तणुकीचा प्रायोगिक अभ्यास
२०. बाजार अपूर्णता व प्रायोगिक पद्धत
२१. प्रायोगिक पद्धतीद्वारे पर्याप्त उत्पादन पातळीनिर्धारण
२२. मागणीच्या अचूक पुर्नुमानामध्ये प्रायोगिक पद्धतीचा वापर
२३. प्रभावी राजकोषीय धोरणाच्या अंमलबजावणीत प्रायोगिक पद्धतीच्या वापराची शक्यता
२४. बेरोजगारी नियंत्रणासाठी प्रायोगिक पद्धतीचे उपयोजन
२५. भाववाढनियंत्रणासाठी प्रायोगिक पद्धतीचे उपयोजन
२६. प्रायोगिक पद्धतीच्या प्रभावी वापरातून कृषि विकास
२७. आधिक्याच्या व्यवहारशेषासाठी प्रायोगिक पद्धतीचे उपयोजन
२८. अर्थशास्त्रीय संशोधनाची प्रायोगिक पद्धत व कल्याण कमालीकरण
२९. अर्थशास्त्रीय संशोधनाची प्रायोगिक पद्धत व आंतरराष्ट्रीय व्यापारातील चढउतार
३०. अर्थशास्त्रीय संशोधनाची प्रायोगिक पद्धत व चलनमूल्य
३१. अर्थशास्त्रीय संशोधनाची प्रायोगिक पद्धत व विकास मापन इ.

◆

# १५वा वित्त आयोग : केंद्र-राज्य वित्तीय संबंधांची चिकित्सा

**संतोष यादव** †

भारतात त्रिस्तरीय संघराज्य पद्धती स्वीकारलेली आहे. यामध्ये केंद्रीय पातळीवर केंद्र सरकार, राज्य पातळीवर विविध राज्य सरकारे आणि स्थानिक पातळीवर जिल्हा परिषदा, पंचायत समिती, ग्रामपंचायत, नगरपंचायत, महानगरपालिका, नगरपालिका (कॅन्टोमेंट बोर्ड) यांचा समावेश होतो. संघराज्यामध्ये प्रत्येक घटकाला घटनेनुसार स्वतंत्र अधिकार प्राप्त झालेले आहेत. तसेच या पद्धतीत प्रत्येक सरकारच्या कार्यांची व अधिकारांची विभागणी घटनेनुसार झालेली आहे. वेगळ्या शब्दात केंद्र व घटकराज्ये यांच्या कार्यांची विभागणी ही कार्यक्षमता, प्रशासकीय सोय आणि मितव्ययता या तत्त्वांच्या आधारावर केली गेली आहे. याच आधारावर काही कार्ये राष्ट्रीय पातळीवर पार पाडणे सोयीची असतात. उदा. देशाचे संरक्षण, परकीय संबंध, आंतरराष्ट्रीय व आंतरराज्य व्यापार, चलन नियंत्रण इ. या कार्यासंदर्भात केंद्र सरकारने निर्णय घेणे योग्य ठरते. वरील तत्त्वांच्या आधारावर काही कार्ये राज्य पातळीवर पार पाडणे सोयीची असतात. उदा. शिक्षण, आरोग्य सेवा, कायदा व सुव्यवस्था, कृषी विकास, औद्योगिक विकास इ. या कार्यासंदर्भात स्थानिक पातळीवर निर्णय घेणे योग्य ठरते.

केंद्र व राज्य सरकारला नेमून दिलेल्या कार्यांची पूर्तता करण्यासाठी वित्तीय निधी किंवा साधनसामग्री उभारण्याचे अधिकारही दिलेले आहेत. कार्यक्षमता, मितव्ययता आणि अपेक्षित परिणाम या तत्त्वांच्या आधारे वित्तीय साधनसामग्री उभारण्याच्या अधिकारांची विभागणी झालेली दिसून येते. तरीही संघराज्य पद्धतीमध्ये वेगवेगळ्या घटक राज्यांत उत्पन्न वाटप करण्याचे, कर आकारणीचे अधिकार देण्याचे, त्याचप्रमाणे विविध कार्यांचे विभाजन करण्याचे काम अतिशय क्लिष्ट व गुंतागुंतीचे असते. त्यातून भारतासारख्या विकसनशील देशात संघराज्यीय शासन व्यवस्थेमध्ये वित्तीय असमतोल निर्माण झालेला दिसून येतो. स्तंभात्मक (Vertical) आणि समपातळी (Horizantal) असमतोल निर्माण झालेला आहे. वित्तीय साधनांचे केंद्रीय स्तरावर केंद्रीकरण व शासकीय कार्यांचे राज्यस्तरावर केंद्रीकरण म्हणजे स्तंभात्मक असमतोलाचे उदाहरण होय. तसेच समपातळी असमतोल हा राज्या-राज्यांमधील असमतोलाशी संबंधित आहे. उदा. भारतातील महाराष्ट्र, गुजरात, कर्नाटक, तामिळनाडू, केरळ यांसारखी काही घटक

† सदस्य अर्थशास्त्र अभ्यास मंडळ, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर आणि कमला कॉलेज कोल्हापूर (स्वायत्त), देवचंद कॉलेज, अर्जुननगर, कोल्हापूर
आजीव सभासद क्र. : ११९७, भ्रमणध्वनी : ९९२११६०२०८, ईमेल : atharvsby@gmail.com

राज्ये आर्थिकदृष्ट्या सशक्त असल्यामुळे त्यांची वित्तीय स्थितीही तुलनेने चांगली आहे. याउलट बिहार, ओरिसा, अरुणाचल प्रदेश, आसाम ही राज्ये मागासलेली असल्यामुळे त्यांची वित्तीय स्थिती दुर्बल असलेली दिसून येते.

संघराज्यातील घटकराज्यांना मिळालेली महसुलाची साधने ही काही वेळा त्यांना नेमून दिलेल्या कार्यांशी तुलना करता अपुरी असलेली दिसून येतात. याउलट, केंद्र सरकारची वित्तीय साधने ही केंद्राला नेमून दिलेल्या कार्यांपेक्षा अधिक असतात. हा असमतोल दूर करण्यासाठी संघराज्यीय व्यवस्थेत केंद्र सरकारकडून घटकराज्यांना वित्तीय साधनसामग्रीचे हस्तांतरण करण्याची घटनात्मक तरतूद केलेली आहे. हे हस्तांतरण कर महसुलातील सहभाग, अनुदाने आणि कर्जे याद्वारे केले जाते.

संघराज्य व्यवस्थेमध्ये वित्तीय साधनांच्या वाटपासंदर्भात काही समस्या निर्माण झालेल्या दिसून येतात. उदा. योग्य उत्पन्न वाटपाची समस्या, प्रादेशिक असमतोलाची समस्या, केंद्राचे वर्चस्व, केंद्र-राज्य यामधील वाढता संघर्ष इ. या समस्या दूर करण्यासाठी आणि संघराज्याचा सर्वसमावेशक विकास घडवून आणण्यासाठी केंद्र व राज्ये यांच्यामध्ये वित्तीय साधनांचे योग्य वाटप होणे आवश्यक असते. त्यादृष्टीने स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारताने स्वीकारलेल्या संघराज्यीय शासन व्यवस्थेमध्ये राज्यघटनेच्या कलम २८० नुसार दर पाच वर्षांनी राष्ट्रपतींकडून वित्त आयोगाची नियुक्ती करण्यात येते. ती अर्ध-न्यायिक संस्था आहे. कर उत्पन्नाचे आणि अनुदानाचे वाटप घटकराज्यांमध्ये कोणत्या निकषांआधारे करावयाचे या संदर्भात वित्त आयोग राष्ट्रपतींकडे शिफारशी करण्याचे काम करतो. केंद्र-राज्य वित्तीय संबंधामध्ये वित्त आयोगाची महत्त्वाची भूमिका असल्याचे दिसून येते. वित्त आयोगाच्या भूमिकेमुळे एका अर्थाने केंद्र-राज्य वित्तीय संबंधात एक प्रकारची लवचिकता निर्माण झालेली दिसून येते.

भारतीय राज्यघटनेच्या स्थापनेपासून आतापर्यंत एकूण १५ वित्त आयोग स्थापन झाले असून त्यांचे अहवाल त्या त्या वेळी राष्ट्रपतीस सादर झालेले आहेत. वित्त आयोग कायदा १९५१ अंतर्गत पहिल्या वित्त आयोगाची स्थापना २२ नोव्हेंबर १९५१ रोजी श्री. के. सी. नियोगी यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आली. केंद्र आणि राज्य सरकारे यांच्यातील आर्थिकसंबंध निश्चित करणे हा त्याच्या स्थापनेचा मुख्य उद्देश होता. अलीकडच्या १५ व्या वित्त आयोगाची स्थापना २७ नोव्हेंबर २०१७ रोजी भारतीय नियोजन आयोगाचे माजी सदस्य श्री. एन. के. सिंग यांच्या अध्यक्षतेखाली १ एप्रिल २०२० पासून सुरू होणाऱ्या आर्थिक वर्षासाठी कर आणि इतर आर्थिक बाबींच्या हस्तांतरणासंबंधी शिफारशी करण्यासाठी करण्यात आली होती. या आयोगामध्ये अजय नारायण झा, अशोक लाहिरी, अनुप सिंग रमेश चंद हे सदस्य होते. वित्त आयोगाच्या सदस्यपदी सुरुवातीच्या एक वर्षासाठी शक्तीकांत दास हे सुद्धा होते. परंतु नंतर भारतीय रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर म्हणून त्यांची नेमणूक झाली.

नोव्हेंबर २०१९ मध्ये केंद्रीय मंत्रिमंडळाने १५ व्या वित्त आयोगाला पहिल्या आर्थिक वर्षाचा अहवाल सादर करण्यास मान्यता दिली. २०२०-२१ या आर्थिक वर्षासाठीच्या शिफारशींचा समावेश असलेला पहिला अहवाल फेब्रुवारी २०२०; तर २०२१-२६ कालावधीसाठीच्या शिफारशींचा अंतिम अहवाल १ फेब्रुवारी २०२१ रोजी संसदेत मांडण्यात आला.

सहकारी संघराज्य मजबूत करणे, लोकांच्या राहाणीमानात गुणात्मक सुधारणा करणे आणि आर्थिक अस्थिरतेपासून संरक्षण करण्यास मदत करणे ही आयोगाची मुख्य कार्ये होती. २०२१-२०२६ या कालावधीसाठी आयोगाने 'फायनान्स कमिशन इन कोविड टाइम्स' या शीर्षकाखाली आपला अहवाल

यामध्ये नवनिर्मित केंद्रशासित प्रदेश जम्मू-काश्मीर आणि लडाख यांची सुरक्षा व इतर गरजांच्या पूर्तीसाठी केंद्र शासनाच्या कराच्या हिश्श्यात एक टक्का वाढ करणे, सार्वजनिक वित्तीय लेखापरीक्षण व्यवस्थेसाठी कायदा तयार करण्यासाठी कार्यगटाची निर्मिती, कर प्रशासनाची कार्यक्षमता वाढविणे, ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांच्या बळकटीकरणासाठी केंद्र शासनाकडून राज्यांना मुलभूत अनुदान (basic grant) व निकषाधारित अनुदान (tied grant) अशा दोन प्रकारच्या अनुदानाच्या स्वरूपात ५०-५० टक्के निधी प्राप्त करून देणे अशा महत्त्वाच्या शिफारशी केलेल्या दिसून येतात. वस्तूत: भारतातील वस्तू आणि सेवा कर (G.S.T.) अंमलबजावणीमुळे वित्त आयोगाचे कार्य कठीण झाले. कारण वस्तू आणि सेवा कर आकारणी, त्याचे वितरण याचे अधिकार वस्तू आणि सेवा कर परिषदेला (G.S.T. Council) दिले गेले. त्यातच वित्तीय जबाबदारी आणि अर्थसंकल्पीय व्यवस्थापन कायदा २००३ आल्यानंतरही अनेक राज्यांमध्ये महसुली तूट मोठ्या प्रमाणात असलेली दिसते. त्यामुळे महसुली तूट अनुदानाचे वितरण करणे किंवा वित्तीय बळकटीकरणासाठी मार्ग सुचविणे असे प्रश्न आयोगासमोर निर्माण झाले. संशोधकांनी शोधनिबंध लिहिताना वरील बाबी ध्यानात ठेवणे आवश्यक आहे. शोधनिबंधासाठी खालील मुद्द्यांचा चिकित्सक पद्धतीने विचार करता येईल.

१. भारतीय संघराज्य व्यवस्था व केंद्र-राज्य वित्तसंबंध याबद्दलच्या घटनात्मक तरतुदी व त्यांचे समर्थन.
२. १५व्या वित्त आयोगाची पार्श्वभूमी-संघराज्य वित्त व्यवस्थेसंबंधी प्रश्न.
३. १५व्या वित्त आयोगासंबंधी अर्थकारण, राजकारण, कायदा व प्रशासनासंबंधी मुद्दे.
४. १५व्या वित्त आयोगाच्या अहवालाचा केंद्र-राज्य वित्त संबंधावरील परिणाम.
५. १५व्या वित्त आयोगाच्या संदर्भ कक्षांचे (terms of reference) विवेचन
६. १५व्या वित्त आयोगाच्या प्रमुख शिफारशींचे विश्लेषण
७. १५व्या वित्त आयोगाच्या नावीन्यपूर्ण शिफारशींचे विश्लेषण
८. १५वा वित्त आयोग व वस्तू आणि सेवा कर (G.S.T.) परिषद यातील संबंध
९. १५व्या वित्त आयोगामुळे निर्माण झालेले नवे प्रश्न
१०. वित्त आयोगाचे कामकाज आणि वित्तीय अधिकारांचे, वित्तीय साधनांचे केंद्रीकरण यातील संबंध
११. भारतातील वित्त आयोगांच्या अहवालांचा तुलनात्मक अभ्यास-समग्र किंवा विशिष्ट प्रश्न, समस्या, उपाय किंवा शिफारशींच्या संदर्भात
१२. १५वा वित्त आयोग आणि भारतातील सहकारी संघराज्य व्यवस्था
१३. १५वा वित्त आयोग आणि कर हस्तांतरण / संसाधनांचे हस्तांतरण (tax sharing)
१४. १५वा वित्त आयोग आणि अनुदाने (Grands in aid)
१५. १५वा वित्त आयोग आणि घटकराज्यांचा असमतोल विकास
१६. १५वा वित्त आयोग आणि लंबात्मक असमतोल
१७. १५वा वित्त आयोग आणि केंद्र-राज्य वित्तसंबंध (घटनात्मक, प्रशासकीय, कार्यात्मक)
१८. राज्यांचे केंद्रावरील अवलंबित्व आणि १५व्या वित्त आयोगाच्या शिफारशी
१९. केंद्र - राज्य वित्तीय हस्तांतरणातील काम
२०. वित्त आयोगाने सुचविलेल्या विविध योजनांची रचना आणि अंमलबजावणी
२१. केंद्र-राज्य वित्तीय हस्तांतरणातील समस्या आणि सुधारणा
२२. भारतातील वित्त आयोग आणि राज्यांच्या वित्तीय कामगिरीतील सुधारणा
२३. केंद्र-राज्य वित्तीय हस्तांतरण : आंतरराष्ट्रीय अनुभव

२४. कोरोना काळाचा राज्यांवरील वित्तीय परिणाम आणि १५वा वित्त आयोग

२५. १५वा वित्त आयोग आणि स्थानिक स्वराज्य संस्थांचे सशक्तीकरण

वरील विषयावर आणि त्या अनुषंगाने येणाऱ्या विविध पैलूंवर संशोधकांना आपले शोधनिबंध चिकित्सक पद्धतीने लिहिता येतील. संशोधकांनी आकडेवारीसोबत विश्लेषणावर भर द्यावा.

**संदर्भसूची :**


१. Report of the 15th Finance Commission (Oct. 2020) Finance Commission in Covid Times, XV Finance commission.

२. Various Reports of the Finance Commissions 1st to 14th (1951 to 2020) : Ministry of finance, New Delhi.

३. Rao Govinda M. (2020) : 'Central Transfers to States in India : Rewarding Performance while Ensuring Equity (Final Report of a Study Submitted to NITI Ayog)

४. Panda Manoj et. al (2019) : 'A Study Prepared for 15th Finance Commission : Resource Sharing between Center and States and Allocation Across States : Some Issues in Balancing Equity and Efficiency, Institute of Economic Growth, New Delhi.

५. Pradhan Basanta K. (2019) : 'Critically Adjusted Primary Balance for Centre and States in India' Development Planning Center, Institute of Economic Growth, New Delhi.

६. Rao Govinda M. (2004) : Linking Central Transfers to Fiscal Performance of States, Economic and Political Weekly, May 1-7 2004, Vol. 39, No. 18, pp 1820-1825.

७. T.M.Thomas Issac, R. Mohan, Lekha Chakraborty (Nov.2020) 'Fifteenth Finance Commission Award for 2020-21 EPW, Vol.55, Issue No. 45.

८. Pinaki Chakraborty (Aug. 2021) : COVID-19 Context and the Fifteenth Finance Commission ', EPW, Vol 56, Issue no.33.

९. Ajay Narayan Jha (Sept. 2021) : Continuity with Change' EPW, Vol. 56, Issue No. 33.

१०. D. K. Srivastva (Sept. 2021) : 'Fiscal Consolidation and FRBM in the COVID - 19 Context', EPW, Vol. 56 Issue No. 33.

११. M. Govinda Rao (Aug. 2021) : 'Fiscal Transfers in Pandemic Times', EPW, Vol. 56, Issue No. 33.

१२. Govind Bhattacharjee and Rakhee Bhattacharya (Oct. 2021) : 'Fifteen Finace Commissions Recommandations', EPW, Vol. 56, Issue No. 41.

१३. J. Dennis Rajakumar (Aug. 2021) : 'Fifteen Finance Commission Award and the North-eastern States', EPW, Vol. 56, Issue No. 33.

१४. V. Bhaskar (Mar. 2018) : Challenges before the Fifteen Finance Commission', EPW, Vol. 53, Issue No. 10.

१५. www.fincomindia.nic.in (website of Finance Commission)


◆

# डॉ.पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांचे आर्थिक विचार

**सुरेश जगताप** †

**प्रास्तविक**

डॉ.पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांचा जन्म अमरावती जिल्ह्यातील नांदगांव खंडेश्वर तालुक्यात पापळ या गावी दि.२७ डिसेंबर,१८९८ रोजी शेतकरी कुटुंबात झाला. त्यांच्या आईचे नाव राधाबाई व वडिलांचे नाव श्यामरावबापू देशमुख होते. त्यांचे प्राथमिक शिक्षण पापळ-कारंजा लाड व शालेय शिक्षण अमरावती येथील तत्कालीन सरकारी हिंदू हायस्कूल येथे झाले. त्यांना ६ वी पासूनच शिष्यवृत्ती प्राप्त झाली व १९१८ साली प्रावीण्यासह मॅट्रिकची परीक्षा त्यांनी उत्तीर्ण केली. उच्चशिक्षणासाठी पुणे येथील फर्ग्युसन कॉलेजमध्ये जून १९१८ ला प्रवेश घेतला. त्यांच्या विद्वतेतून उच्चशिक्षण ज्ञानप्राप्तीसाठी इंग्लंड येथे जाण्याचे पक्के झाले. परंतु आर्थिक परिस्थिती नसल्याने त्यांच्या वडिलांनी जमीन गहाण ठेवून उच्चशिक्षणाची इच्छा पूर्ण केली. ऑगस्ट १९२० ला इंग्लंडसाठी रवाना झाले व तेथून त्यांनी D.Phil., बार अ‍ॅट लॉ व संस्कृत या विषयात अभ्यासपूर्ण पदव्या घेऊन जुलै १९२६ ला भारतात परत आले.

हे सर्व शिक्षण घेत असताना आर्थिकतेचा ताण व विचार त्यांच्या मनात सतत येत होता. विदेशात ज्ञान प्राप्तीबरोबरच तेथील मनुष्य स्वभाव पाश्चिमात्य जगातील अर्थव्यवस्थेचा व विकासाचा अनुभव घेता स्वदेशात विकास कसा साधता येईल, हा विचार त्यांचा मनात सतत येत होता. त्यानुसार त्यांनी पुढील आयुष्य देशसेवेत सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक विकासासाठी खर्च केले. म्हणूनच मराठी अर्थशास्त्र परिषदेमध्ये चर्चासत्रासाठी 'डॉ.पंजाबराव देशमुख यांचे आर्थिक विचार' हा विषय ठेवला गेला. त्याबद्दल परिषदेचेसुद्धा आभार.

त्यांनी शिक्षण घेत असताना प्रत्येक परीक्षेत स्कॉलरशिप मिळवत बोर्ड इंग्लंडमध्ये 'व्हॅन्स डनलॉप रिसर्च' ही अतिउच्च १०० पौडांची स्कॉलरशिप त्यांनी मिळविली. 'वैदिक वाङ्मयात धर्माचा उद्‌गम व विकास' हा ग्रंथ इंग्लंडमध्ये सादर करून भारतीय ज्ञानाचे भांडार व झेंडा त्यांनी परकीय भूमीवर फडकविला व त्यांच्या बुद्धिमत्तेचे दर्शन विदेशी भूमीवर घडविले.

डॉ.पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या कार्यकर्तृत्वाच्या काळात संपूर्ण भारत देश गरिबी, दारिद्र्य, शिक्षणाचा अभाव, आर्थिक मागासलेपण

† प्राध्यापक, श्रीमती केशरबाई लाहोटी महा.अमरावती.
आजीव सभासद क्र. : ११४१, भ्रमणध्वनी : ९४२०८३२५९२, ईमेल : sureshjagtap119@gmail.com

विकासाच्या सोयींचा अभाव, वैचारिकतेची कमी, कृषी, उद्योग, शिक्षण इ. क्षेत्रातले मागासलेपण अशा अनेक समस्यांची ते इंग्लंड व भारत यांची तुलना नेहमी मनात करत असत. म्हणून त्यांनी कारंजा लाड येथे कृष्णराव देशमुख यांना लिहिलेल्या पत्रात म्हटले की, मी I.C.S. न झालो तरी चालेल, झालो तरी मी सरकारी नोकरी करणार नाही. कारण हिंदुस्थानची आजची खरी गरज मी काही अंशी जर भरून न काढली तर व्यर्थ जन्माला आलो असे समजेल. या माझ्या विचारांना सरकारी नोकरीची बेडी पायात अडकवून घेणार नाही. यातूनच त्यांनी सुरुवातीला अमरावती येथे वकिली व्यवसाय सुरू करून आपल्या समाजकार्याची सुरुवात केली आणि गरिबांचे अनेक खटले चालवून न्याय मिळवून दिला. त्यांनी राजकारणाच्या माध्यमातून समाजकारण, शिक्षण, उद्योग, रोजगार व आर्थिक विकास इ.क्षेत्रांत धडाडीने काम करण्याचा निर्णय घेऊन मूल्याधारिता राजकारणात सक्रिय होवून सामाजिक व आर्थिक विकास साधण्याचा प्रयत्न केला. त्यासाठी त्यांनी १९३२ साली श्री शिवाजी शिक्षण संस्थेची स्थापना केली. त्यांना शिक्षणासाठी घ्यावे लागलेले कष्ट, आर्थिक अडचणींचा सामना करावा लागला म्हणून त्यांनी समाजातील गोरगरिबांना शिक्षणाच्या सोयी प्राप्त व्हाव्या, समाजसुधारणा व्हावी यासाठी म्हणून श्री शिवाजी शिक्षण संस्था स्थापन केली. आज या संस्थेचा भव्य व विस्तारस्वरूप समाजातील प्रत्येक घटकाला लाभदायक ठरत आहे. शिक्षणातूनच समाज आपला आर्थिक विकास साधेल हा त्यांचा पक्का विश्वास होता. त्यांना एक मुलगा अनंत होता, तर श्री शिवाजी शिक्षण संस्थेस दुसरे अपत्य मानत असत.

डॉ.पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांनी त्यांच्या जीवनात केलेले अनेक विकासात्मक कामे व विचारावर आधारित या परिषदेत निबंध लेखन करता येईल त्यासाठी खालीलप्रमाणे मार्गदर्शक विषय देण्यात येत आहे.

डॉ.पंजाबराव देशमुख यांचे आर्थिक, कृषी, शैक्षणिक विकाससंबंधित विषय-

१. डॉ. पंजाबराव देशमुख यांचे कृषिविषयक आर्थिक विचार.
२. डॉ. पंजाबराव देशमुख यांचे शैक्षणिक विचाराला कृषी व आर्थिक विकासपूरक.
३. शेतकऱ्यांचे दारिद्र्य व अज्ञान दूर करण्यासाठी डॉ.पंजाबराव देशमुख यांनी केलेले प्रयत्न.
४. कृषिक्षेत्राच्या आर्थिक विकासासाठी डॉ.पंजाबराव देशमुख यांनी केलेले प्रयत्न.
५. अन्नधान्य उत्पादनात वाढ करून शेती-शेतकरी व देश समृद्धीसाठी डॉ.पंजाबराव देशमुख यांचे कार्य व विचार.
६. शेतकऱ्यांना सावकाराच्या सापड्यातून मुक्त करून त्यांचे आर्थिक, सामाजिक शोषण थांबवण्याबाबतचे आर्थिक विचार.
७. समाजपरिवर्तनासाठी शिक्षण व त्यातून आर्थिक विकास यावर आधारित सामाजिक व आर्थिक विचार.
८. अलीकडच्या काळात शेतकऱ्यांच्या आत्महत्या प्रमाण पाहाता डॉ.पंजाबराव देशमुख यांचे कृषिविषयक आर्थिक विचार व वर्तमान काळातील यथार्थता.
९. भाऊसाहेब घटना समितेचे सदस्य असताना सामाजिक, आर्थिक विकासासाठी केलेले कार्य व त्यावर आधारित त्यांची भाषणे इ.
१०. रोजगार निर्मितीसाठी उद्योग व कृषी उद्योग यासाठी त्यांनी केलेले प्रयत्न व सहकारी संस्थांचा विकास वरील मुद्द्यांचा आधार घेऊन स्वतंत्र वेगळे विषय लेखक घेवू शकतात.

त्यांच्या कार्याचे संक्षिप्त स्वरूप खालीलप्रमाणे देण्यात येत आहे.

**अ) डॉ.पंजाबराव देशमुख यांनी केलेले कार्य व आर्थिक विचार**

अमरावती जिल्हा काऊन्सिलचे अध्यक्ष म्हणून डॉ.पंजाबराव देशमुख १९२८ ला निवडून आले. वऱ्हाड प्रांतात ग्रामीण आरोग्यासाठी पाणीपुरवठा योजना त्यासाठी जिल्हा काऊन्सिल व सरकारकडून अंदाजपत्रकात मंजुरात घेणे, पाणी वाटपात स्पृश्य - अस्पृश्य संघर्षातून आर्थिक विकासातून निर्माण होणारे अडथळे, भारतीय अर्थव्यवस्थेवर व संस्कृतीवर शेतकरी व प्रत्येक मानवावर पाश्चिमात्यांच्या अंधानुकरणातून निर्माण होणारा मोजक्या धनिक लोकांचा चंगळवाद याचे आर्थिक धोके त्यावेळी भाऊसाहेबांनी ओळखले होते. ते आजही स्पष्ट होते. भारतासारख्या देशाला गरिबी निर्मूलनाचा एकमेव मार्ग म्हणजे शेतकऱ्यांचा आर्थिक विकास होय. त्यातून अर्थशास्त्रांचा झिरपता-पाझरता सिद्धांत भाऊसाहेबांच्या आर्थिक विचारात आहे. त्यांच्या मते, शेती हा अर्थव्यवस्थेचा आत्मा तर कृषक हा जीव आहे. शेती विकासासाठी त्यांनी अनेक संस्था काढल्या व ते त्याचे संस्थापक अध्यक्षसुद्धा राहिले. १९५५ साली भारत कृषक समाज ही संस्था स्थापन करून आर्थिक उन्नतीसाठी शेतकरी संघटित झाला पाहिजे व त्यांचे प्रश्न सुटले पाहिजे, यासाठी संस्था स्थापन केली. त्या संस्थेचे कार्य व स्वरूप पाहाता तत्कालीन राज्यकर्त्यांनासुद्धा स्वतःच्या अस्तित्वाची भीती वाटू लागली. तसेच असंख्यांकाकरिता अन्य ही संस्था स्थापन करून भांडवल तंत्रापेक्षा श्रमप्रदान तंत्राचा वापर करून विकास साधणे देशाला साध्य होईल, असा त्यांचा विचार होता.

**ब) स्वतंत्र भारताचे पहिले कृषिमंत्री म्हणून कार्य**

डॉ.पंजाबराव देशमख हे स्वतंत्र भारताचे पहिले कृषिमंत्री म्हणून अनेक कार्य केले. गरिबी निर्मूलनाची समस्या कृषिक्षेत्राशी निगडित असल्याने त्यासाठी त्यांनी अनेक विधेयके मांडली. कृषीसंबंधी त्यांनी अनेक संस्था काढल्या. देश-विदेशात भेटी देवून कायदे व योजना तयार केल्या. जपानी भातशेतीचा प्रयोग, सिंचन यंत्राचा व तंत्राचा वापर, तेलबिया, कडधान्य उत्पादनात वाढ व त्यावर आधारित उद्योगांवर भर दिला. जसे कृषी यंत्रसामग्री संघटना, लक्षावधी लोकांसाठी अन्य संघटना, सहकारी कृषी विपनन संघ (१९५८-१९६२), भारत कृषक सहकारी अधिकोष, अखिल भारतीय ताळगुळ संघ, मधमाशी पालन संघटना (१९६०), अखाद्य तेलबिया उद्योग संघटना हे सर्व संघटनात्मक कार्य करीत असताना दिल्ली येथे ११ डिसेंबर १९५९ ते २९ फेब्रुवारी १९६० असे एकूण ९२ दिवस 'न भूतो न भविष्यती' असे जागतिक कृषी प्रदर्शन भरविले. ज्यात ३५ लाख लोकांनी सहभाग घेतला. या प्रदर्शनाला अनेक थोर परकीय पाहुण्यांनी त्यात रशियाचे अध्यक्ष, प्रधानमंत्री, जर्मनीचे उपपंतप्रधान, पोलंड, नेपाळ, कंबोडिया व अमेरिकेचे अध्यक्ष उद्‌घाटनाला उपस्थित होते. या प्रदर्शनानिमित्त निधीचे व कार्यक्रमाचे नियोबद्ध आयोजन व विनियोजन डॉ.पंजाबरावांनी अत्यंत प्रभावीपणे पार पाडले. विदेशी पाहुण्यांसह पंतप्रधान पंडीत जवाहरलाल नेहरू यांनीसुद्धा त्यांची प्रशंसा केली. या प्रदर्शनातून त्यांचे अनेक आर्थिक विचार स्पष्ट होतात.

त्यानंतर त्यांनी प्रथम राष्ट्रीय कृषी प्रदर्शन कलकत्ता (१६६१) द्वितीय मद्रास येथे १९६२ ला भरविले. राष्ट्रीय बियाणे महामंडळाची स्थापना १९६३ व कृषी उत्पादकांचा आंतरराष्ट्रीय संघ स्थापन केला, ज्यातून आर्थिक विकास जगाच्यासोबत साधता येईल, हा त्यांचा विचार होता.

**क) मध्यप्रांत वऱ्हाडचे मंत्री म्हणून कार्य**

डिसेंबर १९३० साली त्यांच्याकडे शिक्षण, शेती, लोककर्म व सहकार ही खाती असताना त्यांनी घेतलेले लोकहिताचे अनेक निर्णय, शिक्षणात फी मध्ये ३४% सूट, शिक्षणविषयक सुधारणा, मध्यप्रांत पाटबंधारे दुरुस्ती

विधेयक १९३१, सहकारी संस्था दुरुस्ती विधेयक १९३१, हिंदू देवस्थान संपत्ती विधेयक १९३१, कर्जलवाद विधेयकाचे प्रारूप १९३२, मध्यप्रांत खेडे पंचायत १९३६, मध्यप्रांत कृषिमुक्ती विधेयक १९३१ इ. नवआर्थिक सुधारणासाठी त्यांनी विधेयके मांडली

**ड. कृषी क्रांती व कृषी आर्थिकविषयक विचार**

काळाबाजार आणि नफेखोरीविषयक विचार, विदेशी कर्जाबाबत भाऊसाहेबांनी मांडलेले विचार सैन्य विधेयक व बालविवाह प्रतिबंधक कायदा, जातीयवाद, जातीयवाद निर्मूलनातून आर्थिक विकासाबाबत भाऊसाहेबांचे विचार, गोसंवर्धन विधेयकाबाबत आर्थिक विचार.

**इ) शिक्षण व आर्थिक विकासाबाबत विचार**

कृषीसाठी शिक्षण आवश्यक, लोकविद्यापीठाबाबत विचार, शिक्षण आणि खर्च याबाबत आर्थिक तडजोड, भूसंपादनाबाबत कृषी व आर्थिक विचार, ग्रामीण अर्थव्यवस्था आणि खेडे विभागातून उत्तम शेतकरी योजना, युवकांना सैनिक शिक्षण, स्त्रियांना शिक्षण, कृषीला कृतिशील शिक्षण व सहकार इ. विचारांवर भाऊसाहेबांनी आर्थिक विकासाचा पाया रचला आहे.

**ई. कुटीर व ग्रामोद्योग**

ग्रामीण विकासासाठी खरीप व रब्बी पिके त्यांची वर्गवारी, त्यातून अनेक औद्योगिक उपक्रम. जसे, गांधी ग्रामोद्योग मंदिर, निंबोळी उद्योग, कापूस आधारिता उद्योग, उत्पादन खर्च आणि किंमत संतुलनाबाबत आर्थिक विचार, ग्रामीण औद्योगिकीकरणाचे विचार, अन्नधान्य उत्पादन आधारित उद्योगातून आर्थिक विकास लघुउद्योग व त्यांचे महत्त्व महात्मा गांधी व भाऊसाहेब यांचे ग्रामीण विकासाबाबतचे साम्य, पशुधन व पशुउद्योग संघटना आर्थिक विकासासाठी कृषिविषयक धोरणे, हळद उद्योग, वनसंवर्धन, कापूस उत्पादकांच्या समस्या, स्त्रियांचे कृषीमध्ये योगदान इ.

वरीलप्रमाणे दिलेले मुद्दे भाऊसाहेबांचे आर्थिक विचारावर निबंध लिहिताना लेखकांना सहाय्य होईल.

भारतीय घटना समिती डॉ.पंजाबराव देशमुख यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्यासोबत केलेल्या कार्यात अनेक विचार मांडलेले आहे. ते बहुधा सामाजिक व आर्थिक विकासासंबंधितच होते. त्या विचाराचा सन्मान म्हणून भाऊसाहेबांचा गौरव केला.

**विकासाबाबत काही त्यांची मते**

ग्रामीण विकास साधून शहरात होणारे स्थलांतरण थांबविणे, काळ्या पैशाचा शेतीविकासासाठी उपयोग करावा, कर्जमुक्तीसाठी शेतकरी सहकारी बँकेची स्थापना करावी, शिक्षणामध्ये कृषी शिक्षणाला कृतिशील बनवावे, कृषी कल्याण अधिकाऱ्यांची नियुक्ती करावी, उपभोग्य वस्तू उत्पादन कारखाने सुरू करावे, सहकारी विपणन निर्माण करावे, विश्वस्त संस्थांची संपत्ती देशविकासासाठी ताब्यात घ्यावी, देवस्थान संपत्तीचा उपयोग विकासासाठी करावा, जातीव्यवस्था निर्मूलन, उत्पादन खर्चावर आधारित भाव कमी व्याज दराने शेतकऱ्यांना कर्जपुरवठा, ग्रामीण भागात पायाभूत सुविधा, जमिनीची सुपीकता वाढवावी, कृषीक्षेत्रात पशुधनाला प्राधान्य द्यावे, कृषीला उद्योगाचा दर्जा द्यावा इ.विचार विकासाच्या मार्गासाठी मांडलेले आहेत.

सतत कार्यमग्न राहाणे या वृत्तीमुळे त्यांना खूप दगदग सहन करावी लागे. शेवटी दि.१० एप्रिल १९६५ रोजी राष्ट्रविकासाचे काम करत असताना दिल्ली येथे शासकीय बंगल्यामध्ये भाऊसाहेबांचे निधन झाले. अशा या कर्मयोगी कृषी-शिक्षण महर्षी त्यागी जीवनाने अनेक विकासात्मक कार्य केले त्यांना **विनम्र अभिवादन.**

शोधनिबंधाचे अपेक्षित स्वरूप : वरीलप्रमाणे दिलेली माहिती, मुद्दे व त्यांच्या कार्याबाबतची संकल्पना इ.आधार घेऊन विषयाला अनुरूप असा स्वतंत्र विषय लेखक घेऊ शकतील व याशिवाय अनेक आर्थिक मुद्द्यांचा संदर्भ देऊन शोधनिबंध सादर करू शकतील.

◆

## ‘अर्थसंवाद’ या त्रैमासिकाच्या स्वामित्व व इतर बाबींविषयी निवेदन

**(फॉर्म ४, नियम ८ नुसार)**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | प्रकाशन स्थळ | : | मराठी अर्थशास्त्र परिषद, द्वारा/‘संगाई’, घर नं. २२, शहीद भगतसिंग नगर, भालचंद्र पेट्रोल पंपाच्यामागे, पारनेर रोड, अंबड, जि. जालना - ४३१२०४ |
| २. | नियतकाल | : | त्रैमासिक |
| ३. | मुद्रकाचे नाव | : | मारोती वि. तेगमपुरे |
| | राष्ट्रीयत्व | : | भारतीय |
| | पत्ता | : | ‘संगाई’, घर नं. २२, शहीद भगतसिंग नगर, भालचंद्र पेट्रोल पंपाच्यामागे, पारनेर रोड, अंबड, जि. जालना - ४३१२०४ |
| ४. | मुद्रण स्थळ | : | भारती मुद्रणालय, ८३२ ई, शाहूपुरी ४ थी गल्ली, कोल्हापूर ४१६ ००१ फोन : (०२३१) २६५४३२९ |
| ५. | प्रकाशकाचे नाव | : | बाब क्र. ३ प्रमाणे |
| ६. | संपादकाचे नाव | : | राहुल शंकरराव म्होपरे |
| ७. | राष्ट्रीयत्व | : | भारतीय |
| | पत्ता | : | ‘सर’ निवास, री. स. नं. ३३/क/२, प्लॉट नं. १८, लेक व्ह्यू कॉलनी, दीपा गॅस गोडावूनच्या पाठीमागे, उजळाईवाडी, ता. करवीर, जि. कोल्हापूर, पिन : ४१६ ००४ |
| ८. | मालकाचे नाव | : | मराठी अर्थशास्त्र परिषद, द्वारा : सेंटर फॉर दी स्टडी ऑफ सोशल चेन्ज, एम.एन. रॉय ह्यूमन डेव्हलपमेन्ट कॅम्पस, प्लॉट क्र. ६, एफ् ब्लॉक, कार्डिनल ग्रेशियस स्कूलजवळ, सरकारी वसाहत इमारत क्र. ३२३ समोर, वांद्रे (पूर्व) मुंबई - ४०० ०५१ |

मी मारोती वि. तेगमपुरे असे जाहीर करतो की, वर दिलेला तपशील माझ्या माहिती आणि समजुतीनुसार खरा आहे.

**मारोती वि. तेगमपुरे**
मुद्रक व प्रकाशक

# महाराष्ट्र शासन
# महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

(स्थापना : १९ नोव्हेंबर, १९६०)

**रवींद्र नाट्यमंदिर इमारत, दुसरा मजला, पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी आवार, सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई – ४०० ०२५**

दूरध्वनी : ०२२-२४३२५९२९/३१ फॅक्स : ०२२-२४३२ ५९३१ ई-मेल : secretary.sblc-mh@gov.in

संकेतस्तळ : https://msblc.maharashtra.gov.in


**मंडळाच्या योजना**

१. पुस्तक प्रकाशन योजना-विविध विषयांवरील बृहद्‌ग्रंथ प्रकाशित करणे
२. महाराष्ट्राचे शिल्पकार चरित्रमाला योजना
३. उत्कृष्ट ग्रंथांची भाषांतरे योजना
४. ललित व ललितेतर वाङ्मयाच्या प्रकाशनार्थ अनुदान योजना
५. नवलेखक पुस्तक प्रकाशनासाठी उत्तेजनार्थ अनुदान योजना
६. नवलेखक कार्यशाळा अनुदान योजना
७. नियतकालिकांना अनुदान योजना
८. स्व. यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्मय पुरस्कार योजना, विंदा करंदीकर जीवनगौरव पुरस्कार योजना, श्री.पु. भागवत पुरस्कार योजना
९. अन्य मराठी साहित्य संमेलनांना अनुदान योजना.

**मंडळाची निवडक प्रकाशने**

१. मृगपक्षिशास्त्र (मूळ संस्कृतासह) हंसदेव विरचित-संपा. मारुती चित्तमपल्ली. पं. नरसिंशास्त्री भातखंडे
२. खगोलशास्त्राचे विश्व - डॉ. जयंत विष्णू नारळीकर
३. कलेची मूलतत्त्वे (R.G.Collingwood यांच्या The Principles of Art या पुस्तकाचे भाषांतर) – स.गं. मालशे, डॉ. मिलिंद मालशे
४. मराठी चित्रपटसृष्टीचा समग्र इतिहास-रेखा देशपांडे.
५. महाराष्ट्राचा खाद्यसंस्कृतीकोश - संपा. डॉ. अनुपमा उजगरे
६. आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास खंड पहिला-के.के. चौधरी
७. श्री. चांगदेव पासष्टी (अर्थ व विवरणासहित) – स्वामी नित्यबोधानंदतीर्थ
८. आधुनिक संत आणि समाज - श्री. रवींद्र गोळे

**मंडळाची निवडक ४४४ पुस्तके ई-बुक स्वरुपात मंडळाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आली आहेत.**

**मंडळाच्या पुस्तकांचे जिल्हानिहाय वितरक**

१. मॅजेस्टिक बुक स्टॉल, गिरगाव, मुंबई
२. आयडियल पुस्तक, दादर, मुंबई
३. लोकवाङ्मयगृह, प्रभादेवी, मुंबई.
४. लक्ष्मी बुक डेपो, शिवाजी पेठ, ठाणे.
५. अक्षर साहित्य , चिपळूण, जि. रत्नागिरी.
६. अशोक एजन्सीज्, कणकवली, जि. सिंधुदुर्ग
७. ज्योती स्टोअर्स बुकसेलर, नाशिक.
८. अक्षय लॉ बुक सेलर्स, देवपूर, धुळे.
९. मे. शारदा प्रकाशन आणि बुक डेपो, जळगाव
१०. शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, जि. अहमदनगर
११. मॅजेस्टिक बुक स्टॉल, पुणे.
१२. बलशेटवार बुक सेलर्स, सातारा.
१३. गजानन बुक स्टोअर्स, सोलापूर.
१४. मे. अजब पुस्तकालय, कोल्हापूर.
१५. मेहता बुक सेलर्स, कोल्हापूर.
१६. मे. धारा (साकेत) प्रकाशन, औरंगाबाद
१७. दीपाली बुक एजेन्सी, जालना.
१८. देबडबाड पुस्तक भांडार, नांदेड.
१९. शारदा बुक डेपो, अकोला.
२०. भारतीय पुस्तकालय, लातूर.
२१. मेसर्स प्रकाश बुक डेपो, अकोला.
२२. सरस्वती बुक्स अँड स्टेशनर्स, अमरावती.
२३. स्वराज्य भांडार महिला सेवा मंडळ, वर्धा
२४. मे. साहित्य प्रसार केंद्र, चंद्रपूर
२५. साहित्य वितरण केंद्र, चंद्रपूर
२६. मुद्रा बुक डेपो, पालघर
२७. मावळे बुक डेबो, कर्जत, जि. रायगड
२८. सुशांत बुक डेपो, नंदूरबार
२९. रत्नाकर बुक सेलर्स, मिरज, सांगली
३०. पूजा ग्रंथ वितरण, परभणी
३१. गोपाल बुक सेलर, हिंगोली
३२. अनुराग पुस्तकालय, अंबाजोगाई, बीड.
३३. टिकार बुक एम्पोरिअम, जि. बुलढाणा
३४. बालाजी बुक डेपो, वाशिम.
३५. गणेश पुस्तकालय, यवतमाळ.
३६. व्हीजन बुक शॉप, भंडारा.
३७. सनी स्टोअर्स, गोदिंया.
३८. राहुल ट्रेडिंग कंपनी अ‍ॅन्ड बुक डेपो, गडचिरोली

**शासकीय ग्रंथागारांचे पत्ते**
**महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाची पुस्तके मिळणाऱ्या शासकीय ग्रंथागारांचे पत्ते**

१. संचालक, शासन मुद्रण, लेखनसामग्री व प्रकाशन संचालनालय, नेताजी सुभाष मार्ग, चर्नीरोड, मुंबई ४०० ००४.
दूरध्वनी : (०२२) २३६३२६९३ २३६३०६९५, २३६३११४८, २३६३४०४९

२. व्यवस्थापक, शासकीय फोटोझिंको मुद्रणालय व ग्रंथागार, फोटोझिंको मुद्रणालय आवार, जी.पी.ओ. नजीक, पुणे ४११ ००१.
दूरध्वनी : (०२०) २६१२५०८०८

३. व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय व ग्रंथागार, सिव्हिल लाईन्स, नागपूर - ४४० ००१.
दूरध्वनी : (०७१२) २५६२६१५

४. सहायक संचालक, शासकीय लेखनसामग्री भांडार व ग्रंथागार, शहागंज, गांधी चौकाजवळ, औरंगाबाद ४३१००१.
दूरध्वनी : (०२४०) २३३९१०९७

५. व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय व लेखनसामग्री भांडार, ताराबाई पार्क, कोल्हापूर - ४१६ ००३.
दूरध्वनी : (०२३१) २६५०३९५ २६५०४०२

**मंडळाकडून प्रकाशित ५२४ ग्रंथांवर २५२ अधिकृत वितरकांना ४० टक्के सूट मिळेल. जास्तीत जास्त पुस्तक वितरकांनी अधिकृत वितरणासाठी सहभागी व्हावे, असे आवाहन सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी मंडळाच्या https://msblc.maharashtra.gov.in संकेतस्थळाला भेट द्या.**

Reg.No. 31918/77 / ISSN 0973-8452

# अर्थसंवादसाठी हार्दिक शुभेच्छा

डॉ. अनिल कृ. वावरे
सातारा

डॉ. जयश्री दि. भंगाळे
भुसावळ

डॉ. वर्षा क. नेहे
भालोड

डॉ. कृतिका खंदारे
औरंगाबाद

डॉ. शशिकांत शिंदे
बार्शी

प्राचार्य डॉ. पी. बी. कुलकर्णी
इस्लामपूर

प्राचार्य डॉ. कैलास व प्रा. सौ. रत्ना निंबाळकर
कल्याण

डॉ. कुमुदिनी भा. जोगी
अचलपुर

डॉ सुरेश घुमटकर
बीड

प्रा. एम. जी. पाटील
मिरज

डॉ. विठ्ठल ठावरी
भिसी

शी. ना. माने
सातारा

डॉ. भास्कर ह. जंगले
दौंड

प्राचार्य ढगे एस. के.
पुणे

रविंद्र दा. इच्छे
असेगाव पूर्णा

डॉ. संतोष कदम
मंद्रुप

डॉ. क्रांती बोरावके
पुणे

विशाल वा. मळेकर
कोरपन

डॉ. वनिता चौरे
चांदूरबाजार

डॉ. उषा पाटील
उमरखेड

डॉ. आशिष कृ. महातळे
चंद्रपूर

प्राचार्या डॉ. मंगला जंगले
भुसावळ

डॉ. अमृता अ. सूर्यवंशी
पुणे

प्रा. डॉ. शिवाजी सांगळे
औरंगाबाद

डॉ. छाया करकरे
नांदेड

डॉ. एस. यु. मंडले
लातूर

प्राचार्या सुषमा देशमुख
अमरावती

डॉ. एम. एन. शिंदे
इस्लामपूर

डॉ. महेंद्र व्ही. मेटे
अमरावती

डॉ. आर. जी. रसाळ
प्रवरानगर

कुलगुरु डॉ. विनायक देशपांडे
अमरावती

मूल्य : रु. १०/– (सभासदांकरिता विनामूल्य)

भारती मुद्रणालय, कोल्हापूर